रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, १ ऑक्टोबर २०२३



# संसदेत खासदाराचे बिगडे बोल ?

संसद हा शब्द पार्लर फ्रेंच शब्दापासून आलेला आहे.याचा बोलणे असा अर्थ होतो. भारतीय संसदेची निर्मिती संविधानाने केली आहे. लोकसभा व राज्यसभा हे दोन्हीना 'संसद' म्हंटले जाते! शासकीय भाषेत कायदेमंडळ म्हंटले जाते.२०१४ ला प्रथम जाताना संसदेत प्रवेशव्दारावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नतमस्तक झाले होते.भारतीय घटनेला वंदन केले. तेव्हा भारतीय घटना व संसद सर्वोतोपरी व पूज्यनीय आहे स्वातंत्र्यानंतर केंद्रात काँग्रेस पक्ष अनेक वर्षे सत्तेत होता, तरी हौस फिटलेली नाही. त्यावेळी देशात भारतीय कम्युनिस्ट पार्टी, स्वतंत्र पार्टी, समाजवादी पक्ष व जनसंघ, हिंदू महासभा हे विरोधी पक्ष होते.त्यावेळी संसदेत सत्ताधारी व विरोधी पक्षात अनेक प्रश्नावरुन वाद संघर्ष झाला, असे नाही. त्यावेळी विरोधी पक्ष कमजोर होता. विरोधी पक्षात नेते श्रीपाद डांगे, जयप्रकाश नारायण, राममनोहर लोहिया, चौधरी चरणसिंघ, आचार्य कृपलानी तसेच अटलबिहारी वाजपेयी व लालकृष्ण अडवाणी आदी नेते अभ्यासू होते. हे नेते काँग्रेस सरकारच्या नीती धोरणावर कडाडून हल्ला करत असत. हे नेत्यांनी त्यांनी काँग्रेस सरकारला अनेकवेळा अडचणीत आणलेले आहे. संसदेच्या सभागृहाबाहेर नेहरू व वाजपेयी यांचेत संवाद होत असत. त्यांच्या भाषणाचे कौतूक केले जायचे.पण सत्ताधारी व विरोधी पक्षात कटूता नव्हती.पं.नेहरू यांनी तर परदेशी नेत्यांसमोर वाजेपयी यांचा भावी पंतप्रधान उल्लेख केला होता. तर वाजपेयी यांनी नेहरू सरकारच्या पंचवार्षिक धोरणाला, स्वंतत्र विदेश नीतीला तसेच दक्षिणेत १९६३ मध्ये द्रविड कडघमने स्वतंत्र द्रविड राष्ट्राच्या मागणीसाठी आंदोलन सुरु केले होते. तेव्हा देशाची एकता व अखंडता कायम राहावी, यासाठी घटनेच्या १६ वे संशोधनाचा प्रस्ताव आणला गेला होता. त्यास वाजपेयीना पाठिंबा दिला होता.ज्या आचार्य कृपलांनी तर पं. नेहरू यांचे सरकार स्थापन करण्यात मदत केली होती. पण त्यांनीच १९६२ मध्ये भारत - चीन युध्दानंतर नेहरू सरकारच्या विरोधात पहिला अविश्वासाचा प्रस्ताव आणला. तेव्हा नेहरुंनी पक्षातील विरोध झुगारुन विरोधी पक्षाने चर्चेवेळी केलेल्या सूचना मान्य केल्या. भाजपा नेते स्व. वाजेपयी यांची 'पक्षापेक्षा देश मोठा' अशीच भूमिका होती. मुस्लिम राष्ट्रांनी ( ओ.आय.सी.) १९९४ मध्ये काश्मीर प्रश्नावरुन मानवाधिकारांचे उल्लंघन होत असल्याचा कारण देत संयुक्त राष्ट्र परिषदेत प्रस्ताव आणला होता! तेव्हा तत्कालिन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांनी विरोधी पक्षाचे नेते वाजपेयी यांना भारत सरकारची बाजू मांडण्यासाठी पाठविले होते. तसेच श्रीमती इंदिरा गांधी यांनी स्वतंत्र बंगला देशाबाबत भूमिका घेतली त्याचे वाजपेयीने स्वागत केले. पण केंद्रात विरोधी पक्ष सत्तेत आल्याचे गांधी कुटुंबाला कधीच सहन झालेले नाही. त्यांनी राजकीय षडयंत्र रचून केंद्रातील विरोधी पक्षाची सरकारे पाडली ,तर राज्यातील विरोधी पक्षाची सरकारे बसखास्त केली. देशात भाजपाने सर्वाधिक जागा मिळलेल्या असताना पक्षाला काँग्रेसने सत्तेपासून दूर ठेवण्याचे काम केले. गांधी परिवार तेच कारस्थान करत आला आहे. तो सत्तेचा भूकेला आहे. जसा पाण्याशिवाय मासोळी जिवंत राहत नाही, त्याप्रमाणे काँग्रेस सत्तेशिवाय राहू शकत नाही. या निराशापोटी ते आता देशात लोकशाही राहिली नाही, घटना धोक्यात आहे!भारतात मुस्लिमांवर व दलितावर अत्याचार वाढले आहेत तो सुरक्षित नाही! असा अप्रचार करून समाजात फूट फाडण्याचे काम करत आहे. काश्मिरचे ३७०कलम, नागरिक सुधारणा कायदा, तीन तलाक हे मुस्लिम विरोधी आहे, असा अप्रचार तुष्टीकरणासाठी केला गेला. आता सनातन हिंदू धर्माला नष्ट करण्याची भाषा बोलली जात आहे. या गांधींची तर विदेशात जाऊन हिंदू धर्माची व भारताची बदनामी करण्यापर्यंत मज्जल गाठली आहे. या काँग्रेसला डावे व भ्रष्ट घराणेशाही पक्षांची साथ मिळत आहे. मोदी व्देषातून २०१४ मध्ये श्रीमती सोनिया गांधी यांनी मोदींना 'मौत सौदागर' म्हटले होते. काँग्रेसचे राजपूत्र राहुल गांधी यांनी तर पंतप्रधानपदाचा कधीच सन्मान केला नाही. ते मोदी विषयी एकेरी शब्द वापरतात! चोर म्हणतात ! त्यांनी संसदेत अदानी आणि मोदींचे छायाचित्र दाखवित त्यांचेवर आरोप केले होते. भाजपा सदस्यांनी यावर आक्षेप घेतला.काँग्रेसचे जावाई रॉबर्ट वाड्रा, राजस्थानचे मुख्यमंत्री गहिलोत तसेच पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचे अदानी सोबतचे छायाचित्रे आहेत! परवा शरद पवार अदानींना भेटले! तेंव्हा याचे गांधीकडे उत्तर देत नाही.गांधी संसदेत विषयावर अभ्यासपूर्ण अथवा गांभिर्यपूर्वक बोलत नाहीत. त्यामुळे भाजपा गांधींच्या भाषणाची खिल्ली उडवितात. यात त्यांची फजिती होती! चेहरा कळवंडतो! तरी लक्षात येत नाही. राजकीय सदस्यांनी टीका, टिप्पणी जरूर करावी,पण सभ्य भाषेत! ती बोचरी असावी पण चारित्र्यहनन करणारी नसावी. याबाबत काँग्रेस नेत्यांना भाषेचे ज्ञान अपूरे दिसतेय काँग्रेस नेत्यांनी कोपरखळ्या व शालीतून जोडे मारण्याची भाषा भाजपा नेत्यांकडून शिकावी. संसदेत प्रत्येक सदस्याला बोलण्याचा अधिकार आहे. पण त्याला मर्यादा आहेत. संसदेने असंसदीय शब्दांचा अकराशे पानांचा कोष आहे. जर सदस्यांनी असंसदीय शब्द वापरला तर संसदेच्या नोंदीतून काढून टाकला जातो.तसेच संसदेत सदस्यांनी गैरवर्तन केल्यास त्यांना निलंबित केले जाते. आतापर्यंत लोकसभा आणि राज्यसभेतील अनेक सदस्यांना निलंबित केले गेले. सदस्यांना निलंबित होण्याचे हे प्रमाण १७० टक्यांनी वाढले आहे. यात संसदेत २१ सप्टेंबर २०२३ रोजी भाजपाचे सदस्य रमेश बधूडी हे महिला विधेयकावर मत मांडत होते. तेव्हा बसापा चे सदस्य दानिश अली हे सतत त्यांच्या भाषणात अडथळे आणत होते. त्यावेळी सभापतींनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला, पण अलींनी त्याकडे दुर्लक्ष करत बधूडी यांना डिवचविण्याचे प्रयत्न चालूच ठेवला.त्यामुळे बधूडी यांचा संयम ढासळला व त्यांनी अलींच्या या व्यक्ती विरोधात अपशब्दाचा वापरले! त्यांचे रोख अलींच्या विरोधात होता. त्यांनी यावेळी मुस्लिम शब्दच वापरला नाही.पण बधूडीने अमर्यादीत शब्द वापरले हे कोणी नाकारले नाही. याबद्दल संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी माफी मागितली. भाजपाने त्यांचे शब्दाचे समर्थन केले नाही!पण दानिश यांचे वर्तन उत्तेजित करणारे होते. ते संसदीय मर्यादेला शोभणारे होते काय? यापूर्वी ते सभागृहात असेच वर्तन करत आलेले आहेत. तेव्हा दानिश हे 'धूतल्या तांदळाचे' नाहीत. या महाशयांनी तर 'भारत माता जय' म्हंटले म्हणून नेत्याच्या अंगावर धावून गेले होते. यावर काँग्रेस राजपूत्र राहूल गांधी यांना त्यांचा लगेच पुळका आला, ते दानिशांच्या घरी गेले आणि गळाभेटीचे छायाचित्र समाजमाध्यमावर टाकले! पूर्वी परदेशी नागरिक 'इंडिया'त यत तेंव्हा गरीबी व त्यांचे छायाचित्र काढत असत, तीच प्रवृत्ती इंडियातील गांधी यांची आहे, आजकाल राजकीय 'चमकोगिरी'साठी कामगार, शेतकरी व गरीबसोबत छायाचित्र काढले जात आहेत. या छायाचित्रामुळे त्यांचे प्रश्न सुटणार आहेत का? काँग्रेस सरकारला पन्नास वर्षात त्यांचे प्रश्न समजले नाहीत! मग गांधीची आता नाटकबाजी का ? राज्यसभेत आरजेडीचे सदस्य मनोज झा यांनी ओमप्रकाश वाल्मीकी यांची 'ठाकूर का कुंआ' कविता म्हटली, त्यावरुन ठाकूर समाज संताप व्यक्त करत आहे. बिहार राजकीय वाद सुरु झाला आहे. बधूडी बोलणे त्याप्रमाणे संदस्य मनोज झा जे बोलले. त्याविषयावर काँग्रेससह आघाडातील विरोधी पक्ष मूग गिळून बसले आहेत? गांधी घराणे हिंदू विरोधी, राष्ट्रविरोधी, अतिरेकी व भष्ट नेत्यांच्या पाठीशी उभे का राहते ? नुकतेच ड्रग्स तस्करी प्रकरणात पंजाब राज्यातील काँग्रेस आमदार सुखपाल खैरा यांना अटक झाली आहे. त्या विरोधात काँग्रसचे आंदोलन केले. काँग्रेसचे चरित्र हे हत्याकांड करणारे राहिलेले आहे. काँग्रेस पक्ष हिंदू मुस्लिम असे व्देषाचे राजकारण करत देशातील निवडणूका जिंकत आलेला आहे, तोच आय. एन.डी.आय.ए. आघाडी २०२४ तोच फार्मूला वापरणार आहे, अशीच नीती आहे. काँग्रेसचे नेते आचार्य प्रमोद कृष्णम यांनी काँग्रेस पक्षावरील हिंदू विरोधी व राष्ट्र विरोधी भूमिका सोडणार नसेल तर २०२४ ला ही पक्षाचा पराभव निश्चित आहे. काँग्रेस सनातन धर्माविरूध्द बोलणाऱ्या खडगे पूत्राला इतर नेत्यावर पक्ष कारवाई का करत नाही ? ते समाजात व्देष पसवित नाहीत काय? संसदेत शरमेने मान झुकणाऱ्या अनेक घटना घडलेल्या आहेत. १९७४ मध्ये संसदेत सुब्रह्मण्यम स्वामी येवू नये म्हणून अटक वारंट काढले होते! तरी ते संसदेत आले. २००८ मध्ये मनमोहनसिंग सरकारच्या विश्वासाच्या वेळी विरोधी सदस्यांनी सरकारच्या बाजूने मतदान करावे, म्हणून भाजपा सदस्यांना नोटांचे बंडल दिले गेले होते.भाजपा सदस्यानी ते टेबलवर ठेवले होते. २००९ मध्ये प्रश्न विचारणारे ३४ सदस्य होते. पण तीन सदस्य आले. त्यामुळे प्रश्नाचा तास रद्द करण्याची वेळ आली. २०१० मध्ये राज्यसभेत राजद आणि समाजवादी पक्षाच्या सदस्यांनी सभापतीच्या आसनाकडे गेले व महिला विधेयकाच्या प्रती ओढून घेत फाडल्या. त्यांनी सभापतीशी धक्काबुक्की केली होती. २०१४ मध्ये काँग्रेसची सत्ता असताना संसदेत मिर्ची पूडचा स्प्रे फवारला गेला होता. संसदेत इतिहासातील अश्या काळ्या घटना आहेत. संसदेत सदस्यांनी दिलेले विधान आणि आरोपाबाबत घटनेचे कलम १०५ (२) नुसार न्यायालयात आव्हान देता येत नाहीत. पण लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांना संसद नियामावली नियम ३८० नुसार अश्या सदस्यावर कारवाई करण्याचे अधिकार आहेत.ते या घटनेची चौकशी करत आहेत! पण काँग्रेस पक्षाला मात्र या प्रकरणाला धार्मिक रंग देऊन राजकारण करावयाचे आहे.त्यात औवेसी या नेत्यांने भर टाकली आहे.

रझाकारकालीन व राष्ट्र विरोधी' मजलिस -ए इत्तेहादूल मुस्लिमीन म्हणचे म्हणजे एम.आय.एम. या धार्मिक संघटना होती. या औवेसी खानदानने या धार्मिक संघटनेच्या नावासमोर ऑल इंडिया नाव जोडले व राजकीय पक्ष स्थापन केला. पण त्यांची विचारसरणी रझाकारी प्रवृत्तीची आहे ! पक्षाचे नाव 'ऑल इंडिया मजलिस -ए इत्तेहादूल मुस्लिमीन ठेवले आहे. या पक्षाचे अध्यक्ष असुदोद्दीन औवेसी आहेत. त्यांनी या प्रकरणावरुन मुस्लिमांना भडकविणारे विधान केले आहे ते म्हणाले 'एक दिवस असा येईल की, संसदेत मुस्लिमांचे 'मॉब लिचिंग' होईल. त्यांचे विधान मुस्लिम समाजाच्या भावना भडकविणारे नाही काय? यापूर्वी औवेसी बंधूनी हिंदू व देव -देवतावर टिप्पणी केली.पहिले देश तोडण्यासाठी 'इस्लाम खतर में 'या घोषणांचा वापर गेला व आता समाजाला तोडण्यासाठी अश्याच घोषणांचा वापर केला जातोय! खरा मुस्लिम हा 'इस्लाम खतरमे,है असे म्हणूच शकत नाही, तो देशभक्त होवू शकत नाही.अश्या शब्दात माजी केंद्रिय मंत्री एम. के.अबकर यांनी संसदेत मुस्लिम नेत्यांना सुनावले होते. इतर धर्मिक लोकांची 'मॉब लिचिंग''करणे हिंदू संस्कृती नाही.भारताचा इतिहास पाहिला! तर! भारतात बहुसंख्य हिंदू असताना मुस्लिम राजांनी हिंदूचे 'मॉब लिचिंग' केलेले आहे.हिंदू राजांनी असा प्रकार कधीच केला नाही. सर्व धर्माचा आदर केलेला आहे. जेव्हा भाजपाच्या नेत्या नपूर शर्मा यांच्या वक्तव्यानंतर 'सीर तनसे जूदा,असे म्हणत निष्पाप लोकांचे गळे कापले गेले. हैद्राबाद शहरात खुलेआम तेच नारे देत नंगाना केला गेला. तेव्हा औवेसीं गप्प होते? देशात जर नथूराम गोडसे विचारांचे समर्थक आहेत, तसेच जीना विचारांचे समर्थक आहेत? औवेसी 'व्होटबँक' साठी मुस्लिम समाजाच्या भावना भडकिण्याचा उपदव्याप करत आहेत.त्यांना खरच! मुस्लिम समाजाची काळजी असेल तर त्यांनी समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी समाजकारण करावे. जगात भारताची घटना व कायदे धर्मावर आधारित नाहीत. देशातील कोणतेही सरकारे धार्मिक भेदभाव करत नाही.तेंव्हा भारतात मुस्लिम आणि हिंदू समाजाने एकतेने आणि बंधूभावाने राहावे, असेच प्रयत्न सर्वांनी करावेत, ही राष्ट्रप्रेमी जनतेची अपेक्षा आहे.




कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

संसदेत महिला आरक्षण विधेयकाच्या वेळी भाजपा खासदार रमेश बधूडी हे बोलत असताना बसपाचे खासदार दानिश अली यांचे बाबत अपशब्द वापरले.ते अमर्यादित होते व शोभणारे नव्हते,ते निंदनीय होते. त्यांच्या या कृतीमुळे भाजपाला शरमेने मान खाली घालण्याची वेळी आली. हेअचानकपणे कसे काय घडले ?याचे मागचे कारण काय? याला घटनेमागील दुसरी बाजू लक्षात घेतली पाहिजे.या घटनेला दानिश अली तितकेच जबाबदार आहेत. त्यांनी भाषणात अडथळे आणत भडकविले, त्यांच्या कृतीवर बधूडीची प्रतिक्रिया होती.पण संसदेतील या वैयक्तीक घटनेला दुर्दैवाने धार्मिक आणि राजकीय रंग दिला जात आहे.








विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# श्री गणेशाला दुर्वा प्रिय का ?

आधुनिक केसरी

नुकताच श्रावण महिना संपला आहे. पाऊस जरा कमीजास्त झाला असला तरी डोळ्यांना सुखावणारी हिरवळ सर्वत्र आहे. ऊन सावलीचा आणि पावसाचा खेळ सुरु आहे. तशातच मंगलमुर्ती श्री गणेशाचे आगमन झाले आहे. श्रावण आणि भाद्रपदात निसर्गाचा चमत्कार पाहायला मिळतो. एरवी वर्षभर सहज उपलब्ध नसणारी विविध प्रकारची फुले, पाने, पत्री आपल्याला मुबलकपणे उपलब्ध होतात. निसर्ग मुक्तहस्ताने आपल्या सौंदर्याची उधळण करीत असतो. अशा वातावरणात आपल्याही चित्तवृत्ती आनंदाने फुलून आलेल्या असतात. अशाच प्रसन्न काळात आपले गणपती, गौरी असे सण येतात. हरतालिकेची पूजा करताना स्त्रिया विविध प्रकारची पत्री पूजेसाठी वापरतात. आणि गणेश चतुर्थीला आपण श्री गणेशाला एकवीस प्रकारची पत्री वाहतो. या प्रत्येक पानाफुलांमध्ये औषधी गुणधर्म दडलेले आहेत. आधुनिक जीवनशैलीत आपण निसर्गापासून थोडे दूर गेलो आहोत. त्यामुळे आपल्याला त्याविषयी फारशी माहिती नसते. पण या सणांच्या निमित्ताने ती होते. आपल्या पूर्वजांनी किती कल्पकतेने निसर्गाचा आणि या सणांचा सुरेख मेळ घातला आहे. या सनांसाठी आवश्यक असणारी पाने, फुले आदी गोळा करण्याच्या निमित्ताने आपण निसर्गात जातो. स्त्रियाही घराबाहेर पडून निसर्गात यानिमित्ताने का होईना पण आपले पाय आणि मन मोकळे करतात. आवश्यक ती पत्री मिळवतत्, त्यांची माहिती करून घेतात. शहरातून हल्ली एवढे शक्य नसले तरी बाजारातून का होईना आपण ही पत्री, फुले, पाने, दुर्वा इ. गोष्टी विकत आणतोच. पण या सर्व साहित्यात या सर्वांमध्ये दुर्वांचे महत्व काही वेगळेच आहे. गणपतीला दुर्वा का प्रिय आहेत या संबंधी दोनतीन कथा आहेत. त्या आपण या निमित्ताने पाहू या. दुर्वा हे ब्रह्मदेवाच्या कन्येचे नाव. ती अत्यंत सुंदर होती. तिने तपश्चर्या करून गणपतीला प्रसन्न करून घेतले. पण पुढे तिला आपल्या सौंदर्याचा आणि ऐश्वर्याचा गर्व झाला. इतका की ती देवी लक्ष्मीला सुद्धा तुच्छ समजू लागली. तेव्हा तिचा गर्व हरण करण्याच्या उद्देशाने देवीने तिला शाप दिला की पृथ्वीवर तृणरूपाने राहशील. या मुळे दुर्वेला खूपच वाईट वाटले. तिने पुन्हा उग्र तप केले. आणि श्री गणेशाला प्रसन्न करून घेतले. म्हणून गणेशाला दुर्वा प्रिय आहेत. दुसरी कथा अशी आहे की, अनलासुर नावाचा एक राक्षस होता. अत्यंत जुलमी आणि अन्यायी. देवांनाही त्याच्यापुढे हार खावी लागत होती. अशा वेळी संकटातून कोण वाचवणार ? तर विघ्नहर्ता गजानन ! म्हणून सगळे देव गणपतीला शरण गेले.



# आनंदी पहाट

## जीवन सार्थ करणारा अर्थप्राप्तीचा मार्ग

आधुनिक केसरी

अत्याधुनिकीकरण आणि काही प्रमाणात अंधानुकरण यामुळे एकूणच आपल्या राहणीमानात बरेच बदल होत असतात. हे होणारे बदल एका अर्थी आपला विकासच घडवत असतात. आपले केवळ नीटनेटके राहणे हे पुरेसं नसून आपण चारचौघांमध्ये वेगळे आणि आकर्षक दिसणे आवश्यक झालं आहे. ुळातच सुंदर असणं आणि आकर्षक दिसणं ह्या दोन्ही गोष्टी जरी सौंदर्याची अनुभूती देणाऱ्या असल्या, तरीही केवळ सुंदर असणं सुद्धा पुरेसं नसून आकर्षक दिसणं आणि त्यासाठी नीटनेटकं राहणं आवश्यकच असतं. यामुळेच सुंदर असण्यापेक्षाही सुंदर दिसण्यासाठी काहीजणांचा कल असतो. त्यामुळे सुंदर आणि आकर्षक राहणीमानासाठी निश्चितच आर्थिकदृष्ट्या काही तरतूद करणं अनिवार्य असतं. ह्या राहणीमानाची नुसती सवय होऊन चालत नाही, तर असं राहणीमान टिकवून ठेवण्यासाठी थोडाफार खर्चही करावा लागणं स्वाभाविक असतं. एका दिवसाची सुंदरता ही कदाचित खिशाला परवडेल देखील, परंतू ती वर्षानुवर्षे टिकवणे निश्चितच खर्चिक ठरते. एकूणच आपल्या गरजांची पूर्तता करण्यासाठी आणि प्रत्येक अनुभव सुखद असण्यासाठी आवश्यकता असते ती आपल्या पैशाच्या योग्य वापराची, बचतीची आणि गुंतवणुकीची. प्रत्येकाच्या ज्याप्रमाणे गरजा वेगवेगळ्या असतात, त्याचप्रमाणे उत्पन्न अथवा आपल्या हाती येणारा पैसा देखील कमी-अधिक प्रमाणात आपल्या पदरी पडत असतो. खरं कसब आपल्या हाती असणाऱ्या पैशाचा योग्य वापर आणि बचत आपण कशाप्रकारे करतो त्यातच असतं. अनेकदा असा गैरसमज असतो कि, जो अर्थार्जन करतो, तोच ते उत्तम प्रकारे करू शकतो. पण खरं तर असं काही नाही. केवळ सकारात्मक दृष्टिकोनातून आपल्या आयुष्यात अर्थक्रांती घडवून आणण्याचं काम आपण स्वतः करू शकतो. आपलं जीवन सार्थ करणारं अर्थ मिळवण्याचा स्वार्थ असणं जरुरीचं आहे, अन्यथा सारं काही व्यर्थ ठरणार आहे.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

# पाऊलखुणा

आधुनिक केसरी

वाळूत उमटणाऱ्या पाऊलखुणा या पाण्याची लाट आल्यानंतर काही क्षणातच नष्ट होतात. पण चिखलात उमटणाऱ्या पाऊलखुणा ह्या खोलवर रुततात व बराच काळ त्या खुणा तिथे राहतात.. पण याहीपेक्षा आपल्या चांगल्या कर्तृत्वाच्या पाऊलखुणा मात्र अमर राहतात .माणूस इहलोकीची यात्रा संपवून स्वर्गलोकी गेला तरी त्याच्या अस्तित्वाच्या चांगल्या पाऊलखुणा या जगात कायम राहतात. आपण काम करत असू तिथे आपल्या पाऊलखुणा या उमटल्याच पाहिजे. मग या पाऊलखुणा आपल्या चांगल्या वागणुकीत असतील, कामात असतील, बोलण्यात असतील, मदतीत असतील.. आपलं अस्तित्व निर्माण करण्यासाठी जसं आपण धडपडतो तसंच आपल्या चांगुलपणाच्या पाऊलखुणा उमटाव्या म्हणून आपण धडपडले पाहिजे. सह्याद्रीच्या पाऊलखुणा, इतिहासातील पाऊलखुणा आपण बघतोच, वाचतो सुद्धा. तसंच आपल्या कर्तृत्वाच्या पाऊलखुणा उमटल्या तर लोक नक्कीच आपल्याला पण वाचतील.. चालणारं पाऊल जेवढं महत्त्वाचं आहे तेवढंच आपल्या आयुष्याच्या चांगल्या पाऊलखुणा उमटने खूप महत्त्वाचं आणि गरजेचं आहे. पृथ्वीतलावर आपण आपल्या स्वतःचे घर सहज बांधू शकतो. परंतु दुसऱ्यांच्या हृदयात घर बांधता आलं पाहिजे. त्यासाठी काही नकारात्मक गोष्टी सोडून द्याव्यात. तर काहींकडे दुर्लक्ष करावं. जे सांगता येण्यासारखं असेल ते सांगावं .आपण आपला चांगुलपणा कधीही सोडू नये. अगदीच नाथ माऊली सारखं जरी नाही वागता आलं तरी किमान एक माणूस म्हणून काही गोष्टी आपण सहज करू शकतो. जेणेकरून समोरच्याच्या नाही तरी निदान आपल्या मनावर तरी चांगुलपणाच्या खुणा उमटाव्यात. जेणेकरून आपल्याला आनंद मिळेल आपण केलेल्या चांगल्या कामाचा.

कस्तुरीचा सुगंध याप्रमाणे पाऊलखुणा सुगंधित व्हाव्यात. फुले हातात घेतली तर त्यांचा सुगंध हातावर मागे राहतो, काही वेळ का होईना. सुगंधाच्या रूपात फुलाच्या पाऊलखुणा मागे राहतात.

तद्वतच आपल्या कर्तृत्वाच्या पाऊलखुणा मागे राहाव्यात, मोगऱ्याच्या सुगंधाप्रमाणे.....

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग.18

# साखर आणि माती

आधुनिक केसरी

**एक दिवस, बादशहा अकबर यांच्या दरबार भरलेला होता, तेव्हा एक दरबारी हातात काचेची बरणी घेऊन आला. बादशहाने विचारले - 'या बरणीत काय आहे?' दरबारी बोलला 'यात माती आणि साखरेचे मिश्रण आहे.' 'ते कशासाठी?' अकबर बादशहाने पुन्हा विचारले. 'माफी असावी, महाराज' दरबारी बोलला. 'आम्ही बिरबलच्या बुध्दिमत्तेची परीक्षा घेऊ इच्छितो, आमची अशी इच्छा आहे की त्यांनी मातीतून साखरेचा दाणान दाणा वेगळा करावा.' बादशहाने बिरबलकडे बघितले आणि स्मितहास्य करीत बोलले 'हे बघ, बिरबल तुझ्यासमोर रोज नवीन आव्हान असतात, आम्हाला असे वाटते की तू पाणी न वापरता मातीतून साखर वेगळी करावी.'**

**'हे तर खूपच सोपे आहे, महाराज.' बिरबल बोलला. 'हे तर लहान मुलांच्या खेळासारखे आहे', असे म्हणत बिरबलने बरणी उचलली व तो दरबाराच्या बाहेर निघाला आणि दरबारी देखील त्याच्या मागे गेले. बिरबल बागेत गेला व तिथे त्याने एका आंब्याच्या झाडाच्या सभोवताली बरणीतील साखर व मातीचे मिश्रण पसरविले.**

**'हे तुम्ही काय केले?' एका दरबाऱ्याने विचारले. 'याचे उत्तर तुम्हाला उदया मिळेल.' बिरबल बोलला. दुसऱ्या दिवशी ते सर्वजण बागेतील त्या आंब्याच्या झाडाजवळ पोचले, तिथे फक्त माती पडलेली होती. साखरेचे सर्व दाणे मुंग्या गोळा करून आपापल्या वारूळात गेल्या होत्या, काही मुंग्या अजूनही साखरेचे दाणे घेऊन जाताना दिसत होत्या. 'परंतु सगळी साखर कुठे बरे गेली?' दरबाऱ्याने विचारले. 'मातीपासून वेगळी झाली.' बिरबल बोलला. सर्व हसायला लागले. बादशहाने सर्व दरबाऱ्यांना सांगितले, 'जर तुम्हाला साखर पाहिजे असेल, तर मुंग्यांच्या वारूळात जाऊन बघा.' सर्वजण जोरात हसायला लागले.**

# निरुपण

आधुनिक केसरी

**भार्गवजननीमम्बां मातापुरनिवासिनीम्|**
**भक्तकामप्रदां वन्द्यां दुर्गां देवीं नमाम्यहम्||**
**१०० || भार्गव म्हणजे भगवान परशुरामांच्या जननीला अम्बेला, माहूरगडावर निवास करणाऱ्या, भक्तांच्या मनोकामना पूर्ण करणाऱ्या, वंद्य अशा दुर्गादेवीला मी नमस्कार करतो.**



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर


# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**मधुमति नित्य अनादि है, सद्गुरु नित्य अनादि । उपदेशक संसार का, ज्ञान अन्त ले आदि ।।५६।।(स्वर्वेद पंचम मण्डल दशम अध्याय) ०५/१०/५६**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
**ब्रह्मविद्या नित्य अनादि आहे आणि तिचे आचार्य सद्गुरू देखील नित्य अनादि आहेत. हे ब्रह्मविद्येचे उपदेशक सद्गुरू सृष्टीच्या प्रारंभापासून प्रलयापर्यंत ब्रह्मविद्येचा उपदेश जगात करत असतात.**

........................................................................

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.**



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

# शुन्यत्वनिरसन

आधुनिक केसरी

एक म्हणतो आपण संसार करावा,जीवावर देवाचं नियंत्रण असल्याने हा अज्ञान रूपी संसार आपल्या मालकीचा नाही.सगळं काय ते देव बघून घेईल. मी फक्त कर्म करत रहाणार, आणि हे सत्कर्म आपल्या आयुष्याची जीवनभर उपयोगी पडणारी शिदोरी असते. सतत शुन्यत्व मिरवणे सोपी गोष्ट नाही. त्यासाठी विचारांची आचारांची बैठक असणे गरजेचे आहे. एक दिवस शून्यत्व येणार आहे हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# संतांचे होणे म्हणजे त्यांच्या आज्ञेत राहणे

आधुनिक केसरी


मी जिवंत राहावे हे जितके जरूर आहे, तितकेच परमात्म्याची ओळख करून घेणे जरूर आहे. जगात नावे ठेवीत नाहीत कोणाला ? परमार्थाला वाहून घेतले तर प्रपंच नीट करीत नाही म्हणून नावे ठेवतात; तिकडे लक्ष देऊ नये. मनाच्या विषादाला कारण एकच असावे की, मी अजून भगवंताचा झालो नाही. जो भगवंताच्या इच्छेने वागतो त्याचे चांगले होते. भगवंत ठेवील त्यात समाधान मानून राहावे. भगवंताचे रूप आनंदमय आहे, आणि सृष्टीचा क्रमच असा आहे की तो माणसाला आनंदाप्रत पोहोचवीत असतो. अत्यंत दारिद्र्यालासुद्धा आनंदाची जागा असतेच. आनंदाशिवाय मनुष्य जगणेसुद्धा शक्य नाही. मी मुळात आनंदरूप असताना मग दुःखाचे गाडे आले कुठून ? मला दुःख होते ते माझे कुठे तरी चुकते म्हणून ! मी चुकलो का बरोबर, ही शंकासुद्धा मुक्ताला येत नाही, कारण तो आणि देव एकच असतात. बद्धालाही शंका येत नाही. कारण तो देव जाणतच नाही; 'सर्व काही मी करतो, आणि देव नाहीच, ' म्हणून म्हणतो. मुमुक्षूला मात्र ही तळमळ लागते. जेव्हा ही तळमळ तीव्र असते तेव्हां संतांची भेट होते. काही पूर्वीचा ठेवा असल्याशिवाय अशी तळमळ लागणार नाही. आपण संतांचे होऊन राहावे. त्यांचे झालो म्हणजे त्यांच्याशिवाय आपल्याला कुणी नाही असे वाटले पाहिजे.



संतांचे होणे म्हणजे त्यांच्या आज्ञेत वागणे. ते सांगतील तसे करावे, ते वागतील तसे नाही वागू. सत्याची संगत धरली म्हणजे सत्संगती मिळते. कशाचीही आसक्ति न धरता जगात वागणे हेच मुक्तांचे लक्षण. हवेपण नाहीसे झाले म्हणजे मग दुःखाचे कारणच राहात नाही. जिथे तुम्ही राहता तिथे सद्गुरु आहेतच असे तुम्हाला वाटते आणि समाधान होते, हीच त्यांची खरी कृपा होय. श्रद्धेने जे काम होते ते तपश्चर्येने होत नाही. आपल्या गुरूंनी सांगितलेल्याप्रमाणे वागणे हाच आपला परमार्थ समजा. गुरू म्हणजे साक्षात परमात्मा. त्याची आज्ञा पाळणे हीच आपली तपश्चर्या. याहून वेगळे काही करण्याची गरज आहे असे न वाटावे. माझ्या मनाचे विकार जात नाहीत असे चांगल्या माणसांनासुद्धा वाटते. पण 'ते जात नाहीत, जात नाहीत' असे घोकून त्यांचा ध्यास घेतल्याने ते उलट वाढतील. तिकडे लक्ष देऊ नये. नाम घेणे हे आपले काम करीत राहावे, म्हणजे विकार आपोपापच कमी होत जातील. मात्र, मनाच्या मागे देहाला जाऊ न देणे, इतके जपले पाहिजे.

# गहिनीनाथ

मुलांचे भाषण ऐकून मच्छिंद्रनाथ विस्मयात पडला व काय चमत्कार आहे तो आपण स्वतः डोळ्यांनी पहावा असे त्याने मनात आणिले आणि मुलांस जवळ बसवून सर्व खाणाखुणा विचारून घेतल्या. मच्छिंद्रनाथांस मुलांनी दुरून ठिकाण दाखविले होतेच. तेथून एक मुलाचा शब्द त्यास ऐकू येऊ लागला. तेव्हा हा करभंजन नारायणाचा अवतार झाला, असे मच्छिंद्रनाथाने समजून मुलास उचलून घेतले व तो मार्गाने चालू लागला. गोरक्षनाथाने पुतळा केला असूनहि तो जवळ दिसेना, म्हणून मच्छिंद्रनाथ मुलास घेऊन जात असता, गोरक्षनाथास हाका मारीत चालला. ती गुरूची हाक ऐकून गोरक्ष एका घरात लपला होता तेथून बाहेर आला. पण मच्छिंद्राच्या हातातील मुलास पाहताच त्यालाहि भीति वाटली. त्याची गुरूजवळ येण्यास हिंमत होईना. हे पाहून गोरक्षास भय वाटते असे मच्छिंद्रनाथ समजले. मग त्याने मुलास चिरगुटात गुंडाळून ठेविले व गोरक्षापाशी जाऊन सांगितले की. हा मनुष्य आहे व तो नवनारायणापैकी एक नारायणाचा अवतार आहे. मग गोरक्षानेही कसा काय प्रकार झाला होता तो सांगितला तेव्हा ते वर्तमान ऐकून मच्छिंद्रनाथांसआनंद झाला जसा तू गोवरामध्ये झालास तसाच तू संजीवनी मंत्र म्हणून हा पुतळा केलास. त्यात करभंजन नारायणाने संचार केला आहे; तो भूत नसून मनुष्य झाला आहे, अशी साद्यंत हकीगत सांगून मच्छिंद्रनाथाने गोरक्षाची भीति उडविली मग त्यासहवर्तमान मुलास घेऊन मच्छिंद्रनाथ आपल्या आश्रमास गेला तेथे त्याने गाईचे दूध आणून मुलास पाजिले व त्यास झोळीत घालून हालवून निजविले.



रविवार, १ ऑक्टोबर २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - ६०
आरएनआय : एमएएचएमआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 1 OCT. 2023 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-60 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-16 ● PRICE-5

### महत्त्वाची बातमी

## दोन हजार रुपयांच्या नोटा बदलण्याची मुदत वाढवली

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** दोन हजार रुपयांच्या नोटा बदलण्याची मुदत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने वाढवली आहे. उद्यापासून 2000 रुपयांच्या नोटा व्यवहारात वापरता येणार नाहीत. बँकेत नोटा जमा करण्याची मुदत आरबीआयने वाढवली आहे. आज रिझर्व्ह बँकेने परिपत्रक काढत ही माहिती दिली आहे. आता, नागरिकांना त्यांच्याकडील दोन हजार रुपयांच्या नोटा बदलण्यासाठी आणखी सात दिवसांची मुदत मिळाली आहे. आरबीआयने दिलेल्या माहितीनुसार, ज्यांनी अजूनही 2000 रुपयांच्या नोटा बदलल्या नसतील त्यांना आता 7 ऑक्टोबरपर्यंत नोटा बदलता येणार आहे. एकाच वेळी कमाल 20 हजार रुपयांच्या नोटा बदलता येणार असल्याचे आरबीआयने स्पष्ट केले आहे. आरबीआयनुसार, 29 सप्टेंबर 2023 पर्यंत 96 टक्के 2000 रुपयांच्या नोटा परत आल्या आहेत. 19 मे 2023 रोजी 2000 रुपयांच्या 3.56 लाख कोटी मूल्याच्या नोटा चलनात होत्या. त्यानंतर आतापर्यंत 3.42 लाख कोटी रुपये मूल्य असणाऱ्या नोटा आरबीआयकडे परत आल्या आहेत. आरबीआयने 2000 रुपयांच्या नोटा बदलून घेण्यासाठी 7 ऑक्टोबरपर्यंतची मुदत वाढवून दिली आहे. त्यानंतर 8 ऑक्टोबरपासून बँकांच्या मार्फत नोटा बदलून देण्याची प्रक्रिया थांबवण्यात येणार असल्याचे आरबीआयने स्पष्ट केले आहे. 8 ऑक्टोबरपासून आरबीआयने निश्चित केलेल्या केंद्रात 2000 रुपयांच्या नोटा जमा करता येणार आहेत. याच ठिकाणाहून नोटा बदलून मिळणार आहे.

# जुन्नरमध्ये उभारले जाणार शिवछत्रपतींचे सुवर्ण मंदिर, जगातील सर्वात मोठा पुतळा

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** हिंदवी स्वराज्य निर्माण करण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य रयतेसाठी देणारे महाराष्ट्रासह संपूर्ण भारताचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जन्मभूमी म्हणजे जुन्नर. याच शिवजन्मभूमीत छत्रपती शिवाजी महाराजांचे सिंहसनधारी सुवर्ण मंदिर, महाराजांचा जगातील सर्वात उंच पुतळा आणि मागे स्वराज्याचा सर्वात उंच भगवा ध्वज उभारण्याची घोषणा माजी आमदार आणि शिवसेना जिल्हाध्यक्ष शरद सोनवणे यांनी केली आहे.

जुन्नर शहरातील शिवजन्मभूमी किल्ले शिवनेरीपासून 5 किलोमीटर अंतरावर असणाऱ्या गोद्रे गावामध्ये 25 एकर क्षेत्रावर छत्रपती शिवाजी महाराजांचे सोन्याने मढवलेले सुवर्णमंदिर उभारण्यात येणार आहे. याच परिसरामध्ये शिवरायांचा जगातील सर्वात उंच 200 फुट उंचीचा पुतळा उभारण्यात येणार असून 80 मीटर उंचीचा स्वराज्याचा भगवा ध्वज देखील असणार अशी माहिती यावेळी शरद सोनवणे यांनी दिली. हातात तलवार असलेला शिवरायांचा हा पुतळा ब्रॉन्झ धातूमध्ये मुंबई येथे तयार करण्यात येणार असून त्यासाठी जे.जे स्कूल ऑफ आर्टस् या नामांकित संस्थेत काम करण्याचा अनुभव असणाऱ्या ज्येष्ठ शिल्पकाराची निवड करण्यात आली आहे. पुढे बोलताना सोनवणे म्हणाले की, संपूर्ण जगाला रयतेचे राज्य देणारे छत्रपती शिवाजी महाराज यांची जन्मभूमी असणाऱ्या जुन्नर तालुक्यात महाराजांचे मोठे सुवर्णमंदिर आणि जगातील सर्वात उंच पुतळा उभारणे आपले कर्तव्य आहे. सुरुवातीला ही संकल्पना आपली स्वतःची असल्याने इतर कोणावरही आर्थिक भार न टाकण्याचा निर्णय घेतला होता. परंतु मित्र आणि सहकाऱ्यांच्या आग्रहामुळे "श्रीमंत योगी सुवर्ण स्मारक ट्रस्ट"ची स्थापना करण्यात आली आहे. शिवरायांचे भव्यदिव्य सुवर्ण मंदिर, पुतळ्यासह शिवकालीन इतिहास जागवणारे काम ट्रस्टच्या माध्यमातून करण्यात येणार असून संपूर्ण उभारणी आणि पुढे देखभाल ट्रस्टच्या माध्यमातून केली जाणार आहे. सह्याद्रीच्या कुशीत असणाऱ्या निसर्गसंपन्न गोद्रे गावामध्ये गावामध्ये सिंहसनधारी सुवर्ण मंदिर आणि महाराजांच्या भव्य पुतळ्यामागे स्वराज्याचा सर्वात उंच भगवा ध्वज उभारण्यात येणार आहे. शिवरायांचा हा मंदिर परिसर खूपच आकर्षक असणार आहे, यामध्ये शिवाजी महाराजांच्या आचार विचारांवर आधारित ग्रंथालय असणार आहे. छत्रपती महाराजांच्या जिवनावर आधारित चित्रफीत, लघुपट सभागृह असणार आहे, मंदिराच्या चौहूबाजूंनी पाण्याचा प्रवाह आणि मंदिर परिसराच्या चौहूबाजूंनी शील तटबंदी असणार आहे, संपूर्ण परिसरामध्ये भारतीय प्रजातीची वातावरणाकुलीत आकर्षक वृक्ष असणार आहेत, मंदिराच्या सुरुवातीला भव्य असे महाद्वार असणार आहे.

# डबे सोडून इंजिन पळाले

आधुनिक केसरी न्यूज

**पालघर :** पश्चिम रेल्वेच्या वैतरणा स्थानकावरील एक धक्कादायक घटना समोर आली आहे. मुंबईहून अहमदाबादच्या दिशेने जाणाऱ्या अहमदाबाद पॅसेंजर रेल्वेचा अपघात थोडक्यात टळला आहे. ही रेल्वे वैतरणा स्थानकावरुन गाडी सुटताना अचानक गाडीचे इंजिन रेल्वेच्या डब्ब्यांपासून वेगळे झाले. यामुळे स्थानकावरील प्रवाशांनी एकच गोंधळ सुरु केला. दरम्यान यामुळे पश्चिम रेल्वेचा निष्काळजीपणा सातत्याने समोर येत असल्याचे म्हटले जात आहे.

दरम्यान ही बाब लक्षात येताच वैतरणा स्थानकावरील रेल्वे कर्मचारी आणि पॅसेंजरच्या लोको पायलट यांनी हे इंजिन रेल्वेच्या डब्यांना पुन्हा जोडले. त्यानंतर ही रेल्वे पुन्हा पुढच्या प्रवासासाठी रवाना झाली. पण अद्यापही यामगचे कारण समोर आलेले नाही. तरीही पश्चिम रेल्वेकडून दुर्लक्ष झाल्याचे यावेळी म्हटले जात आहे. तर यामुळे पश्चिम रेल्वे प्रवाशांच्या जीवाशी खेळ करत असल्याचा सवाल देखील उपस्थित केला जात आहे. मुंबईहून अहमदाबादच्या दिशेने अहमदाबाद पॅसेंजर ही रेल्वे रवाना झाली होती. नेहमीप्रमाणे तिने दुपारी सव्वा दोनच्या सुमारास पश्चिम रेल्वेच्या वैतरणा स्थानकावर थांबा घेतला.

थांबा घेतल्यानंतर ही रेल्वे पुढच्या प्रवासाला रवाना झाली. परंतु तेवढ्यातच या रेल्वेचे इंजिन रेल्वेच्या डब्यांपासून वेगळे झाले. ही बाब स्थानकावरील प्रवाशांच्या लक्षात आली आणि स्थानकावर एकच गोंधळ सुरु झाला. दरम्यान इंजिन वेगळे झाल्याचे पहिल्यांदा स्थानकावरील प्रवाशांचा लक्षात आले. त्यानंतर गाडीतील प्रवाश्यांनी देखील आरडाओरडा करण्यास सुरुवात केली. त्यानंतर हे इंजिन पुन्हा गाडीला जोडण्यासाठी अर्धा ते पाऊण तासांचा अवधी लागला. त्यानंतर हे इंजिन गाडीला जोडण्यात आले. तर इंजिन जोडल्यानंतर गाडीतील प्रवाशांनी सुटकेचा श्वास सोडला. दरम्यान रेल्वे कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर या रेल्वेच्या लोको पायलट आणि रेल्वे कर्मचाऱ्यांनी हे इंजिन पुन्हा रेल्वेला जोडले. यामुळे मोठा अपघात अगदी थोडक्यासाठी टळला. तर कर्मचाऱ्यांच्या तत्परतेमुळे कोणताही जीवितहानी झाली नाही. तसेच कोणत्याही प्रकारची दुखापत देखील झाली नाही. परंतु जर गाडी वेगात असतान हा प्रकार घडला असता तर मोठा अपघात होण्याची शक्यता होती.

# महिलांना दिलेले आरक्षण म्हणजे तारीख नसलेला चेक

## सुप्रिया सुळेंचा मोदी सरकारला टोला

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** लोकसभेत आणि देशातील सर्व विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारं नारी शक्ती वंदन अधिनियम हे महिला आरक्षणाचे विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहात मंजूर झालं आहे. परंतु, हे आरक्षण कधी लागू केलं जाईल याबाबत केंद्र सरकारने कोणतीही तारीख स्पष्ट केलेली नाही. महिला आरक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठी सरकारला अनेक गोष्टींची पूर्तता करावी लागणार आहे. देशाची जनगणना करणे, मतदारसंघांची पुनर्रचना करणे, आरक्षित मतदारसंघांची निवड करणे असे अनेक टप्पे पार केल्यानंतर महिला आरक्षणाची अंमलबजावणी होईल. या सगळ्या प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी किती वर्षे लागतील हे काही सांगता येत नाही. त्यामुळे विरोधक महिला आरक्षणाच्या मुद्द्यावरून मोदी सरकारवर टीका करत आहेत. दरम्यान, महिला आरक्षण म्हणजे तारीख नसलेला चेक असल्याचे वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केले आहे. सुप्रिया सुळे म्हणाल्या, खंत एकाच गोष्टीची वाटते की, केंद्र सरकारने आम्हाला (महिलांना) आरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. पण तो असा चेक दिलाय, ज्याच्यावर तारीखच नाही. केंद्र सरकारने आरक्षण दिले पण त्याला तारीख नाही. हे आरक्षण २०२९ ला मिळेल, २०३४ ला मिळेल की कधीच मिळणार नाही हे मात्र देवालाच ठावूक. खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या, केंद्र सरकारने जाहीर केलेलं आरक्षण कधी मिळेल हे ठावूक नाही. परंतु, मी तुम्हाला एक शब्द देते. २०२४ मध्ये इंडिया आघाडीचे सरकार आले तर पुढच्या निवडणुकीत पूर्ण ताकदीने या देशातल्या प्रत्येक महिलेचा मान सन्मान होईल. तसेच महिला आरक्षण लवकरात लवकर ३३ टक्क्यांवरून ५० टक्क्यांवर नेण्याचा प्रयत्न आम्ही करू.

**२०३४ च्या लोकसभेआधी आरक्षण प्रत्यक्षात येणार नाही :** संसदेत महिला आरक्षणाचं विधेयक मंजूर झालं असले तरी २०३४ च्या लोकसभा निवडणुकीच्या आधी हे आरक्षण प्रत्यक्षात येऊ शकणार नाही. आगामी विधानसभा निवडणुका आणि लोकसभेची निवडणूक डोळ्यासमोर ठेवून हे विधेयक मांडण्यात आलं असल्याचा आरोप माजी केंद्रीय विधिमंत्री कपिल सिबल यांनी मोदी सरकारवर केला आहे.



# संकष्टीचतुर्थी : एक आठवण...



प्रा .सौ. शारदा वानखेडे
संपर्क क्र. 9823066606

आधुनिक केसरी

**बऱ्याच वर्षांपूर्वीची गोष्ट आहे... मी तेव्हा अगदी तिसरीला किंवा चौथीला असेल... परभणी जिल्ह्यातील दुर्डी हे माझे छोटेसे गाव... गावाकडे आमचे एकत्र कुटुंब होते... कुटुंबात तीन काका -काकू, माझी आई -वडील, मोठ्या काकांची सून -मुलगा, पाच चुलत भावंड, मी व माझे दोन भाऊ, मोठ्या काकांचे दोन नातू असे वीस जणांचे कुटुंब होते. आम्हाला सर्व कुटुंबात ४० एकर जमीन होती. म्हणजे अजूनही आहे... फक्त बदलत्या काळानुरूप त्या जमिनीची वाटणी झाली आहे... आम्ही सर्व भावंड एक दोन वर्षाच्या फरकाने लहान-मोठे होतो. सर्वात मोठ्या काकांचे नाव मुंजाजी होते.काही वर्षांपूर्वीच ते वारले.त्यांना आम्ही बाबा म्हणायचो... त्यांना दोन मुली व एक मुलगा... दोन्ही मुलींचे लग्न झाले. त्यांना नातवंड,पत्वंड झाले... माझे वडील दोन नंबरचे सर्वात मोठी मी व माझ्या नंतर दोन भाऊ...शरद आणि सुनिल अशी त्यांची नावे आहेत.**

बाबांचा मुलगा ज्याला आम्ही सर्व अशोक दादा म्हणतो.. त्यांना एक किराणा दुकान त्यावेळी टाकून दिले होते. दादा दुकान सांभाळायचे... दोन नंबरच्या काकांचे नाव पंढरीनाथ असून त्यांना आम्ही दादा म्हणतो .दादांना विक्रम , गणपत, ही दोन मुले व मीरा नावाची मुलगी आहे .सर्वात लहान काकांचे नाव एकनाथ असून त्यांनाही आम्ही दादाच म्हणतो. त्यांना संतोष व उद्धव अशी दोन मुले आहेत. घराचा सर्व व्यवहार कारभार अर्थातच माझ्या वडिलांच्या हाती होता. एवढ्या मोठ्या कुटुंबाचा कारभार सांभाळणे तसे फार कठीण काम होते. प्रत्येकाला काय हवे नको ते पाहणे. वेळच्या वेळी लागेल ते आणून देणे. ही जोखीम कारभार सांभाळाऱ्याला होती... घरातील सर्व स्त्रिया मिळून मिसळून घरकाम करायचा व शेतातील कामासाठी जायच्या. अशोक दादा चे नवीनच लग्न झालेले होते. त्यामुळे वहिनी सहसा शेतात जात नव्हत्या. गावात सर्व लोकांना व पाहुण्या -राहूण्यांना यांना आमच्या एकत्र कुटुंबाचे कौतुक वाटायचे.

कुटुंबासाठी लागणारे सर्व सामान हे दुकानातूनच आणले जायचे. पूर्वीच्या काळी आजच्यासारखा एकदाच किराणा भरत नसत. जे लागेल जसे लागेल तसे सामान रोज दुकानातून आणत असत. सर्व प्रकारचे धान्य व भाजीपाला शेतातच पिकवल्या जात असे. दुधासाठी शेतात भरपूर गायी होत्या. त्यामुळे आजच्यासारखा फार खर्च नसायचा. दुसऱ्या दिवशी चहासाठी लागणारी साखर व चहा पावडर ज्याला तेंव्हा ( पत्ती )असेच म्हटले जायचे रात्रीच घरी आणून ठेवली जायची. वहिनीच्या लग्नात आलेला एक स्टीलचा डब्बा त्या साखरेसाठी ठेवलेला होता. तो डब्बा घेऊन माझे चुलत भाऊ विक्रम , गणपती किंवा संतोष कोणीतरी साखर आणायला जात. घरापासून दुकान थोडे दूर होते. येताना डब्यातली साखर थोडी- थोडी खात -खात यायला त्यांना मज्जाच वाटायची. माझ्या मोठ्या चुलतीला आम्ही माय म्हणायचो.. व इतर दोन्ही चुलत्यांना काकी ... जेव्हा स्त्रियांना उपवास असेल, तेंव्हा दुकानातून साबुदाणा, शेंगदाणे ही आणले जायचे... अशीच एकदा संकष्टी चतुर्थी होती. त्यावेळी उपवासाच्या साबुदाण्याची उसळ आम्हाला खूप खावीशी वाटायची... तेव्हा आजच्यासारखे उपवासाचे फार वेगवेगळे पदार्थ नव्हते. फार- फार तर ते काशीफळ किंवा डांगर शिजवले जायचे... किंवा गावात विकायला आले तर रताळे वगैरे घेतले जायचे... आमच्या घरातील सर्वच बायकांना चतुर्थी होती. मी त्यावेळी आठ -नऊ वर्षांची असेल...

पहाटेच माय कोणालातरी सांगत होती,"आज चऊत हाय".. मी तिचे बोलणे ऐकले होते. मलाही उपवास धरायचा होता. अर्थात तो उपवास फक्त साबुदाणा खाण्यासाठीच करायचा होता. कारण, त्यावेळेला ती साबुदाण्याची उसळ मला खूप आवडायची. आज शहरी भागात साबुदाण्याची खिचडी असे म्हटले जाते. आमच्या गावाकडे त्यावेळी उसळ किंवा घुसळही म्हटले जात असे. तर ही उसळ आम्हा सर्वच भावंडांना खूप आवडायची. घरातील सर्व बायका फराळ करायला बसल्या की आम्ही सर्व भावंड त्यांच्या भोवती फिरायचो. मग सगळ्यांची एक -एक घास उसळ आम्हाला हातावर मिळायची. तेवढीच उसळ खाऊन काही आमचे समाधान व्हायचे नाही. वाटायचं कदाचित यांना उसळ आवडत असेल म्हणूनच या उपवास धरत असतील... माईकडून आज चऊत (चतुर्थी) असल्याचे कळाले होते. त्यामुळे मला तो उपवास धरावासा वाटत होता. पण आईला सांगितल्यावर ती थोडीच धरू देणार होती... त्यादिवशी माईने एका भगोन्यात(पातेले) भिजवलेला साबुदाणा मी पाहिला होता.आईने,"जेवण कर" असे सांगताच .," उशीर झालाय "असे सांगून मी न जेवताच शाळेत निघून गेले.

नऊ ते बारा अशी आमच्या शाळेची वेळ होती. दुपारी बारा ते एक जेवणाची सुट्टी असायची... पुन्हा एक ते चार शाळा भरायची... शाळा सुटली की आम्ही घरी आलो... सगळ्या.. बायकांचे फराळ आता सुरूच होणार होते. मी घरी येताच आईने, जेवण करा म्हणून सांगितले. मी आईला म्हणाले,"मला भूक नाही."तेवढ्यात मीरा आईला म्हणाली,"काकी तिला चऊत धरायची म्हणं."मीराचे बोलणे ऐकून आई म्हणाली,"कशाला धरायची बाई," रात्री जेवायला उशीर होतो. चंद्र निघाल्याशिवाय जेवण करायला जमत नाही.



तुला दम निघायची नाही. तू आपलं जेवण कर." मी मात्र हट्टाला पेटले होते. काही झालं तरी आज मला उपवास धरायचाच होता. सगळ्या बायकांमध्ये मिळून थोडीशीच उसळ कढईमध्ये दिसत होती. कदाचित अर्धा किलो साबुदाण्याची ती उसळ असेल.त्यामध्ये पाच बायकांना फराळ करायचा होता. पण त्यावेळी तेवढी कुठे समज होती. सगळ्यांनी आपल्या- आपल्या ताटात उसळ वाढून घेतली. सगळ्या मला समजवण्याचा प्रयत्न करत होत्या. पण मी काही ऐकेचना . शेवटी आईने तिचे उसळीचे ताट माझ्यासमोर ठेवले व मला फराळ करायला सांगितला. सगळ्यात चुलत्या मला काही -बाही समजून सांगू लागल्या. पण मला काही कळतच नव्हते. आईने माझ्यापुढे ताटली ठेवताच. मी उसळ खायला सुरुवात केली. बाकीच्या भावंडांच्या हातावर त्यांच्या आईने घास -घास उसळ घातली. ते लेकरं जेवण करून बाजूला झाले. मी मात्र फक्त उसळ खाल्ली. आई ग्लासभर पाणी पिऊन बाजूला झाली. उसळ खाऊन मी शाळेत गेले. शाळा सुटेपर्यंत काहीच वाटले नाही. परंतु शाळेतून घरी आल्यावर मात्र मला खूप भूक लागली. आता काय खायचे मी तर उपवास धरला होता. आईला तर सांगायची सोयच नव्हती. कारण आधीच आई मला उपवास धरू नको असे सांगत होती. मी तिच्या मनाविरुद्ध उपवास धरला होता... सायंकाळचे पाच वाजले असतील... आईचेच मन ते... मला लागलेली भूक तिला कळल्याशिवाय कशी राहील? मी स्वयंपाकाच्या खोलीत खायला काही सापडते का? हे बघू लागले... तेवढ्यात आई तिथे आली. तिने मला विचारले,"काय पाहिजे तुला?

आता मात्र तिला सांगितल्याशिवाय पर्याय नव्हता... मी तिला काही बोलणार एवढ्यात, तिने एका वाटीत गुळ लावलेले शेंगदाणे माझ्याजवळ दिले व," हे एवढे खाऊन घे म्हणून सांगितलं". माझ्या डोक्यावरून हातही फिरवला. मला खूप छान वाटलं गुळ- शेंगदाणे मी पटकन खाऊन घेतले. पाणी पिले आणि खेळायला गेले.आई दिवसभर उपाशीच होती या गोष्टीची मला कल्पनाही नव्हती.

थोड्या वेळाने मी पुन्हा घरी आले. संध्याकाळचा स्वयंपाक जवळपास होतच आला होता. पण आजचा चंद्र निघाल्याशिवाय काही जेवायला मिळणार जमणार नव्हते... वहिनी पोळ्या करत होत्या त्या मला म्हणाल्या.,"ताई तुम्ही उपवास कशाला धरला? आज तुमच्यामुळे काकी उपाशीच राहिल्या... तुम्ही काकीची घुसळ खाऊन घेतली. त्या पाणी पिऊन तशाच राहिल्या. आता इथून पुढं असं करू नका... लहान लेकरांनं कशाला उपवास धरायचा?"वहिनीचे हे शब्द ऐकून मला खूप वाईट वाटलं... आई वाळलेल्या कपड्याच्या घड्या घालत बसली होती. मी आई जवळ गेले... तिला म्हणाले,"आई तू आज फराळ केला नाही का? ती म्हणाली," नाही गं केला की... तुला कोण म्हणलं मी फराळ केला नाही...,"आईला मी सांगितले... मला वहिनी म्हणल्या की," माझ्यामुळे तू उपाशी राहिली."आई म्हणाली,"आता तुला उपवास धरायचाच होता तर मग काय करायचं? आपल्या घरात चार माणसं हायतं... एवढ्या मोठ्या खटल्यात सगळ्यांना पोटभर फराळाचं कुठून मिळेल? तुला नाही म्हटलं तरी तू ऐकत नव्हतीस... म्हणून मव्हा फराळ तुला दिला... असू दे ... यापुढे असा हट्टीपणा करू नको". मी आईला यापुढे असे करणार नाही म्हणून सांगितलं.घरातल्या सर्व माणसांची जेवणं झाली... चंद्र उगवताच सर्व बायकांनी चंद्राची व गणपतीची पूजा केली नंतर आम्ही सर्वांनी जेवण केले. बालपणातील संकष्टी चतुर्थी गेलेल्या श्रावणातील संकष्टी चतुर्थीच्या निमित्ताने मला आठवली... आज जेंव्हा- केंव्हा उपवासासाठी साबुदाणा भिजवते. तेव्हा तेव्हा संकष्ट चतुर्थीच्या साबुदाण्याच्या आणि माझ्यामुळे आईला खरोखरच संकष्ट चतुर्थी घडली याची जाणीव पुन्हा- पुन्हा होत राहते...

# जीवन उद्देश समजला तर व्यर्थ धावपळ होत नाही




गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**नेमका काय साध्य करण्यासाठी हा नरदेह मिळाला आहे याच शाश्वत ज्ञान योग्य वेळी समजलं तर फुकटची धावफळ होत नाही.आपल्याला मिळालेला मानवी देह हा नेमका कशासाठी मिळाला आहे .याच अंतिम साध्य काय आहे हे समजलं तर जीवन नक्कीच सार्थकी लावता येत .जीवनाच साध्य समजलं तर योग्य उदिष्ट पुर्ण करण कठिण जात नाही त्यामुळे अंतिम फलित समजणं गरजेचं आहे. मानवी जीवनातील सगळ्यात मोठ मुल्यमापन हे योग्य वेळी करून त्या मध्ये यशस्वी होता आलं पाहिजे. बाकी आपण किती धन द्रव्य संपत्ती कमावलं किती पद प्रतिष्ठा मिळवली या पेक्षा जीवन सार्थकी लागलं का हे सगळ्यात जास्त महत्वाचं आहे.महणुन जीवन सार्थकी लावता आल पाहिजे.**

नेमकं मुल्य मापन काय आहे काय मिळवलं किंवा अर्जित केले म्हणजे आपलं जीवन सार्थकी लागल असं समाधान आनंद वाटेल असे किती लोक आहेत कि ज्यांना आपलं जीवन सार्थकी लागल हे सांगायला संकोच वाटत नाही. तसं पाहिलं तर आपण जन्म घेतल्या नंतर किती दिवस आपला प्रवास पृथ्वीवर आहे हे कोणालाही निश्चितपणे सांगता येत नाही.परंतु प्रवास चालू असे पर्यन्त मात्र संबंध पृथ्वी वरील धनसंपदा मालमत्ता जरी मिळाली तरी मानवी मन समाधानी होत नाही. अगदी जग जिंकणारा सिकंदर याचा सुद्धा कशा वाईट पद्धतीने अंत झाला हे आपण सगळे जाणुन आहेत. तरी सुद्धा काय अर्जित करण्यासाठी आपण घडपड करत आहेत हेच शेवटपर्यंत आपल्याला लक्षात येत नाही. नैसर्गिक न्याय तत्व निती मुल्य धर्म संस्कार यांच उल्लंघन करून वेगवेगळ्या पद्धतीने द्रव्य संपदा अर्जित करण्यासाठी प्रत्येकजण घडपडत आहे. अहोरात्र प्रयत्न करत आहे. या धडपडीत साधारणतः दैनंदिन जीवनात दोन पद्धतीने जीवन मार्गावर मार्गक्रमण करणारे लोक आपल्या आजूबाजूला असतात दिसतात. त्यापैकी एक म्हणजे भौतिक जीवन जाण्याची घडपड असणारे लोक ज्यामध्ये पृथ्वीवरील जास्तीत जास्त वस्तू आपल्याला मालकी च्या करण्यासाठी प्रयत्न असतो. या साठी कोणत्याही प्रकारचा मार्ग अवलंबून जास्तीत जास्त संपत्ती द्रव्य अर्जित करून संपदा संचय करणं हा मुख्य उद्देश असतो. भौतिक वस्तू आणि सुविधा ह्या अंनत असल्याने अशा पद्धतीचा लोक समुह सदैव बैचेन असमाधानी अतृप्त दुःखी अशांत अस्थिर दिसुन येतो कारण अपेक्षांच ओझ खूपच जास्त असतं. ही अस्थिरता संपुष्टात येण्या ऐवजी दैनंदिन वाढत जाते. पण शाश्वत जीवन या मध्ये जे लोक सर्व काही मिथ्य आहे सोबत काही येणार नाही. आपण काही आणलं नाही म्हणून सोबत काही घेऊन जाणार नाहीत.मिळालेलं जीवन शांततामय मार्गाने सुखी समाधानी आनंदी सदैव पुर्ण तृप्त पद्धतीने जगातात सुख आणि दुःख याला समान समाजतात गरीबी श्रीमंती याला फार महत्त्व देत नाहीत.

जशी वेळ परस्थिती समोर आली त्यामध्ये समाधान आनंद माणुन चालतात या पद्धतीने जीवन जगाणारा लोक समुह म्हणजे शाश्वत जीवन दोन्ही पद्धतीने जीवन जगत असताना आपण या पृथ्वीवर निर्माण केलेली संततीला व्यवस्थित मार्गदर्शन करून घडविणे खूप महत्वाचे आहे. भौतिक जीवनात यशस्वी लोक लाखो करोडो रुपये आपल्या मुलांसाठी कमाई करून ठेवतात सर्वांना हि बाब शक्य होत नाही. परंतु मुलांना सुसंस्कारित उच्चशिक्षित ज्ञानी घडविणे आवश्यक आहे. जेणेकरून ते नावलौकिक करतील किंवा व्यवस्थित जीवन मार्गक्रमण करतील संस्कार आणि ज्ञान नसेल तर लाखो करोडो रुपये रातोरात नष्ट करणारी संतती सुद्धा आपण पाहत आहोत. मुलांना सुसंस्कारित उच्चशिक्षित ज्ञानी घडविण्यासाठी जे जे आवश्यक आहे. ते कर्तव्य केले पाहिजे आणि हे कर्तव्य दोन्ही



पद्धतीने जीवन जगाणारे लोक करतात परंतु या मध्ये भौतिक सुविधा मिळविण्यासाठी जीवन जगणारे लोक आपल्या मुलांना घडवत असताना मुलांनी योग्य प्रतिसाद दिला नाही .तर प्रचंड दुःखी खिन्न निराश होऊन स्वतःचा आत्म आंनद गमावतात तर शशावत पद्धतीने जीवन जगाणारे लोक आपल्या मुलांना सुसंस्कारित उच्चशिक्षित ज्ञानी घडविण्यासाठी कुठेही कमी पडत नाहीत. मात्र मुलांचा योग्य प्रतिसाद मिळाला नाही. तर दुःखी असाधानी होता नाहीत. वास्तविक जीवनात मिळविण्यासाठी काय आहे हेच समजलं पाहिजे सर्व कर्तव्य प्रामाणिकपणे सचोटीने पुर्ण करा मुलांना सुसंस्कारित उच्चशिक्षित ज्ञानी घडविण्यासाठी शक्य तेवढे प्रयत्न करा. पण या मध्ये तुमचा स्वतः चा आनंद समाधान सुख शांती गमावू नका .जीवनात स्वतः अर्जित करण्यासारखं फक्त सुख समाधान आनंद शांती आहे. या सगळ्याचं आधारस्तंभ ज्ञान आहे. म्हणून ज्ञान मिळावा ज्ञान अर्जित करा सर्व श्रेष्ठ संपत्ती ज्ञान आहे. जी तुमच्या समोर कशीही परस्थिती असु द्या तुमच्या सुख समाधान आनंद शांती वर ज्ञान अघात होऊ देत नाही. त्यासाठी अर्जित करायचं असेल तर सुख समाधान आनंद शांती देणारे ज्ञान अर्जित करा जीवन सार्थकी लागल पाहिजे हा जन्म योगायोगाने मिळाला त्याच कल्याण करता आलं पाहिजे हिच जीवनातील सार्थकता आहे आणि सार्थकता योग्य वेळी समजली एत्किंचित देखिल गडबड होत नाही.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# गोपीचंद पडळकर अन् लोणंदची 'ती' गाजलेली सभा

आधुनिक केसरी

**लोणंद :** गेली अनेक वर्षांपासून ते आज तागायत धनगर आरक्षणाचा मुद्दा हा अजूनही सुटलेला नाही. राज्यभर धनगर समाजाच नव्हे तर विविध पक्षातील धनगर नेत्यांकडून सुध्दा वारंवार आक्रमक भूमिका घेत इथल्या सरकारला प्रश्न विचारले गेले.परंतु धनगर आरक्षणाचं घोंगडं आजही तसेच भिजत पडलेलं आहे.धनगर आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागलेला नाही.काही वर्षांपूर्वी गोपीचंद पडळकर यांनी तेव्हा आमदार नसताना धनगर आरक्षणाच्या मुद्द्यांवरून एक चांगलेच वादळ निर्माण केले होते.महाराष्ट्रातील प्रत्येक धनगर समाजातील बांधवास हा विश्वास निर्माण झाला की होय,आता



सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068

आपल्याला आरक्षण मिळवून देणारा आपला नेता आपल्यात असल्याची भावना समाज बांधवां मध्ये निर्माण झाली. गोपीचंद पडळकर यांचे ते राज्यभर झालेले ते दौरे संपूर्ण महाराष्ट्राला ज्ञात आहेत.महाराष्ट्रातील काना कोपऱ्यात "एकच छंद, गोपीछंद" हा नारा घुमू लागला.सत्तेत कोणते सरकार आहे.याची तमा न बाळगणारे गोपीचंद पडळकर सरकारवरच निशाणा साधत होते.त्याच दरम्यान सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यामध्ये लोणंदच्या पालखी तळावर धनगर आरक्षण मेळावा आयोजित करण्यात आला होता.लोणंद येथे प्रचंड गाजलेली गोपीचंद पडळकर यांची ती सभा संपन्न झाली.लोणंदसह खंडाळा तालुक्यातीलच नव्हे तर आस पासच्या भागातून आलेल्या समस्त धनगर समाज बांधवांनी ती सभा ऐकली.

**आहोत आपण होळ ते इंदौर अन**
**दिल्ली कटकच्या इतिहासाचे वारसदार**
**आज वज्रमुठ ही एकीची धरुयात**
**भिजत पडलेलं आरक्षणाचं घोंगडं**
**अंमलबजावणीसाठी मजबूत करुयात....**

पडळकरांच्या भाषणातील हयाच मुद्द्यांना असे शब्दबध्द करताना आजही त्याच आक्रमक भूमिकेची आठवण होत असते.अन त्याच भूमिकेची नितांत गरज वाटू लागली आहे.तेव्हा ही धनगर आरक्षणाचा मुद्दा कळीचा होता अन आजही तो तितकाच महत्वाचा बनलेला आहे.आज धनगर आरक्षणाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आलेला असताना आ.गोपीचंद पडळकर यांनी केलेल्या त्यांच्याच त्या भाषणाची आजही समाजबांधवांना आठवण होत आहे.धनगर आरक्षणावरून प्रचंड स्वरुपाची आक्रमक पणे भूमिका मांडत सरकारवरच त्यांनी टीका केली होती.इथल्या मातीत धनगर आरक्षणाचं विमान ते उतरल्यानंतर त्यांनी त्यांच्याच शब्दांच्या शस्त्राने सत्तेतील माजाला चांगलंच सुनावलं होतं. महामेळाव्याच्या एल्गारातून जणू आरक्षणाची ललकारच पाहायला मिळाली.लोणंदच नव्हे तर अख्ख्या खंडाळा तालुक्यातून हजारोंच्या संख्येने एकजुटीत जमलेल्या समाज बांधवांनी गोपीचंद पडळकर यांना खूप मोठी दाद दिली.धनगर समाज बांधवांची मते ही नेहमी कोणत्याही निवडणुकीत निर्णायक अशीच ठरत असतात.धनगर समाजाच्या मतांवर अनेक राज्यकर्त्यांनी सत्ता हस्तगत केली. परंतु धनगर आरक्षणाचा मुद्दा सोडवून तो प्रश्न मिटविण्यासाठी कोणतीही निर्णायक भूमिका न घेतल्याने आमच्याच मतावर निवडून येणाऱ्या सरकारवर गोपीचंद पडळकर यांनी खरमरीत शब्दात ताशेरे ओढले. गोपीचंद पडळकर यांची हीच भूमिका सर्वांना पटली. आरक्षण मिळालेच पाहिजे. याच साठी धनगर समाज बांधवांच्या एक जुटीचा तो मेळावा खंडाळा तालुक्यातील लोणंद येथे पाहायला मिळाला. खंडाळा तालुक्यातील धनगर समाज बांधवांचे संख्याबळ जास्त असून



त्यावेळी गोपीचंद पडळकरांच्या सभेला अख्खा पालखी तळ तुडुंब गर्दीने भरून गेला होता.जो धनगर हित की बात करेगा, वही देश पे राज करेगा हे नेहमी भाषणातून बोलणारे गोपीचंद पडळकर लोणंदच्या सभेतून सुद्धा चांगलेच गरजले.त्यावेळी त्यांचे भाषण प्रचंड गाजले.ज्या सरकारच्या विरोधात गोपीचंद पडळकर यांनी आंदोलनाची भूमिका धनगर आरक्षणाच्या निमित्ताने घेतली होती.आज त्याच सरकारमध्ये ते विधानपरिषदेचे सदस्य आमदार म्हणून जनतेमध्ये जात असले तरी पडळकरांच्या त्या भुमिकांबाबत आजही लोकांना विश्वास वाटत आहे.आमदार म्हणून गोपीचंद पडळकरांनी सत्तेच्या माध्यमातून आजही धनगर आरक्षणाचा मुद्दा लवकर तडीस घेऊन जावे.अशी अपेक्षा धनगर समाज बांधवांकडून व्यक्त केली जात असते.धनगर आरक्षणासाठी अजून संघर्ष करावा लागत आहे.ज्या सरकारच्या विरोधात निदर्शने केली.त्याच सरकार सोबत सत्तेत असून ही आरक्षण मिळत नसल्याची खंत समाज बांधवांकडून व्यक्त केली जात आहे.त्यामुळे आमदार गोपीचंद पडळकर यांच्या वर सुद्धा नाराजी असलेली पाहायला मिळते.हे नाकारता येत नाही.सरकार कोणाचे का असेना परंतु धनगर समाजाच्या आरक्षण एकजुटीची ललकार ही नेहमीच धनगर समाज बांधवांची एकत्रित पाहायला मिळते.अन ती अशीच राहायला हवी. यासाठी सर्वच नेत्यांनी एकत्र येण्याची गरज असल्याचे समाजबांधव अपेक्षा व्यक्त करत असतात.गोपीचंद पडळकर यांना प्रचंड मानणारा समाज बांधव याच महाराष्ट्राच्या मातीत आजही आहे.सत्तेतील सहभागाने धनगर समाजातील अनेकांना त्यांच्या भूमिका सौम्य कराव्या लागल्या. आज तीच वेळ आमदार गोपीचंद पडळकर यांच्यावर सुद्धा आलेली असली तरी मी समाजा बरोबरच आहे,समाज आधी मग पक्ष अशी भूमिका सुद्धा त्यांनी मांडलेली आहेच.ते आजही स्पष्ट शब्दांत त्यांची भूमिका मांडत असले तरी सरकारला धनगर आरक्षणाचं घोंगडं मार्गी लावण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करायला लावणे आमदार गोपीचंद पडळकर यांचे प्रयत्न खूप महत्वाचे आहेत.धनगर समाज बांधवांचे एकच म्हणणे आहे. तुम्ही कोणत्या ही सत्तेत राहा परंतु समाज म्हणून धनगर आरक्षणाची ही लढाई लढली जात असताना धनगर समाजाच्या भूमिके सोबतच सदैव असले पाहिजे.अशी अपेक्षा आजही समाज बांधवांकडून व्यक्त केली जात आहे.सत्तेच्या राजकारणात गेले जाते.तेव्हा कठोर भूमिका ह्या थोड्याशा मृदू होतात हे राजकीय नेत्याच्या बाबतीत घडतच असते.त्यामुळे आमदार गोपीचंद पडळकर यांच्या बाबतीत सुध्दा असे घडणारच.

सत्ता आणि सत्तेचे गणित समजून घेत असताना समाज मन ह्या गोष्टी मान्य करायला तयार असते. परंतु समाज बांधवांच्या अस्तित्वाची लढाई बनलेल्या धनगर आरक्षणाची आंदोलने अजून किती काळ चालत राहणार आहेत.आजही धनगर आरक्षणाचा मुद्दा वारंवार आंदोलनातून पुढे येत आहे.चौंडी येथे उपोषण करण्याची वेळ समाज बांधवांवर येत आहे.कोण म्हणतय देत नाही घेतल्या शिवाय राहत नाही हे आरक्षणाच्या बाबतीत अजून किती दिवस म्हणावे लागणार आहे? पहले आरक्षण फिर सरकार हा गोपीचंद पडळकरांचा त्या सभेतील घणाघात एकीचा आवाज गरजणारा व सत्तेची ही हवा सुद्धा चक्रीत गरगर फिरणारि बनली होती.हे आरक्षणाचं रणकंद जिंकण्यासाठी गोपीचंद पडळकर यांच्या सारख्या नेतृत्वाची व त्या वेळी त्यांनी घेतलेल्या त्याच आक्रमक भूमिकांची गरज आहे.आणि ह्या भूमिका जोपर्यंत धनगर समाज बांधवांना आरक्षण मिळणार नाही.तोपर्यंत सदैव टिकून ठेवण्याची वेळ आली आहे.अजून तोच विश्वास समाज बांधव म्हणून गोपीचंद पडळकर यांच्याकडुन अपेक्षित केला जात आहे. आ.गोपीचंद पडळकर हे महाराष्ट्राच्या राजकारणातील एक वादळी नेतृत्व बनलेले असले तरी त्यांनी धनगर आरक्षणासाठी उभा केलेला तो संघर्ष कदापि विसरता येणार नाही.लोणंद सारख्या महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी झालेल्या सभा धनगर आरक्षण मिळवून देतील असा विश्वास समाज बांधवांमध्ये दिसून आलेला होता.आज त्याच विश्वासाची कृतीशील पाऊले पडून सत्तेसोबत असताना धनगर समाजाला आरक्षण मिळवून देण्याची किमया घडायला हवी.धनगर समाज बांधवांसाठी लढणारे व्यक्तिमत्त्व म्हणून आजही समाज बांधव आ.गोपीचंद पडळकर यांच्या कडे पाहत आहे. आमदार झाल्यावर एमपीएससी विद्यार्थ्यांसाठीचे केलेले आंदोलन असो,ओबीसींच्या राजकीय आरक्षण प्रश्नी मांडलेली भूमिका असो तसेच बैल गाडा शर्यत प्रश्न घेतलेला आक्रमक पवित्रा असो किंवा एसटी कर्मचाऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने केलेले आंदोलन असो यांसारख्या अनेक प्रश्नांबाबत त्यांनी ज्या त्या वेळी कठोर शब्दात स्वतःची भूमिका मांडली आहे.जशास तसे उत्तर देण्याच्या त्यांच्या या बेधडक स्वभावाच्या वृत्तीने त्यांनी अनेकांच्या मनावर राज्य निर्माण केलेले आहे.पक्ष कोणताही असो ते ज्या पक्षातून काम करतात तिथे ही त्यांची आक्रमकता पाहायला मिळत असते.एक लढणारे नेतृत्व म्हणून धनगर समाज बांधव आजही त्यांच्या भूमिकेकडे डोळे लावून बसलेला असून लोणंदच्या सभेतून जी आक्रमता दिसून आली होती.जी सभा गाजली होती.आता अशाच सभांतून धनगर आरक्षणाची ही लढाई जिंकण्यासाठी व अंमलबजावणी करण्यासाठी फक्त आणि फक्त न्यायिक लढा लढण्याची गरज आहे.

## विवाहितेस सासरच्यांकडून बेदम मारहाण

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** तालुक्यातील बाबुळगाव खुर्द येथील विवाहिता कविता ज्ञानेश्वर काळुंखे वय 22 वर्ष या विवाहिते चे मौजे बाभूळगाव येथील ज्ञानेश्वर नामदेव काळुंखे यांचे सोबत 2020 मध्ये रितीरिवाजाप्रमाणे लग्न झाले होते लग्न झाल्यानंतर सासरी नांदण्यासाठी गेल्यानंतर सुरुवातीला सासरच्यांनी चांगली वागणूक दिली परंतु मागील सहा सासरच्या मंडळींनी या विवाह येथे त्रास देणे सुरू केले माहेराहून पैसे आणण्याचा तगादा लावून विवाहितेचा छळ करण्यास सुरुवात केली.
स हा महिन्यापासून पती ज्ञा आहे ज्ञानेश्वर नामदेव काळुंखे, सासरे नामदेव खंडू काळुंखे ,सासु लक्ष्मीबाई नामदेव काळुंखे ,ननंद अंजना सुरेश साळवे ,सर्व राहणार बाभळगाव यांनी सर्वांनी मिळून माझ्या आई-वडिलाकडून नवीन घर बांधण्यासाठी एक लाख रुपये घेऊन येण्यासाठी मानसिक व शारीरिक क्षण करून स्वीकार करून सापड बोक्याने मारहाण करीत परंतु मी युवायतीने सासरच्या लोकांना समजून सांगितले की माझ्या आई-वडिलांची परिस्थिती गरिबीची आहे ते एवढे पैसे देणार नाहीत असे सांगितले होते त्यानंतर 24 9 2023 रोजी सकाळी दहा वाजेच्या सुमारास विवाहिता कविता घरी काम करीत असताना पती ज्ञानेश्वर म्हणाले की तू तुझ्या वडिलाकडून आतापर्यंत एक लाख रुपये का आणले नाही असे म्हणून असे म्हणून माझे केस धरून मला लाथा बुक्क्याने मारहाण करून खाली पडून सासू लक्ष्मीबाईनं अंजना दोघींनी माझे केस धरून मला पोटात मारहाण केली व सासरे नामदेव साळुंखे यांनी शिवीगाळ केले सर्वांनी मिळून मला घरातून हाकलून दिले परंतु मी बाबुळगाव येथेच थांबले थांबल्यानंतर मी माझ्या आई-वडिलांना फोन द्वारे झालेल्या त्रासाबद्दल माहिती देऊन बाबुळगाव येथे बोलवून घेतले तेव्हा माझे आई वडील आले असताना त्यांनाही सासरकडील वरील आरोपींनी लोकांना शिवीगाळ करून चापडबक्याने मारहाण केली अशी तक्रार शिऊर पोलीस ठाण्यात दिली असून याप्रकरणी विवाहितेच्या फिर्यादीवरून वरील चार आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहे.

9130174444
हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

महाराष्ट्र Business Katta

तिरुपती मंडप डेकोरेटर्स
Generator, Lighting, Mandap, Open Mandap, DJ Sound, Stage, Chairs & Garden Decorate
Baiju Anna
8623904312
Abhijeet Shukla
9765826252
DARZI BAZAR, CANTONMENT, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

अर्जंट पाहिजेत
बँक ऑफिससाठी महिला (कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक), अनुभवी सुपरवायजर, मार्केटिंग प्रतिनीधी (स्वत:ची टू-व्हीलर आवश्यक) आणि अनुभवी सेक्युरिटी गार्ड पाहिजे.
संपर्क - 9822982958

CAFÉ ROCKSTARZ
EAT. CHILL. REPEAT
11:11 ELEVEN ELEVEN
Where Dishes come True..!!
MULTI-CUISINE FAMILY RESTRO
AURANGABAD
Indian, Continental, Italian, Chinese, Chat, Pavbhaji, Shakes, Desserts
9665544629
GHAI TOWER, BESIDE RAJ CLOTH, CANNAUGHT GARDEN, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

खळबळजनक
कॉम्प्युटर, लॅपटॉप, प्रिंटर, सीसीटीव्ही
Sales & Services
नवीन कॉम्प्युटर 9900/-
जुने कॉम्प्युटर 5900/-
जुने लॅपटॉप 6900/-
दोन कॅमेरा सेटअप 7900/-
चार कॅमेरा सेटअप 9900/-
9420405928


# कंत्राटी निर्णय आणि युवक



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्रे
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**जागतिक महासत्ताक राष्ट्राच्या पंगतीत जाऊन बसत असताना देशांतर्गत वास्तव परिस्थितीचे देखील भान आपणास असावयास हवे. ज्या राष्ट्रात शिक्षणासारख्या पवित्र आणि मूलभूत क्षेत्रात सावळा गोंधळ घातला जातो ते राष्ट्र कालांतराने इतर राष्ट्रांच्या तुलनेत मागे पडत जाते. कायम विना अनुदान धोरणाने येथील युवकांची अख्खी एक पिढी गारद केली ते कमी म्हणून की काय अलीकडे शासकीय नोकऱ्यांमध्ये कंत्राटीकरणाचा जो निर्णय शासनाने घेतला आहे ते त्यापेक्षाही भयंकर म्हणावे लागेल. शासन निर्णयाच्या एका फटक्यात अख्या पिढीचे भविष्य नेस्तनाबूत करण्याचे कार्य कंत्राटीकरणाच्या या निर्णयाने केले आहे.**



## क्षितिजापल्याड

दिनांक ०६ सप्टेंबर २०२३ रोजीच्या शासन निर्णया नुसार शासकीय नोकऱ्यांमध्ये जे मनुष्यबळ कार्यरत आहे त्यात वीस ते तीस टक्के मनुष्यबळ दरात बचत होईल असे म्हटले आहे. मुळात सरकारकडे पुरेसा पैसा नाही हे कारण होऊ शकत नाही. एकीकडे आम्ही देशांतर्गत लोकांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न करत आहोत असे भासवायचे आणि त्याच वेळेस लोकांची क्रयशक्ती कमी करायची हा विरोधाभास शासकीय पातळीवरून सुरू आहे. मागच्या कित्येक वर्षापासूनचा बेरोजगारीचा दर आज शिखर पातळीवर जाऊन पोहोचलेला आहे. त्यात पुन्हा पाच वर्षाच्या कंत्राटी पद्धतीने समस्येचे समूळ उच्चाटन न करता हा मलमपट्टी करण्याचा भाग होय. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ज्यावेळी कोणतेही शासन खाजगी कंत्राटदार कंपनीकडे सेवा पुरविण्याचे कंत्राट देते त्यावेळेस ते सामान्य माणसाच्या हितापेक्षा खाजगी भांडवलाला सुरक्षा कशी प्रदान करता येईल याकडेच त्यांचा कल असतो. आज ज्या १३८ प्रकारच्या नोकऱ्या खाजगी कंत्राटदाराकडून भरण्याचा घाट शासनाने घातला आहे. हे काम शासन करू शकत नाही का? असा प्रश्न उपस्थित होतो. यासंदर्भात आम्ही आमच्या जागतिकीकरण : स्वरूप व समस्या; या ग्रंथात विस्ताराने चर्चा केली आहे. जिज्ञासूंनी तो ग्रंथ मुळातून वाचून जागतिकीकरणाची प्रक्रिया काय आहे? हे समजून घेतल्यास त्याचा उलगडा होईल. ज्या खाजगीकरणाची सुरुवात तीस - पस्तीस वर्षांपूर्वी झाली तेव्हापासून ते आजतागायत आम्ही एकेक क्षेत्र खाजगी कंपन्यांना बहाल करत आलो आहोत. सार्वजनिक क्षेत्र अगोदर मोडीत काढायचे, कोणतीही व्यवस्था लावायची नाही आणि एक भ्रम असा तयार करायचा की सार्वजनिक व्यवस्था म्हणजे अनागोंदी, भोंगळपणा, अव्यवस्था आणि तोट्याचा व्यवहार होय, असा भास निर्माण करायचा. जेणेकरून सामान्य माणसाला देखील वाटू लागते की सार्वजनिक क्षेत्रापेक्षा खाजगी क्षेत्र कधीही चांगले. महाराष्ट्रातील किंबहुना देशभरातील शाळांच्या बाबतीतही हाच अपसमज निर्माण करण्यात आला. जेणेकरून निम्न मध्यमवर्गीय, मध्यमवर्गीय घरातील मुले खाजगी शाळांकडे वळतील याची पद्धतशीर रचना तयार करण्यात आली आणि आज घडीला महाराष्ट्रातील ६२ हजार शासकीय शाळा कंपन्यांना दत्तक देण्याची घोषणा करण्यात आली. हे केवळ एका दिवसाचा परिपाक आहे असे नव्हे तर यामागे सुनियोजित षडयंत्र काम करते आहे. कोणतीही दमनकारी मानसिकतेची यंत्रणा ही आपल्यापेक्षा इतरांनी पुढे जाऊ नये, त्यांची प्रगती होऊ नये हे पाहत असते. आज देशातील सामान्य कुटुंबातील पहिली किंवा दुसरी पिढी मुख्य प्रवाहात येऊ पाहत असताना व्यवस्थेच्या केंद्रस्थानी असणाऱ्या मानसिकतेतून अशा सुपीक कल्पना निघत असतात. या देशातील अत्यंत गुणवान, प्रज्ञावंत, शास्त्रज्ञ, साहित्यिक, डॉक्टर्स, इंजिनियर्स, तत्त्वज्ञ, शिक्षक, उत्तम राजकारणी हे सर्व सरकारी शाळांमधूनच शिकून नावारूपाला आल्याचे आपण पाहतो. भारतीय म्हणून जी आपली पारंपरिक मानसिकता आपण बाळगून असतो त्याचे पडसाद केवळ आपल्या वर्तन व्यवहारातूनच दिसून येत नाहीत तर शासकीय धोरणांमधून देखील दिसून येत असतात. याचे स्पष्ट उदाहरण म्हणजे कंत्राटीकरणास दिलेली परवानगी होय. आज शासकीय पातळीवरून जागतिक महासत्तांच्या स्पर्धेत आपण पाचव्या स्थानी आहोत, असे भरभरून बोलले जाते आणि हे जर खरे असेल तर मनुष्यबळाच्या दरात वीस ते तीस टक्के बचत होईल असे म्हणणे



ही फार मोठी हास्यास्पद विसंगती ठरेल. एकीकडे आम्ही ज्या ठिकाणी फार मोठा खर्च करण्याची आवश्यकता नाही अशा क्षेत्रात वारेमाप खर्च करत सुटलो आहोत आणि समाजाच्या जगण्या मरणाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सामान्य कुटुंबातील युवकांचे स्वप्न धुळीस मिळतील अशा प्रकारचे निर्णय जर आपण घेत असू तर आपली ही दिशा आपणास कोणत्या ठिकाणी नेऊन पोहोचवेल याचे एकदा खरेच आत्मपरीक्षण झाले पाहिजे. खाजगी कंत्राटदार कंपन्यांना काम देताना शासन आणि कंत्राटदार यांच्यात सेवा शर्तीच्या अनुषंगाने जे काही करार मतदार होतात या करारात जाणीवपूर्वकच शिथिलता आणली जाते. जेणेकरून खाजगी कंत्राटदारांना भविष्यात डोकेदुखी ठरणार नाही. एखादी सेवा पुरवत असताना त्यामध्ये काही न्यून राहिले तर त्याची जबाबदारी कंपनीवर येणार नाही याची तजवीज अगोदरच करून ठेवण्यात येते, हे जागतिक इतिहासावरून आपणास पाहता येईल. मग या खाजगी कंपन्या देशी असोत अथवा विदेशी असोत. त्या स्वतःचा फायदा पाहत असताना सेवेच्या संदर्भात मात्र तेवढ्या गंभीर नसतात. कारण नफा कमावणे हा त्यांचा मूळ उद्देश असतो. बहुजन हिताय बहुजन सुखाय असे ब्रीद घेऊन सार्वजनिक क्षेत्रांची निर्मिती आपण केली. त्याला मूठ माती देण्याचे कार्य आता होत आहे. अगदी सर्व प्रकारच्या शासकीय नोकऱ्यांमधून खाजगी कंत्राटदार कंपनीला फायदा कसा होईल याची सोय शासन निर्णयातच केलेली आहे. उदाहरणार्थ शिक्षक पस्तीस हजार रुपयावर नोकरी करणार असेल आणि सहाय्यक शिक्षक पंचवीस हजार रुपयांवर नोकरी करणार असेल तर त्याला ही रक्कम पूर्ण मिळू शकणार नाही. त्याच्या एकूण वेतनापैकी फक्त ८३% रक्कमच त्यास मिळेल. एकूण रकमेच्या १५ टक्के एवढी रक्कम सेवाशुल्क म्हणून कंत्राटदाराकडे जाईल. एक टक्के रक्कम उपकर म्हणून असंघटित कामगार मंडळाकडे जाईल आणि एक टक्के रक्कम संकीर्ण खर्चाच्या नावाखाली काढून घेण्यात येईल. मुळातच अत्यंत कमी वेतनावर युवकांना राबवून घेत असताना त्याच्या हाती पूर्ण रक्कम देखील दिली जाणार नाही यास काय म्हणावे? खरे तर ज्या नऊ कंत्राटदार कंपन्या हे काम करणार आहेत ते काम शासनाने केले पाहिजे, ही जबाबदारी स्वतःकडे घेतली पाहिजे; परंतु शासन नामानिराळे राहून फक्त बघ्याची भूमिका घेत असेल तर येथील युवकांचे भविष्य अंधकारमय आहे.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# कीर्तन



कविता शिंगणे गायधनी
संपर्क क्र. 7588181500

आधुनिक केसरी

**आजच्या धकाधकीच्या जीवनात आपण स्वानंद हरवून बसलेलो आहोत. आनंद आणि स्वानंद. स्वानंद म्हणजे आत्मानंद, ब्रम्हानुभव. खरंतर तो हक्काचा असतो आणि सहजी मिळण्यासारखा असतो पण कृत्रिम आणि भौतिक साधनांच्या गर्दीत आपलं मन ईश्वरापासून दूर जात आहे. ते परत भगवंताकडे वळवण्याचा साधा सोपा मार्ग म्हणजे नवविधा भक्ती आणि या नऊ पायऱ्यांवर चढायची पण गरज भासत नसते. कुठल्याही एका पायरीवरून आत्मीयतेने ईश्वराकडे पाहिले तरी हा ब्रह्मानुभव मिळू शकतो.सहजी मिळालेले दान भक्तीचे. भजन म्हणजे रसास्वादन. ईश्वराची भक्ती म्हणजे ईश्वराचा रस घ्यायचा.**

श्रवण, कीर्तन, नामस्मरण, पादसेवन, पूजन /अर्चन ,वंदन ,दास्य आणि सख्य या पायऱ्यांवर घडते ती नवविधा भक्ती. वयाच्या पाचव्या वर्षी मारुतीरायाचा अनुग्रह झालेले, लहानपणापासूनच विरागीवृत्ति, उदासीनता अंगी मुरलेली, प्रापंचिक विषयाबद्दल विलक्षण तिटकारा आणि सीतापती वाचून अन्य काही प्रिय नसलेले,निरंतर रामनामाचा छंद घेऊन आपल्यासाठी दासबोधाचे दालन उघडून देणारे समर्थ श्री रामदास स्वामी म्हणतात

**कीर्तने महादोष जाती ।कीर्तने होये उत्तम गती ।**
**कीर्तने भगवत्प्राप्ती ।येदर्थी संदेह नाही ॥ २७॥**
**कीर्तने वाचा पवित्र ।कीर्तने होय सत्पात्र ।**
**हरिकीर्तनें प्राणिमात्र ।सुसिळ होती ॥२८॥**
**कीर्तनें अवेग्रता घडे ।कीर्तने निश्चयें सापडे ।**
**कीर्तने संदेह बुडे ।श्रोतयावक्तयांचा ॥२९॥**
**सदा सर्वदा हरिकिर्तन ।ब्रह्मसुत करी आपण ।**
**तेणे नारद तोचि नारायण ।बोलिजेत आहे ॥३०॥**
**म्हणोनी कीर्तनाचा आगाध महिमा ।**
**कीर्तने संतोषी परमात्मा।**
**सकळ तीर्थे आणि जगदात्मा।हरिकीर्तनी वसे॥३१॥**
**दा.द.४.स.३**

का जावं हो मंडळी आपण कीर्तनाला....? तर समर्थ म्हणतात कीर्तनाने महादोष जातात. मोठाली पापे नाहीशी होतात. आता पापा पुण्याची व्याख्या करणे अवघड. तरी मनुष्याने जाणताअजाणता केलेली दुष्कर्म म्हणजे कर्माचे दोष,ग्रहदोष ,वास्तुदोष ,अन्नदोष, व्याधीदोष, दुःसंग ,व्यसन हे परिस्थितीजन्य दोष असतातच. हे दोष बाजूला जाऊन निःसंदीग्ध , निखळ निरंतर असा शुद्ध आनंद मिळवण्यासाठी कीर्तनाला जायलाच हवे महाराजा. समर्थ रामदास स्वामी म्हणतात कीर्तनाने भगवंताची प्राप्ती होतेच यात मुळीच शंका नाही. समर्थ पुढे म्हणतात कीर्तनाने वाचा पवित्र होते. वाचा म्हणजे वाणी. भगवंताने आपल्याला चार वाणी दिल्या आहेत. त्यातल्या वैखरी मधून , म्हणजे मुखाने माऊली म्हणतात हरि मुखे म्हणा हरि मुखे म्हणा पुण्याची गणना कोण करी म्हणजे नुसते तोंडाने हरिचे नाव घेतले तरी तुम्हाला इतके पुण्य मिळते की त्याची गणना नाही करता येत. लौकीकातली मोठी मोठी दुःखे जो हरण करतो त्यास मनुने हरि असे नाव दिले आहे. हरि म्हणजे सर्व पातके हरण करणारा आणि म्हणून अशा हरिचे नाव मुखाने घ्यायचे आहे. आणि अशा हरिचे नाव घेतले म्हणजे वाचा पवित्र होणारच. कीर्तनामध्ये भजन करताना हरिचे नाव सतत घेतले जाते म्हणून समर्थ रामदास म्हणतात कीर्तने वाचा पवित्र. कीर्तनाने



माणूस भगवंताला प्रिय होण्यास योग्य होतो. तो शीलवान आणि चारित्र्यवान बनतो. कीर्तनाने एकाग्रता येते. भगवंताबद्दल निश्चय मिळतो. संत श्री नारद मुनी निरंतर भगवंताचे कीर्तन करतात म्हणून लोक त्यांना नारायण म्हणतात. कीर्तनाने कमालीचा आनंद मिळतो. आणि म्हणून समर्थ म्हणतात कीर्तन केले पाहिजे. कीर्तन ऐकले पाहिजे आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे भगवंताला स्वतःला कीर्तन आवडते. भगवंताला स्वतःला कीर्तनाने समाधान मिळते म्हणून कीर्तनात जायला हवे. कीर्तन करायला हवे.

जगद्गुरु तुकाराम महाराज म्हणतात,

**कीर्तन चांग किर्तन चांग ।**
**होय अंग हरिरूप ॥१॥**
**प्रेमे छंदे नाचे डोले ।**
**हरपले देहभाव ॥२॥**
**एकदेशी जीव कळा ।**
**हा सकळां सोयरा ॥३॥**
**तुका म्हणे उरला देव ।**
**गेला भेव त्याकाळे ॥४॥तु.गा.८५२**

अर्थात ते बजावून बजावून सांगतात की हरिचे कीर्तन करणे अतिशय उत्तम आहे कारण कीर्तन करणाऱ्याचा देह त्यामुळे हरिरूप होतो आणि म्हणून भगवंतावरील प्रेमाने, त्याच्या छंदाने, नाचावे ,डोलावे कीर्तनात म्हणजे देहभाव नाहीसा होतो.तुकाराम महाराज म्हणतात, तुका म्हणे त्याला गोडी कीर्तनाची । नाही आणिकांची प्रीति ऐसी ॥५॥ तु.गा.३०२६ म्हणजे हरिला कीर्तनाची फार गोडी आहे. त्याला बाकी काही आवडत नाही आणि म्हणून नारद त्रिलोक्यात कीर्तन करीत भ्रमण करतात, तर त्यांच्याबरोबर गोविंद सुद्धा कीर्तन ऐकत त्यांच्या बरोबर फिरतात.

संत श्री नामदेवांच्या शिष्या संत जनाबाई म्हणतात

**करू हरिचे कीर्तन।**
**गाऊ निर्मळ ते गुण ॥१॥**
**सदा धरू संतसंग ।**
**मुखी म्हणू पांडुरंग ॥२॥**
**करू जनावरी कृपा ।**
**रामनाम म्हणून लोकां ॥३॥**
**जनी म्हणे कीर्ती करू ।**
***नाम बळकट धरूं ॥४॥**

अर्थात संत जनाबाई पण तेच सांगतात की अगदी मनस्वी आनंदाने आपण हरिचे कीर्तन करू. त्याचे निर्मळ गान गाऊ. सदैव संतसंगती धरू आणि मुखाने म्हणजे वाचेने पांडुरंगाचे नाम घेऊ म्हणजे आपोआपच कीर्तीची ध्वजा फडकत राहील.

अजून एका अभंगात त्या म्हणतात,

**कीर्तनाचा रस आवडे नरासी ।**
**लागती पायांसी मुक्ती चा-ही ॥१॥**

म्हणजेच ज्याला प्रभूचे कीर्तन आवडते त्याच्या पायाशी चारही मुक्ती लोळण घेतात. माऊली पण तर हेच म्हणतात देवाचिये द्वारी उभा क्षणभरी । तेणे मुक्ती चारी साधियेल्या.

एकनाथी भागवतात श्री एकनाथ महाराज म्हणतात राम कृष्ण हरि गोविंद या नामाची गुंफण केलेली अनेक काव्य नाना छंदात रचून कीर्तनात म्हणावीत आणि भक्तीला बहर आणावा हरिनामाचा मोठा गजर करावा म्हणजे काळाचे भान उरणार नाही.

भागवतात म्हटले आहे,

यत्फलं नास्ति तपसा न योगेन समाधिना ।
तत्फलं लभते सम्यक्कलौ केशवकीर्तनात ॥६८॥
भा.प्र.स्कंद. प्र.अ.



अर्थात जे फळ तपस्या, योगसाधना आणि समाधीपासूनही मिळत नाही तेच फळ कलियुगात हरि कीर्तनाने चांगल्या प्रकारे प्राप्त होते.

कीर्तनाने भक्ती भाव प्रगट होतो. भगवत स्वरूपाची ओळख पटते. आत्मस्वरूपाची जाणिव होते. मोक्ष प्राप्त होतो. धन,कीर्ती, प्रतिष्ठा मिळते. संस्कृतीचे रक्षण होते. समाजाचे प्रबोधन होते. कीर्तनाच्या निमित्ताने समाज संघटित होऊन सदाचारणी आणि नीतिमान बनतो. पर्यायने राष्ट्राची, समाजाची सर्वांगीण उन्नती होते.

आज भागवत धर्म थोडा संकटात आहे या संकटातून समाज आणि राष्ट्राला तारुन नेण्याचे सामर्थ्य कीर्तनात आहे. आणि म्हणून कीर्तनाचे रंगी रंगायला हवेच. जय जय राम कृष्ण हरि चा जप करू आणि कीर्तनात दंग होऊन जाऊ.


# आणि तेच गीत सर्वाधिक लोकप्रिय ठरले....

आधुनिक केसरी

**काही काही वेळा असे होते, की आपण एखाद्या गोष्टीकडे दुर्लक्ष करतो आणि आपल्याला असे वाटत असते की त्या गोष्टीची आपल्याला काहीही गरज नसल्याने आपण त्याच्याशिवाय काम चालवून घेऊ ; पण प्रत्यक्षात मात्र तीच गोष्ट अत्यंत उपयुक्त ठरते. १९७९ साली प्रदर्शित झालेल्या के. विश्वनाथदिग्दर्शित `सरगम' या चित्रपटातील एका गीताची ही पडद्यामागील कथा ! या गीताचे ध्वनिमुद्रण झालेले होते आणि `सरगम'चे चित्रीकरण काश्मीरमधे सुरू होते. चित्रपट जवळ जवळ पूर्ण झाला होता. हे गीत चित्रित करण्याचा विषय निघाला तेव्हा के. विश्वनाथ म्हणाले, की आधीच या चित्रपटात बरीच गीते आहेत आणि ती सगळी चित्रितही झाली आहेत. मग आता हे गीत चित्रित करण्याची गरज काय ? आणि असे म्हणून त्यांनी ते गीत चित्रित करण्यास नकार दिला.**

यावर चित्रपटाचे निर्माते एन. एन. सिप्पी त्यांना म्हणाले, की आपण या सुंदर काश्मीरमधे हे गीत चित्रित करू आणि गरज भासली तर चित्रपटात समाविष्ट करू.

अखेर निर्मात्याच्या म्हणण्याला मान देऊन गीताचे चित्रीकरण करण्यात आले. चित्रपटाच्या प्रदर्शनाचा दिवस जवळ आला तेव्हा गीत चित्रपटात समाविष्ट करण्यात आले. चित्रपट प्रदर्शित झाला मात्र आणि या गीताने धमाल उडवून दिली. हे गीत चित्रपटाचे सर्वाधिक लोकप्रिय गीत ठरले.`सरगम' हा चित्रपट के. विश्वनाथ यांच्या १९७६ सालच्या `सिरी सिरी मुव्वा' या तेलुगु चित्रपटाचा हिंदी अवतार होता. `सिरी सिरी मुव्वा'ने अभिनेत्री जया प्रदा यांना दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत ओळख तर मिळवून दिलीच शिवाय त्यांना दाक्षिणात्य सुपर स्टार बनविले. म्हणून तेलुगु चित्रपट हिंदीत निर्माण करताना नायिकेच्या भूमिकेसाठी जया प्रदा यांनाच करारबद्ध करण्यात आले. एका मूक-बधिर मुलीची ही भूमिका होती. नायक होते ऋषि कपूर. साथीला डॉ. श्रीराम लागू, शशिकला, अरुणा इराणी, शक्ति कपूर, ओम शिवपुरी, असरानी, लीला मिश्र आदी नामवंत सहकलाकार होते. गीते आनंद बक्षी यांनी लिहिली होती आणि संगीत नियोजन लक्ष्मीकांत-प्यारेलालद्वयीने केले होते. या चित्रपटातील एकूण सात गीतांसाठी मोहम्मद रफी यांनी पार्श्वगायन केले होते. पैकी तीन द्वंद्वगीते त्यांच्याबरोबर लता मंगेशकर यांनी गायिली होती. ती तीन गीते अशी : "डफली वाले डफली बजा', "कोयल बोली दुनिया डोली'' आणि 'परबत के इस पार परबत के उस पार".




`सरगम'च्या काश्मीरमधील विविध बाह्यस्थळांवरील चित्रीकरणात सगळी गीते चित्रित करण्यात आली होती. केवळ `डफली वाले' हे गीत चित्रित व्हायचे बाकी होते. दिग्दर्शक विश्वनाथ यांनी या गीताची काही गरज नाही असे सांगताच निर्माते सिप्पी त्यांना म्हणाले, आपण अनायासे काश्मीरमधे आहोतच आणि गीतही आपल्या हाताशी आहे. त्याचे चित्रीकरण करून ठेवू; आवश्यकता वाटली तर ते चित्रपटात समाविष्ट करू अन्यथा या गीताशिवायच चित्रपट प्रदर्शित करू. सिप्पी यांनी इतके सांगितल्यावर विश्वनाथ त्यांना नाही म्हणू शकले नाहीत आणि अखेर त्यांनी `डफली वाले' चित्रित केले.

चित्रपटाचे शेवटचे चित्रीकरण पार पडल्यावर त्याचे संकलनही पूर्ण झाले. परंतु नेमके चित्रपट प्रदर्शित होण्याच्या वेळी हे गीत चित्रपटात समाविष्ट करण्यात आले. `सरगम' प्रदर्शित झाला आणि त्याने चित्रपटरसिकांमधे एकच धमाल उडवून दिली. तो कमालीचा यशस्वी ठरला. चित्रपटगृहात `डफली वाले' हे गीत संपताच प्रेक्षकांच्या मागणीखातर चित्रपटाचे प्रदर्शन थांबवून हे गीत पुन्हा दाखविले जात असे. प्रेक्षक खूष होऊन नोटा आणि नाणी पडद्याच्या दिशेने फेकत असत. प्रेक्षकांनी गीतावर उधळलेले असे पैसे मोजले असता ती रक्कम १ कोटी रुपयांच्या घरात गेली असल्याचे आढळून आले. म्हणूनच या गीताला `१ कोटीचे गीत' असेही संबोधण्यात येते. या चित्रपटाने पैसा आणि अमाप प्रसिद्धी मिळविली इतकेच नव्हे तर जया प्रदा यांना एका रात्रीत हिंदी चित्रपटसृष्टीची लोकप्रिय अभिनेत्रीही बनविले. शिवाय त्यांना हिंदी चित्रपटातील भूमिकेसाठी पहिले सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचे `फिल्मफेअर' पारितोषिकही मिळवून दिले.



अनिल रा. तोरणे
तळेगाव दाभाडे, पुणे
९२२६१६०६५४

# प्रेमळ व्यक्तिमत्त्वाचे प्रा. दिलीप भालेराव



डॉ. मारोती द. कसाब
संपर्क क्र. 9822616853

आधुनिक केसरी

**काही माणसं जन्माने मोठी होतात तर काही कर्माने. ज्यांना हजारो पिढ्यांपासून शिक्षणाचा कसलाही वारसा नव्हता अशा गावकुसाबाहेरच्या वस्तीतून पुढे येऊन नेटाने शिक्षण घेत समाजात स्वतःचं स्थान निर्माण करणारे व्यक्तिमत्व म्हणजे प्रा. दिलीप भालेराव सर..! प्रा. दिलीप भालेराव सरांचा जन्म जळकोट सारख्या डोंगराळ तालुक्यातील लाळी खुर्द या छोट्याशा गावात झाला. दोन भाऊ आणि तीन बहिणी अशा मोठ्या कुटुंबात ते लहानाचे मोठे झाले. त्यांचे प्राथमिक शिक्षण गावातीलच जिल्हा परिषद शाळेत झाले तर माध्यमिक शिक्षण कुमठा येथील सरस्वती विद्यालयात झाले.**

कुमठा येथील शाळेत चांगल्या गुणांनी मॅट्रिक उत्तीर्ण झाल्यानंतर दिलीप भालेराव सर हे उदगीर येथे दाखल झाले. येथील उदगिरी महाविद्यालयातून त्यांनी बी. ए. चे शिक्षण पूर्ण केले. त्याकाळी उदगीर शहर हे शिक्षणासाठी सुप्रसिद्ध असलेले मराठवाड्यातील एक नामांकित केंद्र होते. महाराष्ट्र, कर्नाटक आणि तेलंगणाच्या सीमावर्ती भागात वसलेले उदगीर हे शहर एक व्यापारी पेठ तर होतीच ; त्याचबरोबर सामाजिक, राजकीय चळवळीचे केंद्र म्हणूनही उदयास येत होते.

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . ना. य. डोळे यांच्या दूरदृष्टीच्या शैक्षणिक नेतृत्वात प्रा. दिलीप भालेराव सरांची जडणघडण झाली. ते जेव्हा उदयगिरी महाविद्यालयात बी.ए. करत होते, तो काळ म्हणजे सामाजिक चळवळींच्या भरभराटीचा काळ होता. उदगीर शहर हे समाजवादी, साम्यवादी विचारांनी त्याकाळी भारावलेले होते. अनेक वंचित समुहातील युवक या काळात उदगीर मध्ये सामाजिक अन्यायाविरोधात लढत होते. दलित पँथरची चळवळ सुरू होती. त्याच वेळेस जनता दलाची राजकीय वाटचाल सुरू झालेली होती. शेतकरी, कामगार, दलित , कष्टकऱ्यांची चळवळ या काळात फोफावत होती. या काळात जिल्हा परिषदेच्या मैदानावर अनेक नेत्यांच्या, विचारवंतांच्या सभा होत असत. दिलीप भालेराव सर हे आपल्या विद्यार्थी मित्रांसोबत अशा सभांना हजेरी लावत असत. त्यातूनच त्यांचा वैचारिक पिंड घडला आणि ते चळवळीत दाखल झाले. महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय म्हणजे त्या काळात युवकांच्या चळवळींचे ऊर्जा केंद्र बनले होते. प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, मनोहर डाकरे, दिलिप भोगे, अविनाश तलवारे आणि दिलीप भालेराव असे वंचित समूहातील विद्यार्थी कार्यकर्ते याच काळात घडत होते. सामाजिक भान जागृत होत असलेला हा काळ होता. दिलीप भालेराव सरांनी या काळात आपले वाचन प्रचंड वाढवले. राष्ट्रीय सेवा योजनेचे ते उत्कृष्ट स्वयंसेवक होते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातून त्यांचे व्यक्तिमत्व खऱ्या अर्थाने घडले. या काळात महाराष्ट्र उदगिरी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने वादविवाद मंडळ कार्यरत होते. मंडळामार्फत महाराष्ट्रातील नामांकित वक्ते, कार्यकर्ते आणि नेत्यांना आमंत्रित करण्यात प्रा. दिलीप भालेराव सरांचा सिंहाचा वाटा होता. महाविद्यालयीन चळवळीतून प्रा. दिलीप भालेराव सरांचे व्यक्तिमत्व घडत होते. याच काळात मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी झालेल्या आंदोलनात भालेराव सरांनी हिरीरीने सहभाग नोंदवला. याच काळात नव्याने साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे यांच्या जयंत्या उदगीर परिसरातील खेड्यापाड्यात सुरू झालेल्या होत्या. अशा जयंतीच्या कार्यक्रमाला दिलीप भालेराव सर हे वक्ते म्हणून जाऊ लागले. त्यातून त्यांची सामाजिक जाणीव अधिकच प्रगल्भ होत गेली.

उदगीर येथे सध्या बीदर -नांदेड रोडवर साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा जो भव्यदिव्य पुतळा उभा आहे, त्याचे श्रेय दिलीप भालेराव सरांसह त्यांच्या मित्रांना जाते. कालवश माधव लांडगे, गोविंद गायकवाड, माजी नगरसेवक दादाराव कांबळे, बन्सीलाल कांबळे यांच्यासह दिलीप भालेराव यांनी रातोरात अण्णाभाऊंचा पुतळा उभा करून उदगीर मधील सामाजिक क्रांतीला सुरुवात केली. उदगीर परिसरातील दलित बहुजन समूहातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची प्रेरणा देण्यासाठी भालेराव सर हे आपल्या मित्रांसोबत गावोगाव हिंडत असत. दलित वस्त्यांमध्ये जाऊन शिक्षणाचे महत्त्व पटवून देत असत.

महाराष्ट्र उदगिरी महाविद्यालयात यशस्वीरित्या बीएचे शिक्षण घेतल्यानंतर दिलीप भालेराव सरांनी पदी उत्तर शिक्षणासाठी लातूर गाठले. लातूर मधील नामांकित अशा राजर्षी शाहू महाविद्यालयात त्यांनी भूगोल विषयात एम.ए. चे शिक्षण पूर्ण केले. त्याचबरोबर बी.एड. चेही शिक्षण पूर्ण केले.

१९९६-९७ या शैक्षणिक वर्षात दिलीप भालेराव सरांनी आपल्या गावाजवळच्या बेळ सांगवी येथे मा.ना. पाटील माध्यमिक विद्यालयात शिक्षकाची नोकरी पत्करली. नंतर ७ ऑक्टोबर १९९८ रोजी ते किसान शिक्षण प्रसारक मंडळाच्या महात्मा फुले कनिष्ठ महाविद्यालयात समाज शास्त्र व भूगोलाचे प्राध्यापक म्हणून ते रुजू झाले. महात्मा फुले महाविद्यालयात रुजू झाल्यापासून विद्यार्थी हेच दैवत मानून भालेराव सर कार्यरत राहिले.आपल्या विद्यार्थ्यांवर स्वतःच्या लेकराप्रमाणे प्रेम करणारा प्रेमळ शिक्षक मी सरांच्या रूपात पाहिला. सरांनी अकरावी बारावीला शिकवलेले विद्यार्थी आमच्याकडे वरिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेत असत तेव्हा ते केवळ सरांचेच नाव घेत असतात आणि गुणगान गात असतात. विद्यार्थ्यांना वैयक्तिक पातळीवर समजून घेऊन त्यांना आपल्या विषयाचे गांभीर्य समजावून सांगत ज्ञान देण्यात भालेराव सर पारंगत आहेत, हे मी स्वतः आजमावले आहे.

भालेराव सरांचे विद्यार्थी सामाजिक जाणिवेचे असतात, हे मी स्वतः अनुभवले आहे. वास्तविक पाहता भालेराव सरांना राजकीय वारसा लाभलेला आहे. ते स्वतः पाच वर्ष आपल्या गावाचे लोकप्रिय सरपंच होते. आपल्या सरपंचकीच्या काळात त्यांनी लाळी खुर्द या गावाचा कायापालट केला. गावात विकासाच्या अनेक योजना राबविल्या. पुढेही राजकारणात त्यांना स्वतःचे करिअर करता आले असते. मात्र प्राचार्य डॉ. ना.य. डोळे यांचे सामाजिक संस्कार घेतलेले भालेराव सर हे राजकारणापेक्षा शैक्षणिक क्षेत्रात रमताना मी पाहिले आहेत.

अत्यंत दिलदार स्वभावाचा प्रेमळ गुरु म्हणून अनेक विद्यार्थ्यांनी त्यांची ओळख मला करून दिली आहे. सर नियत वयोमानानुसार ३० सप्टेंबर २०२३ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. दिलीप भालेराव सर म्हणजे उदगीर, अहमदपूर, जळकोट परिसरात एक आदर्श शिक्षक म्हणून ओळखले जातात. त्यांना विविध सामाजिक संघटनांचे आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेले आहेत. सरांना आरोग्य संपन्न दीर्घायुष्य लाभो, आणि त्यांचे पुढील आयुष्य समाजसेवेत संपन्न होवो हीच मंगल कामना.



# चांगल्याचे भले

आधुनिक केसरी

बिरबल एक ईमानदार व धर्मप्रिय व्यक्ती होता. तो दररोज कशाचीही अपेक्षा न करता देवाची प्रार्थना करायचा. देवाच्या प्रार्थनेमुळे त्याला आत्मिक समाधान व मानसिक बळ मिळत असे. बिरबल नेहमी म्हणायचा की 'देव जे काही करतो, ते मनुष्याच्या भल्यासाठीच असते'. कधी कधी आपल्याला असे वाटते की देवाचे आपल्याकडे लक्ष नसावे परंतु असे नसते. कधी कधी देवाच्या आशीर्वादाला लोक शाप समजण्याची चूक करतात. तो आपल्याला थोडे कष्ट देतो, कारण आपण येणाऱ्या मोठया संकटापासून स्वतःला वाचवू शकू. एका दरबाऱ्याला बिरबलचे हे बोलणे आवडत नसे. एक दिवस तो दरबारामध्ये बिरबलला उद्देशून बोलला - हे बघ, देवाने माझ्याबरोबर काय केले. काल रात्री जेव्हा मी जनावरांसाठी चारा कापत होतो तेव्हा अचानक माझ्या हाताची करंगळी कापली गेली. तरी तू असेच बोलशील की देव जे काही करतो, ते मनुष्याच्या भल्यासाठीच करतो ?

काही वेळ स्तब्ध राहून बिरबल बोलला - माझा आत्तापण देवावर विश्वास आहे कारण 'देव जे काही करतो, ते मनुष्याच्या भल्यासाठीच असते'. हे ऐकून तो दरबारी नाराज झाला व म्हणाला - माझी करंगळी कापली गेली तरीपण बिरबलला यात चांगलेच काहीतरी दिसते आहे. माझे कष्ट जसे काहीच नाही. अन्य दरबाऱ्यांनी पण त्या दरबाऱ्याच्या सुरात सूर मिळविला. तेव्हा बादशाह अकबर बिरबलला बोलला मी पण देवावर विश्वास ठेवतो पण, मी तुझ्याशी सहमत नाही. या दरबाऱ्याच्या बाबतीत असे काहीही घडलेले नाही की ज्यासाठी देवाची प्रशंसा केली जावी. बिरबल स्मितहास्य करत बोलला - 'ठिक आहे महाराज, आता योग्य वेळ आल्यावरच आपल्याला कळेल'.

तीन महिन्यानंतर करंगळी कट झालेला दरबारी घनदाट जंगलात शिकारासाठी गेला. जेव्हा तो हरणाच्या मागे गेला तेव्हा तो बाकीच्या सहकाऱ्यापासून वेगळा झाला, व अचानक त्याला आदिवासींच्या एका घोळक्याने पकडले जे की देवाला प्रसन्न करण्यासाठी नरबळीवर विश्वास ठेवायचे. त्यामुळे ते आदिवासी त्या दरबाऱ्याला पकडून बळी देण्यासाठी मंदिरात घेऊन गेले. पण जेव्हा मंदिराच्या पुजाऱ्याने दरबाऱ्याच्या शरीराचे निरिक्षण केले तेव्हा त्याला त्याच्या हाताची करंगळी कापलेली असल्याचे आढळले व तो बोलला की 'बळीसाठी हा व्यक्ती चालणार नाही'. मंदिराचा तो पुजारी बोलला - जर आपण हाताला नऊ बोटे असलेल्या माणसाचा बळी दिला तर आपले देव प्रसन्न न होता क्रोधित होतील कारण, त्यांना अपूर्ण बळी आवडत नाही व आपल्याला महामारी, पूर किंवा दुष्काळाला सामोरे जावे लागेल. त्यामुळे या दरबाऱ्याला सोडून देणे हे आपल्यासाठी उचित असेल व त्यांनी त्या दरबाऱ्याला सोडून दिले. दुसऱ्या दिवशी, तो दरबारी दरबारात बिरबलकडे जावून रडायला लागला तेव्हा महाराज पण दरबारात आलेले होते व त्या दरबाऱ्याला बिरबलकडे रडताना पाहून चकित झाले. तुला काय झाले, तु का रडतो आहेस? - महाराज अकबरने दरबाऱ्याला विचारले. उत्तरादाखल दरबाऱ्याने घडलेला पूर्ण वृत्तांत महाराजांना सांगितला व तो म्हणाला - आता माझा विश्वास बसला आहे की, 'देव जे काही करतो, ते माणसाच्या भल्यासाठीच असते'. जर माझी करंगळी कापली गेली नसती तर मला बळी चढविले गेले असते त्यामुळे मी रडत आहे, पण हे माझे आनंदअश्रू आहेत कारण मी जिवंत आहे. बिरबलच्या देवावरचा विश्वासावर शंकेच्या दृष्टिने बघणे ही माझी चूक होती. महाराज अकबर सौम्य हासत दरबाऱ्याकडे बघत होते, जे खाली मान घालून शांतपणे उभे होते. महाराजांना आता अभिमान वाटत होता की बिरबल सारखा बुध्दिमान व्यक्ती आपल्या दरबारातील एक आहे. **तात्पर्य - जे काही होते ते चांगल्यासाठीच होते.**

# शांती क्षमा दया अलंकार अंगी । अभंग प्रसंगी धैर्यवंत ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**संतांचे जीवन आणि लेखन नेहमीच सर्वसामान्य माणसांना नित्य नित्य प्रेरणादायी राहिले आहे. तेराव्या शतकात नामदेव-ज्ञानदेवादी संतांनी अठरापगड जातीतील बहिष्कृत, उपेक्षित, वंचित, बंडखोर, लेखक, कवी, भजन-कीर्तन करणाऱ्या लोकांना पंढरीच्या वाळवंटात एकत्र आणून इथल्या प्रस्थापित, भेदभाव करणाऱ्या थोतांड, कर्मकांड धर्माविरुद्ध आवाज उठवला. वेद आणि त्यापासून निर्माण झालेला समानतेचा वैदिक धर्म श्रेष्ठ असतांना तत्कालीन धर्ममार्तंडांनी भोळा-भाबडा समाज चार वर्णांच्या चिरेबंद भिंतीत बंदिस्त केला आणि हसता-खेळता सामान्य माणूस पिचला गेला. संत नामदेवांनी आपल्या घरातील दासी संत जनाबाई यांच्याकडून प्रेरणा घेऊन अभंग लिहायला, भजन करायला आणि शेवटी कीर्तन करायला प्रारंभ केला.**

**तुकारामनीती**
**भाग -69**

तेंव्हा संत ज्ञानदेवादी भावंडे पैठणला आपल्याच यातीच्या माणसांकडून पावलोपावली छलळी जात होती. धर्ममार्तंडांनी संन्याशाची मुले म्हणून हिणवल्यानंतर त्यांचे माय-बाबा नामे विठ्ठलपंत आणि रुक्मिणी या दांपत्यांना त्यांच्या मुलांना शुद्धीपत्रक देण्याच्या नावाखाली देहांत प्रायश्चित म्हणजेच आत्महत्या करायला भाग पाडले. चिमुकली मुक्ताई आणि बिचारी तीनही भावंडे अनाथ झाली! आई-बाबांच्या मृत्युनंतरसुद्धा त्यांना शुद्धीपत्र मिळाले नाही. निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताई यांना कुणीही वाली राहिले नाही. ते बेवारस झाले. अक्षरशः त्यांना पैठणमधून हाकलून देण्यात आले. सैरभैर झालेले चारीही भावंडे निराश्रित झाली. कुठे जावे? काय खावे? कुठे राहावे? असे एक ना अनंत प्रश्न आ वासून समोर उभे असतांना कुणीतरी त्यांना नामदेवादी संतांनी चंद्रभागेच्या वाळवंटात अठरापगड जातींना एकत्र करून भजन-कीर्तनाच्या माध्यमातून समतेचा आणि प्रबोधनाचा ज्ञान यज्ञ सुरु असल्याचे कळवले. मुळात नाथपंथी असणाऱ्या ज्ञानदेवादी भावंडांना हा सरळ-सोपा आणि सर्वांना सहज रुजेल-पचेल-समजेल असा भागवत सांप्रदायाचा म्हणजेच वारकरी सांप्रदायाचा अंगीकार करायचे ठरवले. त्यांतर त्यांनी शुद्धिपत्राचा नाद सोडून दिला. ज्ञानदेवादी भावंडे आपल्या क्रांतीयज्ञात सामील झालेले पाहून संत नामदेवांना अतीव आनंद झाला. तात्काळ त्यांनी एकमेकांना आलिंगन दिले आणि ज्ञानदेवांना प्रमुख म्हणून घोषित केले. याचा परिणाम असा झाला की; इतर उपेक्षित-वंचित जातीतील लोक पटापट वारकरी सांप्रदायाशी येऊन मिळू लागले. त्यांना सहज-सोपा, कर्मकांडरहित, समता, एकोपा, जिव्हाळा, आपुलकी दाखवणारा वारकरी सांप्रदाय सोपा वाटू लागला. समतेचे मूळ तत्व असलेल्या वैदिक धर्माशी नाळ जोडणारा, भेद न मानणारा वारकरी सांप्रदाय त्यांना आपला वाटू लागला.

चार वेद अपौरुषीय नाहीत. असे म्हणणे हे त्या संशोधक, विद्वान लेखकांचा उपमर्द करणे होय. वेदांचा निर्माता कुणीतरी ईश्वरतुल्य ज्ञानवंत, प्रज्ञावंत, संशोधक व्यक्ती असला पाहिजे याचा अनेक जणांनी अनेकवेळा आपल्या लेखनात आणि व्याख्यानात उल्लेख केला असून त्याचा आणखी एक संदर्भ देऊन मला हे सिद्ध करावयाचे आहे. महान गांधीवादी विचारवंत श्री विनोबा भावे यांनी अनेक ग्रंथांचे ससंदर्भ लेखन आणि विवेचन केले आहे. त्यात त्यांनी 'वेदामृत' हा ऋग्वेदातील ८३ मंत्रांचे विवेचन करणारा ससंदर्भ ग्रंथ लिहिला असून त्यात विनोबाजी अनेक गोष्टी सरळ सरळ स्पष्टपणे मांडतात. ऋग्वेदातील पहिल्या मंडलात येणाऱ्या

'विश्वं पुष्टं ग्रामे अस्मिन अनातुरम्।'

या बाराव्या श्लोकाचा अर्थ मोठा मजेशीर आणि वाचकांचे, चिंतकांचे डोळे उघडणारा आहे. आपल्यावेदामृतया ग्रंथात श्री विनोबा भावे लिहितात, "आदिवासी संस्कारहीन आहेत असे म्हटले जाते, परंतु वस्तुस्थिती ही आहे की; त्यांच्यापाशी भारताचे मूळ संस्कार आहेत. आजच्या आदिवासी भाषांमध्ये गीता, कुराण, बायबल यांच्यासारखा ग्रंथ नाही हे खरे आहे; परंतु त्यांचा ग्रंथ प्राचीन आदिवासींच्या भाषेत लिहिलेला आहे. जगातला आदि ग्रंथ म्हणजे ऋग्वेद. तो आदिवासींचा ग्रंथ आहे. आदिवासींचे संस्कार, भावना, उपासना, जीवन पद्धती हे सगळे ऋग्वेदात फार उत्तम रितीने पाहायला मिळते." (पृष्ठ क्र.१० HTTP://43.241.36.232//DOWNLOADS/BOOKS/VEDAMRUT-MARATHI.PDF) यामुळेच प्राचीन मूळ ग्रंथ वेदांचे समता तत्वज्ञान अवलोकन करणारा, अंगीकार करणारा वारकरी सांप्रदाय सर्वच संतांनी आपलासा केला. या विचारांचा नामदेव-ज्ञानदेवांनी भारतभर प्रसार-प्रचार केला. उच्च-नीचता, श्रेष्ठ-कनिष्ठता, ज्ञानी-अज्ञानी, लहान-मोठा, वरचा-खालचा हा भेद समूळ संपुष्टांत आणला. याचा परिणाम म्हणजे वेदांच्या समानतेवर आधारलेला भागवत सांप्रदाय म्हणजेच वारकरी सांप्रदाय जनसामान्य लोकांना आकर्षित करणारा ठरला. लवकरांत लवकर लोकांना आवडायला लागला.

हेच समतेचे तत्व संत तुकारामांच्या घरात मागील अनेक वर्षांपासून पिढ्यानपिढ्या अखंडपणे सुरूच होते. असे असले तरी दुर्दैवाने तत्कालीन समाज वर्णव्यवस्थेने चिरेबंद करण्यात आला होता. याच अनुषंगाने संत तुकोबाराय

घोकाया अक्षर । मज नाही अधिकार॥
सर्वभावे दिन । तुका म्हणे यातीहीन॥

अशी स्वतःची मर्यादा स्पष्ट करतात. त्यांतर त्यांनी वेद, उपनिषदे, श्रुती, स्मृती, नीती इत्यादी ग्रंथांचे अवलोकन केल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की; मूलतः वेद माणसामाणसात भेद करत नाहीत. श्रुती-स्मृती कोणताही भेद मानत नाहीत आणि त्यांचे समकालीन लोक वर्णव्यवस्था मानत होते. हे तुकोबांना प्राचीन ग्रंथात कुठेच सापडले नाही. त्यासाठी त्यांनी आज चिंतनासाठी निवडलेल्या अभंगापैकी पहिल्या अभंगात कोण ब्राह्मण नाही आणि पुढच्या अभंगात ब्राह्मण कोण आहे? हे ससंदर्भ सांगतात.

ब्राह्मण तो नव्हे ऐशी ज्याची बुद्धी। पहा श्रुतीमधी विचारूनी ॥१ ॥
जयाशी नावडे हरीनाम कीर्तन। आणिक नृत्य न वैष्णवांचे ॥धृ ॥
सत्य त्याचे वेळे घडला व्यभिचार। मातेशी व्यवहार अंत्यजाचा ॥३ ॥
तुका म्हणे येथे मानी आनसारीखे। तात्काळ तो मुखें कुष्ठ होय ॥४ ॥ (शा.अ.गाथा



अ.क्र.१२३४) आणि **ब्राह्मण तो याती अत्यंज असता । मानावा तत्वता निश्चयेशी ॥१ ॥ रामकृष्ण नामे उच्चारी सरळे । आठवी सांवळे रूप मनी ॥धृ ॥ शांती क्षमा दया अलंकार अंगी । अभंग प्रसंगी धैर्यवंत ॥२ ॥ तुका ह्मणे गेल्या षडउर्मी अंगें । सांडुनियां मग ब्रह्म चि तो ॥३ ॥ (शा.अ.गाथा अ.क्र.१२३५)**

हे दोन्ही दोन्ही अभंग एकमेकांना पूरक आहेत. पहिल्या अभंगात तुकोबाराय श्रुतीचा संदर्भ देऊन अब्राह्मण माणसांची लक्षणे सांगतात. ज्याला हरीनाम, कीर्तन, वैष्णवांचे नाचून भजन म्हणणे आवडत नाही तो ब्राह्मण नाही. तो अत्यंजापासून जन्मलेला आहे. जर तो माणसामाणसांत भेद करत असेल तर त्याच्या मुखाला तात्काळ कुष्ठ रोग होईल. याच्या उलट पुढील अभंगात ब्राह्मण कुणाला म्हणावे? हे सांगतांना ते लिहितात की; एखादा अत्यंज यातीचा जरी असेल तरी तो ब्राह्मण आहे, कारण तो सरळ रामकृष्ण नाम उच्चारतो. तो तात्काळ श्री पांडुरंगाचे सावळे रूप मनी आठवतो. त्याचबरोबर त्याच्या हृदयात शांती, दया, क्षमा हे सर्वश्रेष्ठ अळंकार विराजमान असून तो कठीण प्रसंगी धैर्यवंत असतो तोच खरा ब्राह्मण! त्याचप्रमाणे त्याच्यातील षडउर्मी म्हणजेच षडविकार जायला हवेत आणि असा असणारा सामान्य, कुणीही माणूस अक्षरशः केवळ ब्राह्मणच नाही तर तो प्रत्यक्ष ब्रह्मच असतो! यात पहिल्या अभंगात जगद्गुरू तुकोबाराय श्रुती ग्रंथांचा संदर्भ देतात.

असूर्या नाम ते लोका अन्धेन तमसावृताः। तांस्ते प्रेत्याभिगच्छन्ति ये के चात्महनो जनाः॥

या ईशावास्योउपनिषदाच्या या श्रुतीतील क्रमांक ३ च्या श्लोकाप्रमाणे "इहलोकी कर्मे करीत करीत आपल्याला आपले नाव करावे लागेल. केवळ वर्णाने कुणी श्रेष्ठ आहे असे म्हटल्यास तो केवळ आंधळा आहे. ज्याने त्याने स्वकर्माने जनमानसांत अत्मोद्धार करून घ्यावा." यावरून आपल्याला कोणत्याही वेदादी प्राचीन धर्म ग्रंथात कुणीही माणूस केवळ आणि केवळ तो कोणत्या वंशात, वर्णात अथवा यातीत जन्मला यावरून तो श्रेष्ठ ठरत नसून तो काय कर्म करतो? तो कसे वर्तन करतो? तो कुणासोबत राहतो? तो काय विचार व्यक्त करतो? एवढेच काय तो काय खातो? काय पितो? कोणते ग्रंथ वाचून त्याचे कसे विश्लेषण करतो? यावर ज्याचे त्याचे श्रेष्ठत्व अवलंबून असते.

वर्तमान मोठा धकाधकीचा आहे. आजकाल मोबाईलमुळे लोकांचे ग्रंथ वाचन खूपच घटले आहे. असे असले तरी दुसरीकडे वाचकांची संख्या झपाट्याने वाढते आहे. मिडीयावर भरपूर लोक वाचत आहेत. ही मोठीं सकारात्मक आणि आनंदाची बाब आहे. दुसरीकडे अनेक कीर्तनकार, प्रवचनकार मंडळी मोठ्या जोमात कीर्तन करतांना दिसत आहेत. ही आनंदाची बाब असली तरी, संतांच्या ज्या विचारांचा समाजात प्रचार-प्रसार व्हायला हवा त्या विचारांचा प्रचार-प्रसार होत नाही ही खेदाची बाब म्हणावी लागेल. अनेक कीर्तनकार आपल्या कीर्तनात केवळ संसाराच्याच गप्पा मारतात. जास्तीत जास्त पैसे मिळावे, जास्तीत जास्त कार्यक्रम व्हावे यासाठी आणि सवंग प्रसिद्धीपायी अनेक कीर्तनकार चिछोर विनोदाच्या पाठीमागे धावत आहेत. हा वारकरी सांप्रदायाचा घोर अपमान नाही का? वर्षभरात तुमचे किती कार्यक्रम झाले? त्यातून तुम्हाला किती अर्थार्जन झाले?

# भारतीय स्वातंत्र्याचे मूर्तिमंत साक्षीदार!




श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**आज दोन दिग्गज महापुरुषांची जयंती आहे. मोहनदास करमचंद गांधी हे भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील प्रमुख नेते आणि तत्त्वज्ञ होते. ते एक वकील, वसाहतविरोधी राष्ट्रवादी नेते आणि राजकीय नैतिकतावादी होते. ब्रिटीश राजवटीपासून भारताच्या स्वातंत्र्याच्या यशस्वी मोहिमेचे नेतृत्व करण्यासाठी महात्मा गांधींनी अहिंसक आंदोलनाचा वापर केला. नंतर जगभरातील अनेक नागरी हक्क आणि स्वातंत्र्य चळवळींना महात्मा गांधींकडून प्रेरणा मिळाली. महात्मा संस्कृत- महान आत्मा, पूज्य असा त्यांचा सन्माननीय उल्लेख प्रथम दक्षिण आफ्रिकेत १९१४मध्ये केला गेला. आता हा शब्द जगभरात त्यांच्यासाठी वापरला जातो. तर भारताचे दुसरे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांना १९६६ मध्ये मरणोत्तर भारतरत्न हा भारताचा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आला. ते "जय जवान आणि जय किसान!"**

ही उद्घोषणा कर्ते दयाळू व लोकांचे लाडके पंतप्रधान होत. "मूर्ती छोटी पण कीर्ती मोठी" म्हणून सर्वत्र परिचित होते. लेखरूपाने कृगोनि- श्री कृ. गो. निकोडे गुरूजींचा व आमच्या संपूर्ण प्रेस टिमचा त्यांना मानाचा लवून मुजरा... संपादक._

गुजरातमधील एका हिंदू कुटुंबात २ ऑक्टोबर १८६९ रोजी जन्मलेल्या आणि वाढलेल्या गांधींनी इनर टेंपल, लंडन येथे वकिलीचे शिक्षण घेतले. जून १८९१ मध्ये, वयाच्या २२ व्या वर्षी त्यांना व्यवसायासाठी बोलावण्यात आले. भारतात दोन अनिश्चित वर्षे राहिल्यानंतर, ते १८९३ मध्ये दक्षिण आफ्रिकेत एका भारतीय व्यापाऱ्याच्या दाव्यासाठी गेले. ते २१ वर्षे दक्षिण आफ्रिकेत कुटुंबासोबत राहिले आणि इथेच असहकार आणि अहिंसेच्या तत्त्वावर आधारित सत्याग्रहाचा उपयोग गांधींनी प्रथम केला. सन १९१५मध्ये वयाच्या ४५ व्या वर्षी ते भारतात परतले आणि लवकरच अन्यायकारक जमीनकर आणि भेदभावाच्या विरोधात शेतकरी, कामगार आणि शहरी मजुरांना आंदोलन करण्यासाठी संघटित करण्याचे ठरवले. इ.स.१९२१मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची सूत्रे सांभाळल्यानंतर गरिबी निर्मूलन, आर्थिक स्वावलंबन, स्त्रियांचे समान हक्क, सर्वधर्मसमभाव, अस्पृश्यता निवारण आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे स्वराज्य यासाठी देशभरात चळवळ चालू केली. गांधींनी भारतातील ग्रामीण गरिबांची ओळख म्हणून स्वतः कातलेल्या सुताचे धोतर आणि शाल अशी साधी राहणी स्वीकारली. त्यांनी शाकाहाराचा अवलंब केला आणि अनेकदा आत्मशुद्धीसाठी आणि राजकीय चळवळीसाठी साधन म्हणून दीर्घ उपवास केले. ते एका स्वयंपूर्ण निवासी समुदायात राहू लागले आणि साधे अन्न खाऊ लागले. गांधी हे आजीवन साम्प्रदायीकातावादाचे विरोधक होते आणि ते मोठ्या प्रमाणात सर्वधर्म आणि पंथ यांच्यापर्यंत पोहोचले. ढासळत जाणाऱ्या खिलाफत चळवळीला त्यांनी आधार दिला आणि ते मुस्लिमांचे नेते बनले. इ.स.१९३० मध्ये इंग्रजांनी लादलेल्या मिठावरील कराविरोधात त्यांनी हजारो भारतीयांचे ४०० किमी- २५० मैल लांब दांडी यात्रेमध्ये प्रतिनिधित्व केले. इ.स.१९४२मध्ये त्यांनी इंग्रजांविरुद्ध भारत छोडो आंदोलन चालू केले. या आणि यासारख्या इतर कारणांसाठी त्यांना भारतात आणि दक्षिण आफ्रिकेत अनेक वेळा तुरुंगवास भोगावा लागला. धार्मिक बहुलवादावर आधारित स्वतंत्र भारताच्या गांधींच्या दृष्टिकोनाला १९४०च्या दशकाच्या सुरुवातीला मुस्लिम राष्ट्रवादाने आव्हान दिले; ज्याने ब्रिटिश भारतातील मुस्लिमांसाठी स्वतंत्र मातृभूमीची मागणी केली होती. ऑगस्ट १९४७ मध्ये ब्रिटनने स्वातंत्र्य दिले, परंतु ब्रिटीश भारतीय साम्राज्य





हे दोन अधिराज्यांमध्ये विभागले गेले, एक हिंदूबहुल भारत आणि मुस्लिमबहुल पाकिस्तान. अनेक विस्थापित हिंदू, मुस्लीम आणि शीख त्यांच्या नवीन भूमीत जात असताना, विशेषतः पंजाब आणि बंगालमध्ये धार्मिक हिंसाचार सुरू झाला. स्वातंत्र्याच्या अधिकृत उत्सवापासून दूर राहून, गांधींनी पीडित भागांना भेट दिली आणि त्रास कमी करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतरच्या काही महिन्यांत त्यांनी धार्मिक हिंसाचार थांबवण्यासाठी अनेक उपोषणे केली. यातील शेवटचे उपोषण हे १२ जानेवारी १९४८ रोजी दिल्लीत सुरू केले, जेव्हा ते ७८ वर्षांचे होते. यामागे पाकिस्तानला देय असलेली काही रोख संपत्ती भरण्यासाठी भारतावर दबाव आणण्याचे अप्रत्यक्ष लक्ष्य देखील होते. भारत सरकारने धार्मिक दंगलखोरांप्रमाणेच माघार घेतली असली तरी, पाकिस्तान आणि भारतीय मुस्लिम, विशेषतः दिल्लीत वेढा घातल्या गेलेल्या, त्यांच्या बचावासाठी गांधीजी आग्रही होते, असा विश्वास भारतातील काही हिंदूंमध्ये पसरला. यापैकी एक नथुराम गोडसे हा पश्चिम भारतातील हिंदू राष्ट्रवादी होते. त्यांनी दि.३० जानेवारी १९४८ रोजी दिल्लीत एका आंतरधर्मीय प्रार्थना सभेत छातीत तीन गोळ्या झाडून महात्मा गांधींची हत्या केली. लाल बहादूर शास्त्री यांचा जन्म दि.२ ऑक्टोबर १९०४ रोजी मुगलसराय, उत्तर प्रदेश, भारत येथे झाला. ते एका विनम्र कुटुंबात वाढले आणि महात्मा गांधींच्या शिकवणींचा त्यांच्यावर खूप प्रभाव पडला. शास्त्री यांनी भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सक्रिय सहभाग घेतला आणि त्यांच्या सुरुवातीच्या काळात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये सामील झाले. सन १९४७मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर शास्त्री यांनी सरकारमध्ये विविध मंत्रीपदे भूषवली. कृषी आणि सामुदायिक विकास मंत्री म्हणून त्यांनी भारताची कृषी धोरणे तयार करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. सन १९६४मध्ये पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या अकाली निधनानंतर लाल बहादूर शास्त्री यांची भारताचे पंतप्रधान म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांनी ९ जून १९६४ रोजी पदभार स्वीकारला आणि अन्नटंचाई आणि प्रादेशिक तणाव यासह त्यांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागले. सन १९६५च्या भारत-पाक युद्धादरम्यान शास्त्री यांच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळातील निर्णायक क्षणांपैकी एक म्हणजे त्यांचे नेतृत्व. वाढत्या शत्रुत्वाचा सामना करताना, शास्त्रींनी धैर्य आणि दृढनिश्चय दाखवून भारताच्या सीमांचे रक्षण करण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. मनोबल वाढवण्यासाठी आणि लष्करी आणि कृषी या दोन्ही क्षेत्रांच्या महत्त्वावर जोर देण्यासाठी त्यांनी "जय जवान जय किसान"- सैनिकांचा जय हो, शेतकऱ्याचा जय हो ही प्रसिद्ध घोषणा दिली. युद्धविराम घोषित झाल्यानंतर शास्त्री जानेवारी १९६६ मध्ये ताश्कंद, उझबेकिस्तान येथे शांतता शिखर परिषदेत सहभागी झाले होते. दोन्ही राष्ट्रांमधील शांतता पुनर्संचयित करण्याच्या उद्देशाने त्यांनी पाकिस्तानचे अध्यक्ष अयुब खान यांच्यासोबत ताश्कंद घोषणापत्रावर स्वाक्षरी केली. तथापि, ११ जानेवारी १९६६ रोजी ताश्कंदमध्ये शास्त्रींच्या आकस्मिक आणि रहस्यमय मृत्यूने देशाला हादरा बसला. लाल बहादूर शास्त्री यांच्या राष्ट्रासाठी महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल, त्यांना मरणोत्तर भारतरत्न, भारताचा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आला. कला, साहित्य, विज्ञान, सार्वजनिक सेवा आणि सामाजिक सेवा यासह विविध क्षेत्रातील अपवादात्मक सेवेसाठी भारतरत्न प्रदान केला जातो. राष्ट्राच्या कल्याणासाठी शास्त्रींचे निःस्वार्थ समर्पण आणि आव्हानात्मक काळात त्यांचे नेतृत्व यामुळे ते या प्रतिष्ठित सन्मानाचे पात्र ठरले. त्याच दिवशी लाल बहादूर शास्त्री यांना भारतरत्न देऊन गौरविण्यात आले, ज्या दिवशी त्यांचे निधन झाले होते. त्यांच्या वारसाला श्रद्धांजली म्हणून हा पुरस्कार समारंभ मरणोत्तर झाला आणि देशासाठी त्यांनी दिलेल्या अमूल्य योगदानाची गौरवपूर्ण ओळख होती.

# आई-वडिलांची महती विशद करणारी 'सावली'



भगवान राईतकर
संपर्क क्र. 9730332151

आधुनिक केसरी

एक कवी आणि त्याची एक कविता निवडावी आणि त्यावर समीक्षापर मांडणी करावी , असा विचार काही दिवसापूर्वी मनात आला... आणि आज 'एक कविता' या सदराला सुरुवात करीत आहोत. ज्यांच्या कवितेला ग्रामीण संस्कृती आणि परिस्थितीचे चटके बसल्यामुळे ज्यांच्या कवितेत वैचारिक आणि सामाजिक प्रगल्भता आहे रचनेत आशयघनता आहे, असे ज्ञानदेवजी मानवतकर हे शिक्षकीपेशासोबत पत्रकारिता करणारे संवेदनशील कवी आहेत. मूळचे पिंपळखुटा या लोणार तालुक्यातील छोटेशा गावातले... नोकरी च्या निमित्ताने मेहकर येथे स्थायिक झालेले ज्ञानदेवजी मानवतकर यांची आई वडिलांचे महत्त्व विशद करणारे आणि भोगलेल्या परिस्थितीची जाणीव करून देणारी 'सावली' ही कविता आज आपण या सदरासाठी घेतली आहे.

ज्ञानदेवजी मानवतकर यांची 'सावली' ही चार कडव्यांची असून आई आणि वडिलांचे महत्त्व विशद करणारी आहे. या कवितेतील प्रत्येक कडव्यामध्ये मानवतकर यांनी उपमा अलंकाराचा उपयोग केलेला आहे. या सर्व उपमांतून त्यांनी मुलांच्या जडणघडणीमध्ये आई-वडिलांचे महत्त्व कसे असते ? आईवडील कोणत्या प्रकारची भूमिका मुलांचे संगोपन करताना पार पाडत असतात ? या आणि अशा प्रकारच्या अनेक गोष्टी त्यांनी विशद केलेल्या आहेत.

भर उन्हाळ्यामध्ये गडद सावली देणारे झाड म्हणजे आंबा. या आंब्याच्या झाडाची उपमा कवी ने बापाला दिली आहे. कवितेमधले आंब्याचे झाड हे कविता जीवनातील परिस्थिती ज्यांनी उन्हाळा याची जाणीव करून देणारा वाटतो. अशाही चटके देणाऱ्या परिस्थितीच्या उन्हाळ्यामध्ये बाप नावाचा आम्रवृक्ष हा सदैव मुलांना स्नेहाची आणि मायेची सावली उपलब्ध करून देत असतो. बाप मुलाला कोणत्याही कठीण परिस्थितीची जाणीव होऊ देत नाही. आई - वडिलांमधलं नातं हे सांगताना कवी म्हणतात की, आंब्याची सावली जशी असते. तशीच माय ही बापाची सावली होती. सावली जशी कधीच साथ सोडत नाही किंवा दुरावत नाही. त्याचप्रमाणे जीवनातील प्रत्येक प्रतिकूल परिस्थितीचा सामना करताना बापासोबत माय होती, असा आशय कवितेच्या पहिल्या कडव्यातून व्यक्त होतो. अशा प्रकारचा भाव व्यक्त करताना कवी ज्ञानदेव मानवतकर यांना आई-वडिलांच्या मध्ये सावळा विठ्ठल परमात्मा आणि रुक्माई माऊलीचे दर्शन घडते, असा आशय 'सावली' या कवितेच्या पहिल्या कडव्यामध्ये कवी मानवतकर व्यक्त करतात की, **आम्रतरु माझा बाप**

**माय त्याचीच सावली**
**जसा विठ्ठल सावळा**
**शोभे रुख्माई माऊली ||१||**

कवी ज्ञानदेव मानवतकर यांनी कवितेमध्ये बापाला हिमालयाची उपमा दिली. उन्ह, वारा आणि पाऊस याची कोणतीही तमा न बाळगता... म्हणजे अनंत अडचणी समोर असताना... खंबीरपणे... न डगमगता सामोरे जाणारे व्यक्तिमत्व असलेला बाप त्यांना हिमालयासारखा वाटतो. तर, कवीला माय ही गंगेच्या रूपात दिसली. माय ही मायेची अन् प्रेमाची गंगा आहे. या गंगेचा उगम बाप नावाच्या हिमालयातून होतो. अनंत अडचणी सोसणारा बाप. आपल्या मुलाला अडचणीची जाणीव व्हायला नको, यासाठी मायरूपी माईची गंगा मुलांसाठी समोर करीत असतो. मुलांच्या सुखासाठी आई-वडिलांचे हे नियोजन प्रत्येक मुलांसाठी हिमजलाची ममता देणारे असते. हिम हा शब्द बर्फाशी संबंधित असला तरी, बसलेल्या परिस्थितीच्या चटक्याला शांत करण्याची क्षमता आई आणि वडीलाच्या नमतेतून आम्हा लेकरांना मिळाली, असे कवी ज्ञानदेव मानवतकर कवितेच्या दुसऱ्या कडव्यात सांगतात की,

**बाप हिमालय जसा**
**माय गंगा रुप झाली**
**हिमजलाची ममता**
**आम्हा लेकरा मिळाली ||२||**

बाप हा मुलांसाठी अथांग आभाळ असतो. अथांग आणि आभाळ हे दोन्ही शब्द मुलांच्या जीवनामधील बापाची भूमिका विस्तृतपणे मांडणारे आहेत. अनेकदा बाप अथांग आणि आभाळ असल्यामुळे तो मुलांना कळत नाही ? माय मात्र श्रावण सरी झाल्याचे कवी सांगतात. श्रावण सरी हिरवळ निर्माण करतात. दुःखाची जाणीव होऊ देत नाही. तशी आईची भूमिका प्रत्येक मुलांच्या जीवनामध्ये असते. कष्टकरी आई वडिलांच्या घामाने जमीन चिंब चिंब न्हाली, असे कवी



म्हणतात. त्यामधून कवी हे आई-वडिलांचे शेतीशी असलेलं प्रामाणिक नातं कवितेतील तिसऱ्या कडव्यातून व्यक्त करतात की,

**बाप आभाळ अथांग**
**माय श्रावण सर झाली**
**मोती झाले घामाचे**
**धरा चिंब चिंब न्हाली ||३||**

आई-वडिलांनी खूप उपसलेले कष्ट आणि त्याची आठवण जागृत करून कवी त्या कष्टाची जाणीव कवितेच्या पहिल्या तीन कडव्यामध्ये करतात. परंतु माय आणि बाप आता जिवंत नाहीत. याची जाणीव झाल्यानंतर कवी हे प्रतिकूल परिस्थितीमध्ये न घाबरता महत्त्वकांक्षी असलेला बाप कवीला गरुडासारखा वाटतो. कोणत्याही परिस्थितीला सामोरे जावून यशाची झेप घेऊ पाहणारा बाप आता देहरुपाने राहला नाही. मायला घारीची उपमा देत कवी म्हणतात माय आकाशी उडाली. देह रूपाने ती गेली असली तरी सुद्धा 'चित्त तिचे पिलापाशी' याप्रमाणे अजूनही ती आमच्यावर मायेनं लक्ष ठेवून आहे. आम्ही तिचे मुलं असून आम्ही माय च्या छायेत वाढलो आणि घडलो. आम्ही घडलो असल्याची कबुली कवी ज्ञानदेव मानवतकर वाचकांना करून देतात. मुलांना घडविण्यासाठी परिस्थिती चांगली असावी लागते, असे नाही. आपण आपल्याशी प्रामाणिक असलो आणि परिस्थितीला हसतमुखाने समोर गेलो तर, मुलं घडविता येतात, असा आशय कवी ज्ञानदेव मानवतकर कवितेच्या शेवटच्या कडव्यामध्ये व्यक्त करतात की,

**गेली गरुडाची झेप**
**घार आकाशी उडाली**
**आम्ही वाढलो घडलो**
**पिलं तिच्या छायेतली ||४||**

प्रत्येक मुलाने जर आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवली तर त्याला स्वतःचा करिअर घडवायला सोपे होईल असं वाटतं.

# वाचन संस्कृती वाढवणे काळाची गरज



बुद्धभूषण चं. कांबळे
संपर्क क्र. 7498715661

आधुनिक केसरी

पुस्तके अथवा ग्रंथ यांच्या सारखा दुसरा गुरु नाही, असे म्हटले जाते. मनोरंजक आणि वैचारिक असे साधारणपणे पुस्तकांचे दोन प्रकार करता येऊ शकतात. मनोरंजनातून संदेश देणारी, वाचकांच्या भावनेला हात घालणारी पुस्तके ही लोकप्रिय असतात. या उलट बुध्दीला आव्हान देणारी वा चालना देणारी, वाचकांच्या तर्कशक्तीला जोखणारी पुस्तके मायंदळ वाचकांमध्ये लोकप्रिय ठरू शकतात. प्रत्येक पिढीची आवड-निवड ही आगळी वेगळी असते. त्यामुळे काळाच्या कसोटीवर टिकणारी आणि वाचकांच्या मनाला भावनारी पुस्तके ही चिरकाळ आनंद देणारी असतात.वाचनाची आवड असणारे वाचक सर्व प्रकारची पुस्तके विकत घेऊन वाचू शकत नाहीत. अशावेळी त्यांच्या मदतीला येते ते ग्रंथालय. या ग्रंथालयातील ग्रंथपाल हा मनमिळावू, सहकारी वृत्तीचा असेल तर वाचकाला हवे ते पुस्तक सहजतेने उपलब्ध होऊ शकते.

यशस्वी झालेल्या अनेक व्यक्तींच्या जीवनात ग्रंथालयांनी, पुस्तकांनी मोलाची भूमिका बजावली आहे. राज्यातील वाचनसंस्कृती वाढविणा-या अशा या ग्रंथालय चळवळीचा थोडक्यात घेतलेला आढावा. महाराष्ट्रातील जनतेचे सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक जीवन समृध्द करण्यासाठी तसेच वाचन संस्कृती वृध्दींगत करण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांनी महत्वाचे योगदान दिले आहे. यामध्ये शासकीय ग्रंथालयांचीही तितकीच महत्वाची भूमिका आहे. या ग्रंथालयांकडून वाचकांना अधिक चांगल्या सेवा देण्यासाठी, त्यांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी शासनाकडून विशेष प्रयत्न केले जात आहेत.
महाराष्ट्र हे पुरोगामी विचारांचे राज्य आहे. वाचनसंस्कृतीचा मोठा वारसा राज्याला लाभलेला आहे. राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांना सुमारे 200 वर्षांहून अधिक काळाचा वैभवशाली इतिहास आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात कोल्हापूर संस्थानामध्ये छत्रपतींनी शाहू महाराजांनी आपल्या जनतेला सुजाण करण्यासाठी 1945 साली पहिला सार्वजनिक ग्रंथालय कायदा केला. त्यांचे हे पाऊल सांस्कृतिक क्षेत्रात एक नवीन आदर्श निर्माण करणारे ठरले. त्यानंतर 1967 मध्ये राज्यात 'महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये कायदा' मंजूर करण्यात आला. व्यक्ती, समाज आणि राष्ट्र उभारणीत ग्रंथालयाचे योगदान महत्त्वाचे आहे. माहिती, ज्ञान आणि मनोरंजनाच्या अंगभूत गुणांमुळे 'ग्रंथ हेच गुरु' असे म्हटले जाते.
'वाचाल तर वाचाल' असा मंत्र सांगितला जातो, ते उगीच नाही. बौध्दीक आणि सामाजिक विकासासाठी ग्रंथ आणि ग्रंथालयांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. स्वातंत्र्य, समताआणि बंधुता या त्रिसूत्रीचा केवळ उक्तीतून उद्घोष न होता ती कृतीतून प्रत्ययास आणण्याचे कार्य पुस्तकांच्या रुपाने होऊ शकते. आजच्या पिढीवर असे संस्कार करण्यासाठी पुस्तकांशिवाय दुसरे प्रभावी माध्यम नाही. महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळीचा आढावा घेतांना असे दिसून येते की, राज्यामध्ये 1 राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, 6 शासकीय विभागीय ग्रंथालये, 35 जिल्हा ग्रंथालय कार्यालये, 6 विभागीय सहायक ग्रंथालय संचालक कार्यालये, दापोली येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती ग्रंथालय आणि 1 ग्रंथालय संचालनालय अशी एकूण 50 कार्यालये कार्यरत आहेत.
राज्यामध्ये मार्च 2016 अखेर 12 हजार 144 सार्वजनिक ग्रंथालयांना शासनमान्यता देण्यात आलेली आहे. त्यामध्ये 21 हजार 615 कर्मचारी कार्यरत आहेत. जिल्ह्यातील ग्रंथालय अधिकारी कार्यालयांचे पहिल्या टप्प्यात ई-ग्रंथालयात रुपांतर करण्यात येणार असून दुस-या टप्प्यात शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचे ई-ग्रंथालयात रुपांतर करण्याचे प्रस्तावित असल्याचे ग्रंथालय संचालक किरण धांडोरे यांनी सांगितले.
अहमदनगर येथे 1 फेब्रुवारी 2010 रोजी शासकीय जिल्हा ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली. सध्या ग्रंथालयात विविध विषयावरील एकूण 16 हजार 791 हून अधिक ग्रंथ, 20 दैनिके, 32 नियतकालिके नियमितपणे येत असतात. ग्रंथालयाचे एकूण 56 वाचक सभासद असून 6 संस्था सभासद आहेत. ग्रंथालयात अभ्यासिकेची स्वतंत्र व्यवस्था असून दररोज 25 ते 30 वाचक अभ्यासिकेत बसून स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करीत असतात. जिल्ह्यात वाचन चळवळीचा प्रचार आणि प्रसार व्हावा म्हणून तालुकानिहाय कार्यशाळा घेण्यात येत असतात, अशी माहिती जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुभाष नि.मुंढे यांनी दिली.
सन 2013-14 मध्ये विभागीय सहायक ग्रंथालय



संचालक कार्यालयाचे विकेंद्रीकरण होऊन या कार्यालयाचे शासकीय जिल्हा ग्रंथालय ऐवजी 'जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय' असा नावात बदल झाला आहे. त्या अनुषंगाने सहायक ग्रंथालय संचालक कार्यालयाचे काम त्या-त्या जिल्ह्याकडे वर्ग करण्यात आले आहे. त्याप्रमाणे अहमदनगर जिल्ह्यातील शासनमान्य ग्रंथालयांची तपासणी, अनुदानाचे वितरण करणे, नवीन व दर्जा वाढ ग्रंथालयांची तपासणी करुन अटींची पूर्तता करणा-या ग्रंथालयांची शिफारस करणे ही कामे या कार्यालयाकडून केली जातात. तसेच राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या विविध योजनांसाठी शासनमान्य ग्रंथालयांकडून प्रस्ताव मागवून व छाननी करुन शिफारस करण्यात येत असते.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय व डॉ. एस.आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक पुरस्कारासाठी प्राप्त प्रस्ताव तपासून शिफारस करणे अशी कामे जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडून केली जातात.
अहमदनगर जिल्ह्यात एकूण 514 शासनमान्य ग्रंथालये असून 5 उपकेंद्रे व 2 संशोधन संस्था व जिल्हा ग्रंथालय संघ कार्यरत आहे. यामध्ये अकोले 15, नगर 64, कर्जत 28, कोपरगाव 28, जामखेड 19, नेवासा 51, पाथर्डी 74 ,पारनेर 62, राहाता 13, राहुरी 43, शेवगाव 55, श्रीगोंदा 23, श्रीरामपूर 12, संगमनेर 27 अशी एकूण 514 शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये आहेत. तसेच 46 व्यक्ती सभासद असून 5 संस्था सभासद आहेत. या शिवाय दररोज 25-30 वाचक वाचन कक्षात बसून स्पर्धापरीक्षांचा अभ्यास करीत असतात. या कार्यालयाकडून वाचन प्रेरणा दिन, दिवाळी अंकांचे प्रदर्शन तसेच 10 फेब्रुवारी ते 12 फेब्रुवारी 2016 या कालावधीत ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. ग्रंथ अथवा पुस्तके हे माणसे घडविण्याचे काम करतात. ग्रंथांमुळे माणसे सुसंस्कृत, प्रगल्भ होत असतात. देशाचा विकास हा भौतिकदृष्टया कितीही असला तरी तो सांस्कृतिक, सामाजिक दृष्टीने किती विकसितआहे, हे महत्त्वाचे असते. त्यामुळे ग्रंथ चळवळीचा, वाचनसंस्कृतीचा विकास व्हायला हवा. भारतातील ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन हे आहेत. ग्रंथालय शास्त्राची पाच सूत्रे सांगितली जातात. ग्रंथालय हे उपयोगासाठी आहेत, प्रत्येकाला त्याचा ग्रंथ मिळाला पाहिजे, प्रत्येक पुस्तकाला त्याचा वाचक मिळाला पाहिजे, वाचकांचा वेळ वाचावा आणि ग्रंथालय ही वर्धिष्णू संस्था आहे, ही पंचसूत्री डोळ्यांसमोर ठेवूनच वाचन चळवळीची वाटचाल व्हायला हवी.
रेडिओ, टीव्ही, मोबाईल, इंटरनेटच्या काळात नवी पिढी वाचनापासून दूर जात असल्याचे चित्र दिसते. त्यांच्यावर सुसंस्कार करण्यासाठी केवळ पाठ्यपुस्तके पुरेशी नाहीएत. नव्या पिढीची मानसिकता ओळखून त्यांच्या सोयीने पुस्तके अथवा ग्रंथातील ज्ञान त्यांच्यापर्यंत पोहोचवावे लागेल. त्यासाठी आधुनिक माहिती व तंत्रज्ञानाची साधने वापरावी लागतील. असे केले तरच वाचनसंस्कृती वाढण्यास मदत होईल.

# मुक्काम पोस्ट जिथे असाल तिथे..

आधुनिक केसरी

**भारत विस्ताराने मोठे राष्ट्र आहे. भौगोलिक दृष्टया विस्तारलेल्या प्रांतात अनेक भाषा, जाती, धर्म असताना त्यांना स्वातंत्र्य चळवळीत एकसंघ बांधने. त्यासाठी लोकांशी संपर्कात राहाणे. लोकांनी लिहिलेल्या पत्रांना उत्तर देणे. त्या पत्रव्यवहारात अगदी सामान्य माणसांपासून तर इंग्रज व्हाईसराय यांच्यापर्यंतचा पत्रव्यवहार होता. त्या काळात लोकांशी जोडण्यासाठी पत्र हेच सर्वात प्रभावी माध्यम होते. भारताच्या विविध राज्यातून पत्र येते होती त्याप्रमाणे परदेशातूनही येत होती. निस्सिम बांधिलकी स्वीकारलेल्या शिष्यांची आणि त्यांच्यावरती टिका करणारे पत्रही त्यात असत. पत्राच्या माध्यमातून गांधींनी जनसंपर्क मोठया प्रमाणावर वाढविला होता. जगभरातील लोकांशी जोडले जाणे या मागे गांधी यांचा पत्रव्यवहार हेच कारण होते.**

गांधी युगाचा कालखंड जेव्हा समजावून घेण्याचा प्रयत्न होतो, तेव्हा कोणतेही समाजमाध्यमं,प्रसार माध्यमांचे फारसे आस्तित्व नव्हते.वर्तमानपत्रे होती पण ती काही रोज लोकांपर्यत जातील अशी व्यवस्था नव्हती.टपाल खात्याचा विस्तार फारसा झालेला नव्हता.जनतेतही साक्षरतेचे प्रमाण फारसे नव्हेत.तरी सुध्दा गांधी नावाच्या माणंसाचे आणि त्यांच्या विचाराचे गारूड समाजमनावर सतत होते त्यांच्या मूल्य आणि विचारधारेवरती प्रहार करणारी माणसं काही कमी नव्हती. अशा परीस्थितीत महात्मागांधी यांच्याशी संवाद साधनांची इच्छा जगभरातील अनेका असणे साहजिक होते. त्यात सामान्य माणसं होती तशी अनेक विचारवंत, शास्त्रज्ञ, लेखक,राजकीय नेतेही होते. खरेतर प्रत्येक माणंसाची उर्मी असते मला काही सांगायचे आहे .आपले कोणी तरी ऐकणारे आहे ही भावना आनंद देणारी असते. सर्वांचे ऐकून घेणारे महात्मा गांधी हे एक नाव होते. त्यामुळे सामान्य माणसं देखील गांधीजीशी पत्राने संवाद साधायचे. अगदी लग्नाचे निमंत्रण देणारे पत्रही त्यांना यायची. सुखदुःखाचा अनुभव सांगणारी पत्रांचा समावेश असायचा. गांधीजीचा लियो टॉलस्टॉय, आईन्स्टाईन यांच्याशी पत्रव्यवहार होता. त्या काळात संवादाकरीता पत्र हेच प्रभावी साधन होते. त्यात गांधीजी देशाच्या स्वातंत्र्याकरीता देशभर फिरत होते.त्यामुळे त्यांचे कोणतेही एक पत्रव्यवहाराचे ठिकाणनिश्चित नव्हते. अशावेळी भारतीय आणि परदेशी लोक पत्रावरती मोहनदास करमचंद गांधी ,महात्मा गांधी असे नाव लिहून पत्ता म्हणून जिथे असाल तिथे असे लिहून पत्र टपाल पेटी टाकत असायचे.. आणि आश्चर्य म्हणजे देशभर भ्रमंती करणारे गांधीजींना ती सर्व पत्रे मिळत होती. परदेशातील पत्र येतांना महात्मा गांधी-इंडिया, कधी महात्मा गांधी -वर्धा. महात्मा गांधी-येरवडा असे पत्ते लिहिलेले असत. जगाच्या पाठीवर असा नेता आणि त्यांच्यावरती प्रेम करणारी जनता इतरत्र कोणी पाहिली नसेल. इंग्रज राजसत्तेचे टपाल खाते असतांना देखील गांधीजीना पत्र पोहचविण्याची घेतली जाणारी काळजी देखील थक्क करणारी होती.वर्तमानात पत्ता असूनही पत्रे वेळेत पोहचत नाही अशावेळी ते टपाल खाते कौतूकाला पात्र ठरते. गांधीजीना दिवसभरात जी काही पत्र यायची त्यातील पत्राचे आशय वेगवेगळे असायचे.त्यांच्या समोर ती सर्व पत्र सारांशरूपाने विषद केली जायची.गांधीजीनी ती सर्व पत्र ऐकून घेतल्यानंतर त्यातील कोणत्या पत्राला आपण उत्तर देणे अपेक्षित आहे ते ठरवायचे. मग ती पत्र स्वतःकडे घेत असे आणि उर्वरीत पत्राची उत्तरे लिहिण्यासाठी मदतनीसांना सांगितले जात.

कोणत्या पत्राला काय उत्तरे द्यायचे हे देखील गांधीजी सांगत असे.एकाचवेळी इतक्या विविध स्वरूपातील पत्र आणि त्यांचे विषय भिन्न असतांना देखील गांधीजी उत्तर देत होती हे विशेष.हा माणूस एकाचवेळी इतक्या विविध विषयांची हाताळणी कसा करीत असेल असा प्रश्न पडतो. गांधीजीचे पत्राला उत्तरे देखील फार मोठी नसायची.

एकदा गांधीजीनी स्वातंत्र्य चळवळ गतीमान करण्याची लढाई म्हणून मिठाच्या सत्याग्रहाची घोषणा केली. मिठाच्या सत्याग्रहाने स्वातंत्र्य कसे मिळणार असा प्रश्न अनेकांना पडला होता. त्यांच्या या निर्णयावर अनेकांनी टिका केली. टिका करणारे केवळ विरोधक होते असे नाही तर काँग्रेसचे अनेक जेष्ठ नेत्यांचाही समावेश होता. मोतीलाल नेहरू यांनी देखील टिका केला होती. गांधीजीच्या या निर्णयाविरोधात त्यांनी गांधीजीना खरमरीत पत्र लिहिले. असा सत्याग्रह करून काही स्वातंत्र्य मिळणार नाही असा तो नाराजीचा सूर होता.एकूणच पत्र नाराजी व्यक्त करणारे होते. त्यांच्यासोबत इतरही अनेक जन होते. नेहरूच्या पत्राला उत्तर देतांना गांधीजीनी फक्त लिहिले " करके देखो..".खरेतर मिठाचा सत्याग्रह महत्वाची भूमिका पार पाडेल असे कोणालाच वाटत नव्हते.. अगदी ब्रिटीशांना देखील त्या आंदोलनाची शक्ती लक्षात आली नव्हती .मात्र जेव्हा आंदोलन सुरू झाले तेव्हा काही दिवसात त्या आंदोलनांची धग इंग्रजांच्या लक्षात आली. त्यांनी आंदोलन कर्त्यांना



अटक करण्यास सुरूवात केली.त्यात नेहरू देखील होते. मग त्यांनी गांधीना पत्र लिहिले.. " करके देखा ". गांधीजींनी स्वातंत्र्याच्या चळवळीत अत्यंत साधी सोपी हत्यारे लोकांच्या हाती दिली होती..पण ती प्रचंड शक्तीशाली होती हे सजहतेने लक्षात येते. श्रीपाद नावांच्या तरूणांचे लग्न जमले म्हणून.त्यांनी गांधीजीना लग्नाच्या संदर्भाने पत्र पाठविले होते.त्या पत्राला उत्तर देतांना गांधीजीनी लिहिले " तुझे पत्र मिळाले. तुझ्या मिश्रविवाहाबद्दल अभिनंदन. तुझे हे लग्न भोगासाठी न होता त्यागासाठी होईल आणि त्या योगे तुझी सेवाशक्ती निदान दुप्पट वाढेल अशी मी आशा करतो. भाई जोशींना मी स्वतंत्र पत्र लिहीत नाही ". गांधीजीच्या प्रत्येक पत्रात जगण्याकडे कसे पाहावे याचे जणू तत्वज्ञान असायचे.विवाहाचा नेमका अर्थ काय आणि त्यातून आपले सामाजिक दायित्व कसे निभवावे याबददल ते त्या पत्रात बोलतात. विवाह म्हणजे भोग अशी सामान्य माणंसाची धारणा आहे पण विवाहाकडे त्याग म्हणून पाहाण्याची दृष्टी ते देऊ पाहाता आहेत. गांधीवाद नावाचा कोणताही विचार नाही असे गांधीही सांगत होते. मात्र गांधीजीचा जीवन प्रवास आणि त्यांच्या पत्रव्यवहारातील अधोरेखित झालेला विचार हा गांधीजीची जीवनदृष्टी अधोरेखित करणारा आहे. गांधीजीच्या संबंधाने लिहिलेल्या एका खंडात त्यांनी अडीच महिन्यात सुमारे सातशे पत्र लिहिली होती असा उल्लेख सापडतो.एकदा रणजीत कुमार सील नावाचा तरूण त्यांचे गुरू गोविंददास कौन्सुल यांनी लिहिलेले MAHATMA GANDHI: THE GREAT ROGUE OF INDIA हे पुस्तक भेट देण्यासाठी निघाले होते या पुस्तकात महात्मा गांधीवरती प्रचंड टीकेची झोड होती. ते पुस्तक रणजीत गांधीना देणार होते. त्यांनी रेल्वेच्या प्रवासात असतांनाच गांधीजीच्या हाती दिले. गांधीनी काही वेळ चाळले आणि त्यांनी तात्काळ अभिप्राय दिला .ते म्हणतात " मी नुकतेच तुमचे पुस्तक वरवर चाळून पाहिले. पुस्तकाचे मुखपृष्ठ अथवा आतील मजकूर यांच्या विरुद्ध मला काहीच म्हणावयाचे नाही. जी पद्धत तुम्हाला योग्य वाटेल त्या पद्धतीने आपले विचार व्यक्त करण्याचा तुम्हाला पूर्ण अधिकार आहे. आपल्या विरोधात लिहिलेल्या, खरमरीत टिका केलेले पुस्तक हाती पडल्यानंतर देखील गांधीजी इतक्या सयंमाने पत्र लिहून अभिप्राय देतात ही गोष्ट त्यांच्या साधूपणाची साक्ष देते. हा अभिप्राय वाचून रणजित सील या तरूणालाही धक्का बसला असेल. व्यक्तीचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य न नाकारणारे गांधीजी म्हणजे अवघ्या जगासाठी लोकशाही स्वातंत्र्याची पाऊवाटेचा धडा गिरविणारी मूल्यांची व्यवस्था वाटते.त्यामुळे गांधी केवळ विचार बोलत होते असे नाही तर त्यांच्या जगण्यातच विचाराचे प्रतिबिंब होते. त्यांची पत्रे वाचली तरी जगण्याची दृष्टी अधोरेखित होते. गांधीजीचे पत्र आपल्याला आले ही गोष्ट अनेकांना जीवन आनंद देणारी आहे. त्यातून त्यांची गांधी निष्ठा वाढत गेली. अनेकांनी त्यांची पत्र जीवनभर जपून ठेवली आहे. त्यांच्या पत्राच्या विचाराने भारावलेली अनेक मंडळी जीवनभर त्यांच्या जीवन तत्वज्ञानावर जगत राहिली. पत्रातील विचारावर प्रेम करणारी माणंस बदलली आणि त्यांच्यासोबत असलेली माणंस विचाराने बदलली. हा प्रवास पत्राचा परीणाम करणारा होता. त्यामुळे गांधीना देशात आणि परदेशात देखील मोठा जनसंपर्क होता. कोणतेही संपर्काचे साधन नसताना केवळ पत्रावरती हा माणूस जगाच्या कानाकोप-यात पोहचला. केवळ नावं नाही तर विचार आणि जगात त्यांना अनुयायी देखील मिळाले. त्यांनी लिहिलेल्या पत्राचे अगदी अलिकडे देखील लिलाव होतात तेव्हा लोक ते पत्र त्यांच्या हस्ताक्षरातील आहे आणि त्यावरती स्वाक्षरी आहे म्हणून घेतात. ती रक्कम सुमारे दहा लाखाहून अधिक असते आणि तेही केवळ एका पत्राला मोजत असतील तर त्यांच्या पत्राचे वर्तमानातही समाज मनावर किती गारूड आहे हे सहजतेने लक्षात येते. त्यामुळे गांधीचा विचार समाजाला आजही हवा आहे. याचे कारण तो विचार निस्वार्थ आहे आणि माणूसपणाच्या केंद्रस्थानी आहे. त्यांची पत्रे आपण जशी वाचत जातो तसे गांधीजी उलगडत जातात.गांधीजीची पत्रे म्हणजे सदसद विचाराचे दर्शन आहे. त्यामुळे आजही विवेक जागा असणा-या प्रत्येकाला गांधी हवे आहेत..


संदीप वाकचौरे

# साधेपणा जपणारे शास्त्रीजी

आधुनिक केसरी

**एकदा त्यांना विचारले," आपण बूट,मोजे का वापरत नाही ?" शास्त्रीजी म्हणाले," माझ्याकडे एवढे पैसे नाहीत. माझे कुटुंब मोठे आहे.सर्वांचा खर्च भागविणे आवश्यक आहे. मी जर चैनीने राहू लागलो तर माझ्या कुटुंबाचा खर्च कसा भागणार ? माझ्या देशातील जनता गरीब असताना मला ऐष आरामात राहण्याचा काय अधिकार ?" आपल्या देशातील सामान्य जनतेच्या हिताची काळजी करणारे, चारित्र्यवान, निस्वार्थी, साधी राहणी उच्च विचारसरणी जपणारे , कणवाळू परंतु प्रसंगी कठोर होणारे देशाचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्री यांची आज जयंती. त्यांच्या स्मृतींना आणि विचारांना उजाळा देऊया. त्यांनी दाखविलेल्या वाटेवर चालण्याचा निश्चय करुया. स्वार्थाने भरलेल्या आजच्या या काळात देशाला शास्त्रीजींच्या विचारांची नितांत गरज आहे. निरपेक्ष भावनेने जनसेवेचे व्रत घेतलेल्या लालबहादूर शास्त्रीजींनी आपले आयुष्य लोकांसाठी व्यतित केले. पंतप्रधान म्हणून जबाबदारी पार पाडताना संपूर्ण देशाने त्यांची निर्णयक्षमता आणि कणखरता अनुभवली आहे. आपल्या तत्वाशी तडजोड न करणारा एक महान नेता म्हणून त्यांना देशाच्या इतिहासात मानाचे स्थान आहे.**

२ ऑक्टोबर १९०४ रोजी उत्तर प्रदेशातील मोगलसराई या छोट्याशा गावात शास्त्रीजींचा जन्म झाला.आई रामदुलारी देवी आणि वडील शारदाप्रसाद.छोटे लाल अवघे दीड वर्षाचे असताना अचानक त्यांच्या वडीलांचे निधन झाले.कुटुंबावर प्रचंड मोठा आघात झाला.आई रामदुलारी यांच्या वडीलांनी म्हणजे आजोबांनी त्यांना आपल्या घरी आणून त्यांचा सांभाळ केला. बालपणापासूनच शास्त्रीजी शाळेत हुशार होते.आई आणि आजोबांनी केलेल्या संस्कारातून शास्त्रीजी घडले. पुढे याच शास्त्रीजींनी देशाला घडविण्यात मोलाची कामगिरी बजावली. शास्त्रीजी मट्रिकच्या वर्गात शिकत असताना देशात स्वातंत्र्याचे वारे वाहत होते. देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपणही काही तरी केले पाहिजे या विचाराने त्यांच्या मनात देशप्रेमाची ज्योत प्रज्वलित झाली. १९४२ साली इंग्रज सरकार विरूध्द झालेल्या आंदोलनात त्यांनी भाग घेतला. त्यांना त्यावेळी तुरुंगवास झाला.तरीही भारतमातेच्या स्वातंत्र्याच्या विचारापासून मागे हटले नाहीत. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर त्यांना अनेक पदावर काम करण्याची संधी मिळाली.शास्त्रीजी देशाचे गृहमंत्री होते. त्यावेळी रेल्वे मधून प्रवास करताना पदाचा ऐट, रुबाब व कोणताही मोठेपणा न दाखवता अगदी सर्वसामान्य माणसांप्रमाणे तिसऱ्या



वर्गातून प्रवास करत. त्यांच्या समस्या जाणून घेत. पदे ही स्वतःला मिरवण्यासाठी नसतात तर लोककल्याणासाठी असतात. हा विचार त्यांनी जपला आणि त्याप्रमाणे आपले सदवर्तन ठेवले. त्यांच्या साधेपणाविषयी आजही आदराने बोलले जाते. शास्त्रीजी सारख्या देशप्रेमाने ओतपोत भरलेल्या माणसाच्या मनात स्वार्थाला किंचतही जागा नव्हती.याबद्दल अनेक प्रसंग सांगितले जातात. सत्तेचा वापर स्वतः साठी अथवा नातेवाईकांसाठी न करणारे पंतप्रधान म्हणजे लालबहादूर शास्त्री होय. शास्त्रीजी रेल्वेमंत्री असताना १९५६ साली प्रचंड पावसामुळे एक रेल्वे अपघात घडला होता. अपघातात अनेक माणसं दगावली.याची नैतिक जबाबदारी स्वीकारुन त्यांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला. नैतिकता, प्रामाणिकता, सचोटी, निस्वार्थीपणा याचे दुसरे नाव म्हणजे लालबहादूर शास्त्री होय. सत्ता ही जनसामान्यांसाठी असते. त्या सत्तेतून देशातील गोरगरीब जनतेचे हित साधले गेले पाहिजे या विचाराने त्यांनी आपल्या पंतप्रधान पदाच्या काळात अनेक लोकोपयोगी निर्णय घेतले. जनहिताची कामे केले.पंतप्रधान बनून देखील त्यांच्या अंगी कोणताही अहंकार नव्हता. अत्यंत नम्रभावाने देश सेवा करुन त्यांनी लोकांच्या मनात आपुलकीचे स्थान निर्माण केले. आपल्या कर्तृत्वाने आणि नेतृत्वाने महान उंची गाठलेल्या भारतमातेच्या थोर सुपुत्रास विनम्र अभिवादन !

लक्ष्मण जगताप

# चला आता तरी थोडे जगून घेऊया !

आधुनिक केसरी

**चला आतातरी थोडे जगून घेऊया**
**विसरून जाऊ व्यर्थ गोष्टींना**
**उद्याचा दिवस आपला नाही**
**या जगी दोन दिवसाचा पाहूणा**

माणसाचे जीवन जेवढे सुंदर आहे तेवढेच खडतर सुद्धा आहे. क्षणात काय होईल हे सांगता येत नाही म्हणून कशाला उगाचच कोणाला टोचून बोलायचं, कशाला उगाचच कोणाची निंदा, चुगली करायची आणि कशासाठी. ..? कशाला उगाचच दुःख द्यायचं, कशाला कोणाला फसवायचं...? म्हणतात ना की, प्रत्येक जण एकाच रांगेत उभे असतात त्या रांगेतून कधी कोणाचा नंबर लागेल हे सांगता येत नाही किंवा कोणी सांगू शकत नाही. कोणी कितीही मागे लपण्याचा प्रयत्न करत असेल तरी त्याच्यावर एक ना एक दिवस नंबर



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

येतोच भलाही त्यांच्या जरी वेगवेगळ्या वाटा असतील तरी शेवटी सर्वांना एक दिवस एकाच गावाला जावे लागते मग कशाला उगाचच नको त्या, गोष्टींचा ओझा घेऊन जीवनाची माती करून घ्यायची. ..? उद्या काय होणार आहे या विषयी जर माहीती असती तर ती गोष्ट वेगळी असती पण, असे कोणालाही माहीत नसते मग त्यातच आपण सर्व समजून घ्यावं. उदा. आपण कितीही समोर जाण्याचा जरी प्रयत्न केला तरी जाऊ शकत नाही कारण समय नेहमी बलवान असतो त्याला कोणीही जिंकू शकत नाही मग आपल्याला ह्या सर्वा बद्दल माहीती असताना हार, जितच्या स्पर्धेत रमून ह्या दोन दिवसाच्या पाहुण्याला का बरं विनाकारण **त्रास द्यायचं... ?**
**आजचा दिवस आपला आहे चला आतातरी**
**जगून घेऊ कोणी, कोणाचे नसती जगात**
**सत्याला सोबतीला घे**

दररोज निघणाऱ्या लखलखत्या त्या सूर्याकडे आपण बघत असतो पण,एकटक त्याच्याकडे बघू शकत नाही कारण तो सत्य आहे जेव्हा पासून तो निघत असतो तेव्हा पासून मावळे पर्यत त्याला किती त्रास सहन करावा लागतो. कधी काळेकुट्ट मोठे ढग आडवे येतात, कधी मधातच वीज चमकते तरीही तो, सर्वांचा हसत, हसत सामना करून प्रकाश देत असते कारण तो स्वयंप्रकाशित असतो मग आपण सुद्धा त्या लखलखत्या सूर्याकडे बघून जगण्याचा खरा आनंद घेण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. नेहमीच सत्याचा स्वीकार करून त्याच वाटेवर चालण्याचा विचार केले पाहिजे. जीवनाला आधार मिळेल. माणसाचं जीवन म्हटलं तर त्यात सुख, दुःख,अडीअडचणी, संघर्ष, चांगले वाईट प्रसंग,आपत्ती, प्रेम, मानसन्मान, आदर, आपुलकी, माणुसकी असते तेवढेच तिरस्कार कपटकारस्थान , हिंसा हे तर असतातच म्हणून जे चांगले गुण, व योग्य संपत्ती आहे तिला टिकवून ठेवण्यासाठी माणुसकीच्या नात्याने प्रयत्न केले पाहिजे आणि जे, आपल्या जीवनाला घातक आहेत त्याचा त्याग केले पाहिजे शेवटी त्यागामधूनी पुण्य मिळते आपण ऐकून आहोत म्हणून या दोन दिवसाच्या पाहुण्याला त्याच प्रकारचे जगणं ठेवण्यासाठी नको त्या गोष्टींकडे लक्ष देण्याऐवजी माणूस बनून जगल्याने जीवनाचे खरे महत्व कळेल.

**जीवन हे सुंदर आहे**
**त्याला सुंदर बनवूया**
**आपण आहोत माणूस प्राणी**
**सदैव आठवणीत ठेवूया**

कोणी म्हणतात की, माणसाचा जन्म अनेक जन्मानंतर मिळतो म्हणजेच या मानवी जीवनात काहीतरी वेगळं असेल म्हणूनच माणूस प्राण्याला श्रेष्ठ मानल्या गेले आहे कारण त्याला बोलता येते,जगातील सर्वच गोष्टींविषयी माहीती असते म्हणून त्याला बुद्धीवान असे एक नाव दिले गेले आहे. या, पृथ्वीतलावर जो माणूस जन्म घेतो त्याला एक ना एक दिवस हे जग सोडून जावेच लागते हा निसर्गाचा नियमच आहे म्हणून आतातरी या मानवी जीवनाचे खरे महत्व जाणून जगूया व इतरांनाही त्याचे महत्व पटवून देऊया.



## भादवा...!

सरला महिना श्रावण
भाद्रपद धावत आला,
सगळा शेतीचा शिवार
चोहीकडे हिरवा झाला.
उडिद नि तीळ-मुगाची
केली कुणब्याने काढणी,
बोंडे फुटली कापसाला
करी त्यावर फवारणी.
रब्बीचे बी पेरल्याने
तिला फुटे कोंब हिरवा,
साऱ्या शेती-शिवारातून
भादव्याचा सुटे गारवा.
कोसळणाऱ्या पावसाने
घेतली थोडीशी उसंत,
चोहीकडे नटली सृष्टी
भादवा साऱ्यांना पसंत.
झाली पंचमी पोळा- गौरी
बप्पा गेले आपल्या घरी,
दसरा-दिवाळी हे सण
देईल साऱ्यांना उभारी...!
- अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण.
मो. ९७६४३५०३७४.

## भय इथले संपत नाही

चंचल, चपळ तारुण्य
दौडत गेले भराभरा....
भय इथले संपत नाही
सांज कापते चराचरा...

कुरकुरते गुडघ्याची वाटी
तिसरा पाय म्हणुनी काठी.
रक्तदाब, मधुमेय, हृदयरोग
शरीरात वेदनामय दाटी.

आंबटचिंबट,गोड, तेलकट
जिभ चवीची भारी वटवट.
स्वास्थ्य कुरबुर तिन्हीत्रिकाळ
माथ्यावर मृत्यूचे सावट.

पथ्यपाणी, औषध-गोळ्या
चाळवल्या मनावर ताबा.
खमंग,चवदार वास चिडवतो
वाटेच्या टप्प्यातील ढाबा.

हाताच्या बोटाशी श्रावण
तो ही भासतो राक्षस रावण.
शंका, संशयात गढूळते मती
कोण रडे त्या..!! ज्या रोज मरण.

कल्पना दिलीप म्हापुसकर

## उंदीरमामा

उंदीरमामाने घातला
सुट आणि कोट
पायात घातला
कोल्हापूरी बूट
खिशात ठेवली
दहाची नोट कोरी
रुबाबात निघाली
बाजारात स्वारी
उंदीरमामाने घेतला
पांढरा टुथपेस्ट
चव घेत म्हणाला
आहे की बेस्ट
नंतर उंदीरमामा
हॉटेलात शिरला
गरम-गरम भज्यांनी
खिसा भरला
उंदीरमामाने काढले
खिशातून आठाणे
विकत घेतले
गरम-गरम फुटाणे
उंदीरमामाला बाजारात
दिसली मनीमाऊ
घराच्या दिशेने
मामा लागले धावू
- रविंद्र व्ही. चालीकवार
मु.पो.ता.महागाव

## महासत्ता होतांना

मूलभूत हक्क शिक्षणाचा
हद्दपार होताना
गरिबांच्या लेकरांची
शाळा बंद पडतांना
मी पाहिलं देश माझा
महासत्ता होताऩा..

चार वर्ग एक गुरुजी
कसे बसे शिकतांना
दारू दुकानास रोज
परवाने मिळतांना
मी पाहिलं देश माझा
महासत्ता होतांना..

आता आता देश माझा
चंद्रावर जातांना
गावाकडच्या रस्त्यासारखे
खड्डे तिथे पाहतांना
मी पाहिलं देश माझा
महासत्ता होताऩा..

बोके सारे लोण्यासाठी
आपापसात भांडतांना
जग पोशिंदा कर्जापायी
गळफास घेतांना
मी पाहिलं देश माझा
महासत्ता होतांना..

पोटासाठी बेरोजगारी
वणवण फिरतांना
मंदिरात सीतामाता
अजून ही रडतांना
मी पाहिलं देश माझा
महासत्ता होतांना..

जातीधर्मा वरून वाद
लोकशाहीत होतांना
लेकरांच्या रक्ताने
भारतभूमी भिजतांना
मी पाहिलं देश माझा
महासत्ता होताना..
ज्ञानेश्वर गायके कन्नड
मो..९४०३३८४८८९

## ते दिसतात

मुंग्या दिसतात चालताना
मासे दिसतात पोहताना
झाडे दिसतात हिरवेगार
फुलत असते गुलमोहर

ते कधीच थकत नाही
शिकवण देतात माणसाला
मुके, असूनही सारं सांगती
धन्यवाद द्यावे त्या निसर्गाला

ते दिसतात जगताना
काट्यातून फुलताना
हवेहवेसे वाटतात तेव्हा
सारा जग होते त्यांचा दिवाना

ते दिसतात उडताना
इवले, इवले पंखवाले
रूपच तयांचे सुंदर
बगिच्यात फिरकी घेणारे

ते दिसतात कष्ट करताना
तुतारीचे घाव सोसताना
दु:ख सांगत नाही कोणाला
वंदन करते मी त्या सर्जांना

ते दिसतात चमकताना
रात्रीची शोभा वाढवताना
सारेच बघतात त्यांच्याकडे
किती बघावे त्या चांदण्यांना

सौ.संगीता संतोष ठलाल
मु.कुरखेडा जि.गडचिरोली
७८२१८१६४८५

## जगण्याचे चांदणे

जगण्यात पाहावे जगण्याचे चांदणे
चांदण्यात पाहावे सुंदर जीवन
जीवनातल्या या सा-या सुखांचा
मंत्र जपावा सदैव सहकार्याचा ॥१॥
जीवनात जगावे छान आनंदाने
जीवनी गात जीवनाचे मधुरगाणे
जगवावे एकमेका प्रेमाने माणसाने
वाटूनि घ्यावी सुखदू:खे स्वमनाने॥२॥
माणूस म्हणून जगी जन्म घेतला
परि, विसरुन माणुसकी माणूस गेला
अर्थ काय मग, त्याच्या जीवनी उरला
टेंभा"मी"पणाचा तेवढा मिरवीत बसला ॥३॥
नानाविध ऐश्वर्ये मिळवून जीवनात सारी
माणसा! मन:शांतीची तव रिती कारे!झोळी
जगण्यातील भाव खरा ज्यांना जीवनी कळाला
जीवनातील अर्थ त्यांनी भरभरुन अनुभवला ॥४॥
मधुकर ए. निलेगावकर
९४२१३७५६९१

## वारसदार

माझ्या घराजवळ आहे गणपतीचं मंदीर..
थोडंसं पुढे चर्च.. त्याच्या थोडं पुढे मस्जिद..
गुरूद्वा-याची गुरूवाणी रोज पडते कानावर..
बौध्दविहार ही हाकेच्या अंतरावर..
रोज सकाळी ऐकतात माझी मूलं
मंदीरातला घंटानाद, अल्ला हो अकबरची अजान,
सत नाम वाहे गुरूचा जयघोष,
बुध्दम शरणम गच्छामि ही
पडतं त्यांच्या कानावर..
आणि चर्चमधील शांतता ही अनुभवतात ती,
कन्फेस रुम ही ठावुक आहे त्यांना.
आता मी निश्चिंत आहे..
फुलेंना अपेक्षित कुंटुब घडतंय म्हणून.
मी ही एक वारसदार
ज्योतिबा आणि सावित्रीची..!!
डॉ.ज्योती कदम

## खंत....

कुपाटीतून जरी मी वाट काढतो
तरी ही पायात हा काटा मोडतो
तिथ पर्यंत तो पोहोचला कसा
बघ कोणा कोणाला हात जोडतो.. ?
जागोजागी कचरा प्लॅस्टिक टाकून
असा माणूस पृथ्वीचे उपकार फेडतो
पुढचा पडला तर हळहळ अता नाही
मागचा मिश्किल पणे दात काढतो
उन्मळून पडताना झाडानं पाह्यलं
सावलीत बसणारा ही अखेर तोडतो
हात देऊन हराम्याला नको पूढे ओढु
मागून येणारा आता नक्की पाय ओढतो
फाशी घेऊन मेला जरी आपला अन्नदाता
कायदे मोडणारा मात्र मेजवान्या झोडतो
बलराज संघई

## बाहुली ..

धतड धतड वाजवे आघाडीवरती मुली
नारी असे कमजोर मारली मोठी फुली
महिला ढोल पथक गाजवे सुरात गल्ली
पुरुष आघाडीवरती रे सरलीशेखचिल्ली
कसे जमेलं नारीला कुणी उडवे खिल्ली
सर्वत्र आघाडीवरती मुलीचं दिसते हल्ली
लेझीम पथक नाचे स्नेह स्पर्शे भिजली
भेदा भेद निखळले बियाणेनवी रूजली
महिलाअव्वलस्थानी मना मनास भावली
झाली सक्षम चांगली राहिली नाही बाहुली
बदलत जाई स्वरूप नव पिढी स्थिरावली
बेटीचं वाटतेयं भली जशी थंडगारसावली
- हेमंत मुसरीफ पुणे.
9730306996.

## निरोप ..

मिरवणूक उत्सवी उत्साहा रंग लाल तरीसुद्धा जपायचे उधळता रे गुलाल उत्सव प्रेम मानवा गुण केलेला बहाल उन्मादात बेधुंदता होऊ नकारे बेहाल नियंत्रण मनावरती तेव्हांच सुखे रहाल तोलसुटे विवादाले उगा निमंत्रण द्याल आपले मिरवणूकी परके धरतील ताल धर्म जात येणे नको वागणे नको बेताल नियम मित्र आपले घड्याळाही पहाल नकळत गणोबाला श्रध्दा सुमने वहालं सुखे निरोप गणेशा उदाहरण बेमिसाल निकोप समारंभ हा आठवण हर साल - हेमंत मुसरीफ पुणे, 9730306996.

## काहीच नाही

एकदा एका प्रश्नाने भंडावून सोडलं उत्तरासाठी मनाला जंग जंग पछाडलं
'काहीच नाही' उत्तर त्याचं मिळालं 'काहीच नाही' नामकरण करून टाकल
नामकरण होताच शेजारच चुलवान खुदकन हासलं
छोटंसं भांड त्यावर जावून बसल बसल ते बसल तेल चांगलं तापलं
त्याच्यात तडाडली जिरे मोहरी सोबतीला होतीच कांदा टॉमेटोची प्युर
आल्या लसणाची पेस्ट अन्व रून खोबऱ्याची टेस्ट
मसाला, तिखट मीठ घातलं वरून त्यात 'काहीच नाही' टाकलं
क्षणात जिभल्या चाटत चिल्लीपिल्ली आलं
अन् लाडाने ते बोललं आई आज स्पेशल काय तू ग केलं
मग मी पण बोलल 'काहीच नाही' केलं आ वासून त्याने तोंड चांगलच पसरलं
मग मी त्याला बोलल अरे अरे मी काहीच नाही' केलं
सारे घर त्यानं मग डोक्यावर घेतलं मग मात्र इथल डोकं चांगलच की संतापल
'काहीच नाही' ताटात शेवटी वाढूनच घेतलं जिभळ्या चाटत मटक मटक
मटकलं एवढं सगळं मग 'काहीच नाही ' खाल्लं
उशिरा ना मग बाबा त्याचा आलं चिल्ली पिल्ली मग बाबाला बोललं.
आईन आज 'काहीच नाही' केलं बाबा मग रागाने लाल लाल झालं
चिल्ली पिल्ली मग बाबाला बोललं आम्ही 'काहीच नाही' खाल्लं
बाबा मग आईकडे गेलं तू आज काहीच नाही केलं
खरंच मी काहीच नाही केलं मंग मात्र बाबा चांगलंच संतापल
अहो मी पोळीबर काहीच नाही केलं काहीच नाही कसं डोकं तुझं चाललं
शेवटी ताटात 'काहीच नाही' वाढल मग बाबाचं तोंड केवढं ते खुललं
खुललेल तोंड आणि आनंदाने ते बोलल अशी का तू बोलली 'काहीच नाही'
केलं मग मी त्यांना बोलल. अहो भाजीचं नाव मी 'काहीच नाही' ठेवलं
चिल्ल्या पिल्ल्याच बाबा बोललं, आता मला उमगलं. पुरे आता झालं,
पुरे आता झालं मला 'काहीच नाही' कळलं मला 'काहीच नाही' कळलं
©वैशाली इंदुमती जाधव-महाडिक
फोन - ९७६७४३७९२३

## तुझ्या माझ्या भेटीला आला

कधी सांगतो तुला अस झाल माझच मला
कसा तो गोड हर्ष गारवा तुझ्या माझ्या भेटीला आला
आपल्या प्रेमाच प्रतिबिंब माझ्या मनात पहा जरा
तुझ्या माझ्या स्नेहाचा झाला द्वार खुला
फेरफटका पहाटेचा कसा जुळून आला
कसा तो गोड हर्ष गारवा तुझ्या माझ्या भेटीला आला
आभाळ ही लागल पाझराला
वारा अवली कसा झडग्याला मिळाला
कसा तो गोड हर्ष गारवा तुझ्या माझ्या भेटीला आला
@ लक्ष्मण वाल्डे-कन्नड





# लैंगिक समस्या निदान व उपचार

आधुनिक केसरी

**नमस्कार! मी डॉ. विजय दहिफळे 'सुखी जीवनाचा मंत्र' या माझ्या पुस्तकावर आधारित साप्ताहिक सदरात तुम्हा सर्वांचं अगदी मनापासून स्वागत करतो. गेल्या अनेक दिवसांपासून आपण टीव्ही, सोशल मीडिया या माध्यमांमधून भेटत आहोतच, पण आता आपण दर रविवारी दैनिक आधुनिक केसरी मधून भेटत राहणार आहोत. माझ्या गेल्या २०-२५ वर्षांच्या कारकीर्दीमध्ये मला आलेले अनुभव, मला भेटलेली माणसं, वेगवेगळ्या रूपात समोर येणाऱ्या गंभीर लैंगिक समस्या या सर्व गोष्टींचा ऊहापोह मी या सदरातून करणार आहे.**



**गोनोरिया :** हा आजार अमेरिकेत मध्ये जास्त प्रमाणात आढळतो ज्यामुळे स्त्री व पुरुषांमध्ये वंध्यत्व येते. गोनोरिया आजाराची लक्षणे सहसा लवकर दिसत नाहीत.

लक्षणे या आजारामध्ये लिंगातून किंवा योनीतून पूसारखा स्राव येणे, लघवीला जळजळ होणे, अंडाशय सुजणे, स्त्रियांना पाळीच्या अगोदर रक्तस्राव होणे, वंध्यत्व येणे, रक्त व सांधे यांना प्रादुर्भाव होणे अशी लक्षणे आढळून येतात.

निदान आणि उपचार

या आजारामध्येही रक्ताची तपासणी आणि स्त्रियांची तपासणी केल्यानंतरच निदान करण्यात येते. उपचारांमध्ये ॲंटिबायोटिक्सचा सिंगल डोस द्यावा. यामध्ये दोघांनीही उपचार घ्यावा. पूर्ण बरे होईपर्यंत सेक्स करू नये, कारण त्यामुळे मूत्रनलिका, योनी, तोंड, घसा, गुदद्वार व डोळे यामध्येही संसर्ग होतो. प्रतिबंध यामध्ये ताप्तुरता सेक्स बंद करणे, लॅटेक्स कंडोम वापरणे आणि डेंटल डॅम वापरणे हे प्रतिबंधात्मक उपाय सांगता येतील. एच.पी.व्ही. (जेनायटल वॉर्टस) अतिशय प्रामुख्याने आढळणारे हे व्हायरल इन्फेक्शन जे ५० टक्के रुग्णांमध्ये आढळते. या आजारामध्ये कॅन्सर होण्याचा धोकासुद्धा असतो. १०० प्रकारचे एच. पी. व्ही. असतात. बऱ्याचदा हा आजार आपोआप सुद्धा बरा होतो. लक्षणे लिंगावर, योनीवर लहान लहान कॉलर फॅशनमध्ये वाढ होते. याला व्हिनेगर लावले तर त्यातील ॲसिडिटीमुळे ते पांढरे पडतात व ठळकपणे दिसतात.

निदान व उपचार जेनायटल वॉर्टसचे निदान करण्यासाठी पॅप स्मिअर नावाची टेस्ट केली जाते. उपचारांमध्ये एकतर शरीर स्वतःच याला एक ते दोन महिन्यांमध्ये दुरुस्त करते. तसेच क्रीम, जेल, लिक्विड नायट्रोजन, ट्राय किंवा बायक्लोरो ॲसेटिक ॲसिडने जाळणे, क्वाटरी किंवा रेडिओ फ्रिक्वेन्सीने जाळणे, कट करणे असे उपचार उपलब्ध आहेत. पॅप स्मिअर इन फिमेल्स यामुळे कॅन्सरचे निदान होते. कॉलपोस्कोपी करणे हा देखील यावरील एक उपचार आहे. ज्यामध्ये योनी व गर्भाशयाची जागा मोठ्या आकाराची दिसते आणि त्यामुळे कॅन्सरपेशी दिसू शकतात. सहसा याला कुठलीही टेस्ट नसते. याचा पूर्ण नायनाटही करता येत नाही. काळानुसार आपले शरीर त्याला संपवते. प्रतिबंध या काळात सेक्स न करणे, कमी सेक्स पार्टनर ठेवणे किंवा न ठेवणे (ज्यामुळे याचा प्रसार होतो), लस टोचून घेणे, HPV VACCINE कंडोम, डेटल डॅम्स (मुख मैथुनासाठी) वापरणे असे विविध प्रतिबंधात्मक उपाय सांगता येतात. खरुज (स्कॅबीज) हे परजीवी (पॅरासाईट्स) त्वचेला इन्फेक्शन करून भयंकर खाज आणतात. याचा संसर्ग हा त्वचेचा त्वचेला संपर्क झाल्याने होतो. तसेच सेक्स केल्याने व संसर्ग झालेल्या त्वचेशी संपर्क आल्यानेही याचा संसर्ग होतो.

लक्षणे यामध्ये असह्य खाज सुटणे व पुरळ येणे, रात्री जास्त खाज येणे, लिंग, नितंब, मनगट, स्तनाग्र, कंबर, खांदे, काख, कोपरा आणि बोटांच्या मध्ये नॅश येणे. त्याचप्रमाणे त्वचेखाली छोटी छोटी छिद्रे दिसणे (कारण मादी माईट्स या त्वचेखाली घुसतात). जर एखाद्याला खरुज (स्कॅबीज) पहिल्यांदाच आली असेल तर तिची लक्षणं दिसायला २ ते ६ आठवडे लागतात. जर अगोदर होऊन गेलेली असेल तर २४ तासांत लक्षणे दिसतात आणि सर्वात मुख्य म्हणजे लक्षणं नसताना देखील खरुज पसरते. निदान आणि उपचार त्वचेच्या (स्कीन) तुकड्याची तपासणी करून याचे निदान केले जाते. यावरील उपचारांमध्ये गॅमा स्कॅब, BB LOTION यामुळे माईट्स व त्याची अंडी मरतात. हे लोशन मानेपासून खाली पूर्ण शरीराला लावून ८ ते १४ तासांनंतर धुवावे. तसेच प्रतिजैविके (ANTIBIOTICS) तीन आठवड्यांपर्यंत घ्यावीत. कपडे ड्राय क्लीन करणे, बेडशीट्स गरम पाण्यातून काढणे असे उपचार आणि उपाय करता येतात. प्रसार याचा प्रसार हा स्कॅबीज असणाऱ्यासोबत सेक्युअल कॉन्टॅक्ट आल्यामुळे होतो. प्रतिबंध कंडोम वापरून याचा प्रतिबंध होत नाही. त्यामुळे सेक्स न करता राहणे (जे शक्य नाही) किंवा एकाच पार्टनरसोबत आयुष्यभर राहणे ज्याला इन्फेक्शन वा कोणताही आजार नाही.






**डॉ. विजय दहिफळे**
युरोलॉजिस्ट, अँड्रॉलॉजिस्ट अँड सेक्सॉलॉजिस्ट
9822326248

# मित्र -पुराण : राजेंद्र कोल्हेकर



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

आधुनिक केसरी

**नमस्कार - मित्र हो - नोकरीच्या काळातले मित्र , रिटायर झाल्यावर पुन्हा जेव्हा भेटतात ,तेव्हा आपण जुन्या काळात जातो . त्या आठवणीचे " हे मित्र-पुराण ". पारिवारिक समारंभ निमित्ताने मी अमरावतीला गेलो होतो. मित्र राजेंद्र कोल्हेकरला फोन केला, 'भेटू या ! ईच्छा व्यक्त केली. कोल्हेकर स्कुटी घेऊन हजर सुद्धा झाला. राजपेठेतील गणेश कॉलोनीतल्या त्याच्या घरी गप्पा बैठक झाली. आरंभीचे दिवस आठवले - 1983 साल असेल. मी हैद्राबाद बँकेच्या गंगाखेड -ब्रँचला होतो. परभणी मेन ब्रँचला माझे वडील ती.(कै)-बाप्पा, व्ही. एच.देशपांडे मॅनेजर होते. मेन ऑफिसच्यावर मॅनेजर क्वार्टरमध्ये आमचा मुक्काम असे. 1983-85 या काळात रविवारी परभणीला आलो की दुपारच्या वेळी खाली बँकेत जाई.**

सुट्टीच्या दिवशी कुणी ना कुणी स्टाफ मेम्बर काम करीत बसलेला असे. मेन ऑफिसच्या हॉलमध्ये (त्यावेळी) कोपऱ्यातल्या टेबलावर शनिवारची क्लिन-कॅश बुक लिहीत बसलेला एक नवा स्टाफ मेम्बर दिसायचा. गोरापान, काळीभोर दाढी, नीट-नेटका ड्रेस " अशा या देखण्या बटू-मूर्तीचे "त्याकाळीचे असे दिसणे, असणे, रहाणे, माझ्यासाहित बहुसंख्य स्टाफच्या तुलनेत दुर्मिळ होते.

परिचय झाल्यावर कळाले , राजेंद्र कोल्हेकर 1981 बॅचचा .

पुढच्या दर भेटीत त्याचा प्रसन्न - निर्मळपणा जाणवे. हसण्यात-बोलण्यातला मिस्कीलपणा , हातात हात देऊन "यस" म्हणण्याची स्टाईल, पाहून " बरं, येतो पुन्हा, ! असा निरोप घेणे नको वाटे. कोल्हेकरची वाचन ,साहित्याची आवड, ,माझ्यासाठी बोनस पॉईंट ठरले. माझ्या साहित्य लेखनास नुकतीच सुरूवात झाली होती. नंतरच्या भेटीत माझ्या नव्या कथेचा वाचक असणे ", ही प्रथा सोबत असेपर्यंत मोडली नाही. पुढे लोकल ट्रान्सफरमध्ये कोल्हेकरची बदली मी काम करीत असलेल्या एडीबी म्हणजे कृषी विकास शाखेत झाली. यामुळे कोल्हेकरच्या मैत्री -सहवासात वाढ झाली. परभणीच्या शिवाजीनगर भागात कोल्हेकर एकटा रहात असे. दर शनिवार -रविवार ,त्याची परभणी -अमरावती ट्रीप ठरलेली होती. पंढरपूर-अमरावती, "अमरावती - पंढरपूर " या दोन्ही एसटी बसला आम्ही " कोल्हेकर एक्स्प्रेस" म्हणायचो. एडीबीला असतांना औरंगाबादकर श्री.आडीवरेकरसाहेब "अकाऊंटट म्हणून आले, ते कोल्हेकरचे रूम-मेट झाले. माझ्यापुरते सांगतो- आडीवरेकर आणि कोल्हेकर या दोन चकचकीत, गोऱ्या-गोमट्या, हसतमुख मित्रांच्या सहवासात "त्यांच्या इतका नसेन, पण " जुन्या गबाळ्या स्टाईलने राहण्याच्या माझ्या सवयीत मोठा लक्षणीय बदल झाला." ए.पी.सूर्यवंशी, कोल्हेकर आणि आडीवरेकर, या त्रिमूर्तींचा "सुसंगत असा संगत-संस्कार "मला नीटनेटका बनवणारा ठरला, हे सांगण्यात आनंद आहे."

1980च्या दशकात-कंप्युटरची चाहूल पण लागलेली नव्हती.सगळी काम शाईचे पेन, बॉल-पेन, पेन्सिल -रबर" आणि कागदावर लिहिणे, थोडक्यात " हस्ताक्षर असलेले "कार्यालयीन कामकाज " होते. महत्वाची स्टेटमेंट्साठी " उत्तम लेखन, स्पष्ट आकडेवारी " क्लिन अँड क्लियर रायटिंग " हे महत्वाचे असे. कोल्हेकर या स्वरूपाच्या कामातला मास्टर -हॅन्ड " . या लेखन -श्रेणीत " माझाही समावेश होत असल्यामुळे, सर्व महत्वाची अँन्युअल -स्टेटमेंट्स आम्ही मिळून करायचो. हे करतांना "टाईमपास वर्ज्य, काम उरकून टाकू" हे नसे. चिकाटी आणि संयम बाळगून ,निष्ठतेने उत्कृष्टच काम पूर्ण करायचे ", बेस्ट - क्वालिटी वर्कर" कोल्हेकरच्या सहवासात हा कार्य-मंत्र मी शिकलो. हिंदी वर्धन "नावाचे वॉल -मॅगझीन ", मी कोल्हेकरच्या कार्यतत्परतेच्या सपोर्टने चालवले. यात मजकूर माझा, लेखन-आणि त्याची रंगीत -देखणी सजावट कोल्हेकरची. हे वॉल मॅगझीन परभणीच्या 4 ही ब्रांचच्या हॉलमध्ये एक एक आठवडा नोटीस बोर्डवर झळकायचे.

बँकेचे कस्टमर थांबत, आवर्जून वाचत,कौतुक करीत.

पुढे ऑफिसर म्हणून प्रमोशन झालेला कोल्हेकर अनेक ठिकाणी हेड ऑफिस लेव्हलला काम करीत फिरला, या काळात आमच्या भेटीत मोठाच खंड पडला . त्याचा एकूण कार्य- प्रवास-

5-12-1981- परभणी मेन ऑफिसमध्ये पहिली पोस्टिंग - पाहिले ब्रँच मॅनेजर - एम.डी.अभ्यंकर. 2.एडीबी ला असतांना 1991- कम्प्युटर ऑफिसरची टेस्ट पास केली.

कम्प्युटर ट्रेनी ऑफिसर म्हणून जुलै -1992 मध्ये प्रमोशन झाले. कम्प्युटर ऑफिसर म्हणून स्पेशल पोस्टिंग केडर, 1995 ते मे 2009- हा 14 वर्षांचा दीर्घ कार्य काळ, SBH लिंक सेल नागपूर येथे होता. मे- 2009 -ते 2013 स्टेट बँक ऑफ इंडियाकडे डेप्युटशन वर SBI, GITC -CBD BELAPUR येथे कार्यरत.

SBI कडून परत एसबीएच कडे वापसी - झाल्यावर 2013 मध्ये PAD HO हैद्राबाद. वास्तविक 31-10-2013 पासून त्याचे "व्हीआरस " -(कोणत्याही स्कीमविनाचे) मंजूर झालेले होते ".

त्या अगोदरच जीवावर बेतलेल्या प्रसंगातून सहीसलामत सुटका झाली. तो कठीण प्रसंग असा... ड्युटीवर असतांना अचानक उदभवलेल्या" हार्ट प्रॉब्लेममुळे" एकटा राहणाऱ्या कोल्हेकरला स्वतःच 28-10-2013 ला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट व्हावे लागले. अशा बिकट प्रसंगी बँकेतील अधिकारी मदातीला आले. " एसबीएच मध्ये असेच फॅमिली



कल्चरला होते.",असे तो म्हणाला. मित्र हो -अपनी हैद्राबाद बँक बोले तो..ऐसीच थी ! ..खरे आहे ना हे ! रिटायर झालेला कोल्हेकर , पारिवारिक जीवनक्रमात बिझी आहे. त्याचा बंगला- घर " दोन्ही सुंदर, सुरेख - लखलखीत असणे ", ही नवलाची गोष्ट नाही. सुंदर कलात्मक सजावटीच्या हॉलमध्ये कोपऱ्या-कोपऱ्यात असलेल्या टीपॉयवर "क्रोशे -विणकाम " केलेले अनेक रंगी नक्षीदार कव्हर्स दिसत होते". सौ.कोल्हेकरवहिनींनी साभिमान कौतुक- स्वरात म्हटले- अहो ,भाऊजी ,- ही कारागिरी तुमच्या कलाकार मित्राची आहे "बरे का ! वहिनींची ही कमेंट शंभर टक्के खरी आहे. " कोल्हेकर कलाकार आहे, कलावन्त मनाचा रसिक मित्र आहे". त्याच्या सहवासात आलेल्या प्रत्येकाने असाच कोल्हेकर अनुभवलेला आहे. श्री.व सौ.कोल्हेकरांनी त्यांच्या घराभोवती असलेल्या बागेतून मला फिरवून आणले, पानं-फुलं, झाडे-वेली "यांनी "कोल्हेकर-बाग " बहरलेली होती. पांढरे गुलाब "लागलेल्या झाडासमोर मला उभे करीत कोल्हेकर म्हणाला-- या गुलाबाची एक खास गोष्ट आहे, हा बिन-काट्याचा गुलाब आहे ",! त्याच्याकडे पाहत मी म्हणालो- जब इस बाग का माली ही, " खुद एक नरम दिल गुलाब है ।" मग "इथल्या गुलाबाल ,काटे कसे असतील ? बागेतली हिरवाई , कोल्हेकरची एनर्जी" हे दोन्ही एव्हरग्रीन " आहेत " ३१ ऑगस्टला कोल्हेकरवहिनी त्यांच्या नोकरीतून निवृत्त झाल्यात, या दोघांनाही निरामय आरोग्य शुभेच्छा देत, या सदाबहार मित्राला भारावलेल्या मनाने मी बाय बाय केला.!

# त्या रम्य सायंकाळी...

आधुनिक केसरी

आयुष्याच्या त्या रम्य सायंकाळी खिडकीतून डोकावताना आण्णा ना आज खूप दिवसांनी सुखावल्या सारखे वाटत होते.रिटायरमेंट नंतर तब्येतीच्या कुरकुरी,हाडांना आलेला ठिसूळ पणा स्वस्थ बसू देत नव्हता. कोणाला सांगायला...पण ते ऐकायला कान तर हवे. आणि कान असून ही ते बहिरे असतील तर मग काय बोलायचे.

पण नकळत मावळतीकडे झुकलेला सूर्य नि त्याची सर्वत्र विसावलेली सावली निशेच्या सागरात बुडू पहात होती. एवढ्यात किती सुंदर हा नजारा अहाहा! चिमणी पाखरं घरट्यात विसावली. दिवसभराच्या कलकललाटाने थकली विसावली.उद्या पुन्हा नविन दिवस उगवणार पुन्हा एक सकाळ सकाळ नंतर सायंकाळ नकळत नयनातून ओघळलेले मोती सर्रकन जमिनीवर घरंगळले. धरू पाहता जणू काही हातून निसटून गेले. की सोडून दिले? माहीत नाही. अश्रू वेचता वेचता त्यांना सदा भाऊंची आठवण आली. तेंव्हाही भरलेले ते घरटे असेच भरलेले असायचे. किलबिलाट चिवचिवाट वाऱ्याची शिळ गाणे गात यायची.पण का? कसे माहित नाही.कोण चूक कोण बरोबर की नियातीला ही तेच मान्य होते की काय? त्या दिवशी अशाच एका सायंकाळी भाऊंनी तो सूर्य पहिला.अन् त्याच्यानंतर आधार वडच्या खिडकीत बसून भाऊ तो सूर्य पाहू लागले. रोज उगवायचा मावळायचा. आधार वडाच्या बाहेर एका झाडावर थकून भागून एक पक्षी निपचित पहुडलेला असायचा.तिथे वरच्याच फांदीवर त्याचे कुटुंब असावे बहुदा.भाऊ कधी मधी फोनवर बोलून सांगायचा.काय रे आण्णा कसा आहेस. देवळातल्या काकड आरती चा आवाज वगैरे येतो का रे! कुठेतरी गावात जवळच्या भजनात टाळ्या वगेरे वाजवतोस ना! आणि आधाराला आपली छडी घेऊन त्या जवळच्या मंदिरात जातोस ना . आणि वहिनीला आराम करायला तूच सक्तीने सांगत जा.त्या ऐकणार नाहीत.तू आग्रह धरत जा. अण्णांनी विचारले की तुम्ही ठीक आ...ना..बोलणे तोडून.. मी खूप मजेत आहे बघ.पण "पण काय रे" बिचारा तो पक्षी!त्या दूरवर हरवलेल्या वाटेवर पहात राहतो.आणि मग... काही दिवसांनी त्या फोनची तार तुटली, अन् तो संपर्क क्षेत्राच्या बाहेर असे सांगू लागला. पण आज..? विसावलेल्या त्या त्या निवांत पणात आज सकाळी ते नाजुक हात काही वर्षापूर्वी मिशा ओढ.शर्ट ओढ करायचे.पण हळूहळू ते दुरावले. सुरवातीला जवळ येऊ का नको,करत करत शेवटी गळ्यात पडले.अन् अजिबात केस नसलेल्या त्या डोक्यावर फिरू लागले. फिरता फिरता आण्णा तुमचे पाय दाबू. अण्णा तुमच्या डोक्याला तेल लावू.म्हणजे अजून केस उगवतील माझ्यासारखे ब्लॅक ब्लॅक. आणि आपण मग पाच सहा वाजता मंदिरात जाऊया. आणि दररोज मीच तुम्हाला घेऊन जाणार. पण का रे ! आज तुला होमवर्क नाही का? आहे ना! पण आज पासून मी ठरवले आहे की मी तुमची काठी बनून मंदिरात घेऊन जाणार. तुमच्याकडून गोष्टी ऐकणार नी मग होमवर्क करणार. मॅडमनी च आम्हाला तसे सांगितले आहे. घरातील भांडी ही आज अगदी शांत होती. चला लवकर आजोबा आजोबा आजीला ही घेऊया. चला लवकर," नंतर अंधार पडायला लागेल. चालता चालता, ओठावर शब्द उमटले. हे जीवन सुंदर आहे. पण बाबू बाळा तुला आज का हे करावेसे वाटले. कारण मला माझ्या मॅडम नी सांगितले आहे. मी एक आदर्श विद्यार्थी बनणार. माझ्या देशाचे भवितव्य माझ्या हातात आहे. आम्ही दररोज प्रतिज्ञा म्हणतो. भारत माझा देश आहे. मी वडीलधाऱ्या माणसाशी प्रेमाने आणि सौजन्याने वागेन. असं खूप काही त्या प्रतिज्ञेचा अर्थच आज आम्हाला मॅडम नी खूप खूप समजून सांगितला. म्हणून मी आजपासून ठरवले आहे. मॅडम आम्हाला बोलल्या ही प्रार्थना प्रतिज्ञा मी नुसती बोलणार नाही. तर ती आम्ही आचरणात ही आणणार. थोडा वेळ मी तुमच्यासाठी देणार थोडा वेळ मी आईबाबांसाठी देणार,थोडा वेळ मी स्वतः साठी आणि माझ्या भावंडासाठी देणार. थोडा वेळ शाळेसाठी आपल्या गावासाठी देणार. "खूप छान असाच मोठा हो बाळा!" "तुझे नाव त्या चंद्रावर चमकू दे." "खरच आण्णा हो बाबू, ते नक्कीच चमकणार." आशिर्वाद आहे आमचा तुला. आण्णां ना भाऊची आठवण झाली. आज जर भाऊ ..! "घरी आल्यानंतर अण्णा आता मला एक गोष्ट सांगाल हो, बाबू ते समोरच झाड पाहतोस ना! त्या झाडावर एक पक्षी दररोज संध्याकाळी येऊन झाडावर बसतो.मी त्याला दररोज पहात असतो.पण त्याला भरारी घ्यायला येत नाही. पण त्याच्या कुटुंबातील पक्षी भरारी घेत असताना तो फक्त लांबूनच पहात राहतो.त्याला ही वाटायचं.त्यांनीही माझ्याजवळ यावं. मला तुमच्या आनंदात सहभागी व्हावं मला काही सांगावं.बोलावं.पण त्यामुळे तो नाराज असायचा. दररोज तो वाट पहायचा. आज कोणीतरी येईल उद्या कोणीतरी येईल.कित्येक दिवस तो असाच बसून राहतो. पण आज बघ तो त्या झाडावर बसून किती खुश झाला आहे.तिथेच वरती त्याचे कुटुंब राहते. "तो का खुश झाला आहे? आजोबा." कारण त्याने तुझे सगळे संवाद ऐकले. आणि त्याला एक मार्ग सापडला. आकाशाला आलेलं मळभ निघून गेलं. आणि त्याच्यापुढे एक स्वच्छ सुंदर मोकळे आकाश चौफेर दिसत आहे. मला कळले नाही. अण्णा.तुम्ही काय गोष्ट सांगितली. कळेल तू मोठा झाल्यावर तू ही गोष्ट आत्ता फक्त लक्षात ठेव. मावळतीला आलेली लाली निशे त बुडू पहात होती. रविराज रजनी शांतपणे स्थिरावली होती. एवढ्यात रेडिओ वर सांज धारा वर एक गाणे वाजू लागले. जीवन गाणे गातच रहावे. झाले गेले विसरून जावे, पुढे पुढे चालावे. जीवनगाणे....!

सौ.वैशाली महाडिक

# सायकलवर संविधान गुण गौरव परीक्षेची जनजागृती

## श्रीगोंदा येथील ६५ वर्षीय रावसाहेब घोडकेंची धडपड

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** लग्न कार्य असो,कुणाचा वाढदिवस असो,की गृहप्रवेश कार्यक्रम असो या प्रत्येक कार्यक्रमात जाऊन संविधानाचा प्रचार करताना लोकांना संविधानाची उद्देशिका देण्याचे महान कार्य ६५ वर्षीय संविधान प्रचारक रावसाहेब घोडके करत असतात. संविधान उद्देशिका सोबतच ते वृक्ष संवर्धनाचे कार्य म्हणून पिंपळ वृक्ष सुद्धा देत असतात.आपलं आयुष्य केवळ संविधानामुळेच आहे.संविधानानेच समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार दिलेला आहे. संविधान नसते तर देशातील नागरिकांना आपले हक्क आणि अधिकार मिळाले नसते.

भारताचे संविधान लोकांना समजले पाहिजे.त्याचे ज्ञान आले पाहिजे.याच करिता संविधानाचे महत्व ओळखून व हे संविधान लोकांपर्यंत पोहचले पाहिजे म्हणून अहमदनगर जिल्ह्याच्या श्रीगोंदा, सिध्दार्थनगर येथील ६५ वर्षीय रावसाहेब घोडके यांच्या कडून संविधानाचा प्रचार करण्याचे काम तळमळीने केले जात आहे.त्यांनी नुकतेच काही दिवसांपूर्वी श्रीगोंदा सह आसपासच्या गावात सायकलवर जाऊन संविधान गुण गौरव परीक्षेत सहभागी होण्यासाठी जनजागृती केली.६५ वर्षीय रावसाहेब घोडके हे संविधानाचा प्रचार आणि प्रसारासाठी झटत असल्याने त्यांचे विशेष कौतुक होत आहे.ह्या वयात सुद्धा संविधानिक आदर्श व मुल्ये जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी जे प्रयत्न रावसाहेब घोडके करत आहेत.नक्कीच हे प्रयत्न आमच्यासाठी निश्चितच प्रेरणादायी आहेत.

असे संविधान गुण गौरव समितीचे अध्यक्ष विलास पवार,उपाध्यक्ष शबनम पठाण,आपले संविधान, राज्यपध्दती नव्हे तर जीवन पद्धती" या पुस्तकाचे



लेखक व समितीचे मार्गदर्शक नुरखाँ पठाण, सदस्य अझहर शहा, नितीन घोपे, दिपरत्न निलंगेकर, युवराज खोब्रागडे, किशोर चव्हाण, सुशिल गायकवाड आदीनी म्हटलेले आहे.

रक्षित सामाजिक संस्था, म्हसळे अंतर्गत स्थापित संविधान गुण गौरव समितीच्या वतीने संविधान गुण गौरव परीक्षेचे आयोजन करण्यात आलेले आहे.ही परीक्षा राज्यस्तरावर घेण्यात आलेली असून राज्यातील अनेक शाळांनी यांमध्ये सहभाग नोंदविला आहे. तसेच खुल्या गटातून विविध क्षेत्रातील लोकांनी आपली नोंदणी केलेली आहे. श्रीगोंदा परिसरात सुद्धा अशा प्रकारची परीक्षा राबविली जावी. म्हणून रावसाहेब घोडके यांनी आपली सायकल रस्त्यावर घेऊन जात आसपासच्या गावांत जाऊन संविधान परीक्षेची माहिती देणारी संविधानमय फेरी मारली.श्रीगोंदा तालुक्यात गावोगावी जात असताना

त्यांनी घोडेगांव, चांडगाव,मढेवडगांव, पिंपरी, वडळी,वलगूड, अडगाव आदी भागात त्यांनी प्रचार केला. तसेच श्रीगोंदा तालुक्याचे गटविकास अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांचीही भेट घेतली. त्यांना सुद्धा या उपक्रमाची माहिती दिली. त्यांची सायकल सुद्धा लोकांमध्ये विशेष प्रबोधन घडवून आणणारी ठरते.त्यांनी सायकलवर संविधान गुण गौरव परीक्षेच्या उपक्रमाचा बॅनर लावलेला असून पुढे भारताच्या संविधानाची प्रास्ताविका सुद्धा पाहायला मिळत आहे. त्यावर महापुरूषांचे फोटो दिसून येत आहेत. प्रत्येक फोटो खाली संविधानातील मूल्ये आहेत. छत्रपती शिवाजी महाराज-स्वराज्य, राष्ट्रपिता जोतीराव फुले-शिक्षण,शाहू महाराज-आरक्षण आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर-न्याय अशी भूमिका असलेले संविधान ते घेऊन जात आहेत.हे संविधान लोकांपर्यंत पोहचले पाहिजे. हाच हेतू रावसाहेब घोडके यांचा आहे.संविधानाच्या प्रचारासाठी सदैव प्रयत्न करत राहणार असल्याचे रावसाहेब घोडके यांनी म्हटलेले आहे.

# पाल विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीची वार्षिक सभा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील पाल येथे शनिवारी रोजी संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत जाधव यांच्या अध्यक्षतेखाली विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित केली होती त्या वेळी अत्यंत आनंद घेत व सोसायटीच्या विविध विषयांवर चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी संस्थेचे सचिव संजय कुलकर्णी यांनी वार्षिक अहवाल व संस्थेविषयी सर्व माहिती सभासदांना सांगितली यावेळी उपस्थित चंद्रकांत जाधव यांनी सभासदांचे प्रश्नाला उत्तरे देऊन संस्थेच्या कारभारा विषय सविस्तर असे मार्गदर्शन केले याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर जाधव, सूर्यभान जाधव, जगन्नाथ जाधव, माजी उपसरपंच ज्ञानेश्वर जाधव, ग्रामपंचायतचे आप्पासाहेब जाधव, हिम्मतराव जाधव, संस्थेचे संचालक संजय जाधव, सूर्यभान गायकवाड, बबनराव जाधव, चंद्रशेखर जाधव यांच्यासह बहुसंख्य सभासद हजर होते.



# मान्सूनचा महाराष्ट्रातील मुक्काम वाढला!

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** देशाच्या काही राज्यांमधून मान्सूनने परतीचा प्रवास सुरू केला, पण महाराष्ट्रातील त्याचा मुक्काम ऑक्टोबरच्या मध्यापर्यंत वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. हवामान विभागानेच राज्यातील परतीच्या पावसाची तारीख वाढल्याचे सांगितले आहे. राज्याच्या काही भागांत एक ऑक्टोबरपर्यंत मध्यम तर, काही भागांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. त्यानंतर पुढील दोन दिवसांसाठी भंडारा, गोंदिया, सिंधुदुर्ग, गडचिरोली, सातारा, सांगली, कोल्हापूरमध्ये पाऊस हजेरी लावण्याची शक्यता आहे. राज्याच्या उर्वरित भागांमध्ये मात्र पाऊस उघडीप देईल असेही हवामान खात्याने स्पष्ट केले आहे. दरम्यान, मुंबईसह उपनगरांमधील काही भागांत पावसाच्या तुरळक सरी कोसळतील. तर, अधूनमधून विजांचा कडकडाट, सोसाट्याचा वारा आणि ढगांचा गडगडाट असे चित्रही शहरातील



काही भागांमध्ये पाहायला मिळणार आहे. पुढच्या किमान दहा दिवसांसाठी शहरात आणि शहराला लागून असणाऱ्या उपनगरीय क्षेत्रांमध्ये अशीच परिस्थिती असेल. कर्नाटकच्या उत्तर किनारपट्टी भागासह दक्षिण कोकण आणि गोव्यानजीक पूर्वमध्य अरबी समुद्रावर एक कमी दाबाचा पट्टा तयार होत आहे. हे क्षेत्र पुढील २४ तासांमध्ये धीम्या गतीने पश्चिम-उत्तर-पश्चिम दिशेने पुढे सरकत आहे. त्यामुळे म्यानमार आणि त्यालगतच असणाऱ्या बंगालच्या उपसागरावरही चक्राकार वाऱ्यांची निर्मिती होत आहे. परिणामी गोवा, महाराष्ट्राचा किनारपट्टी भाग, विदर्भ, मराठवाडा, कर्नाटक, केरळ, तमिळनाडू, आंध्र प्रदेश आणि तेलंगणाच्या काही भागांमध्ये पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. देशाच्या उत्तरेकडे पावसाचे प्रमाण कमी सांगण्यात आले असून काही भागांमध्ये थंड वारे वाहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# स्वच्छता ही सेवा उपक्रमांमध्ये सर्व ग्रामीण भागातील नागरिकांनी सहभागी व्हावे

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील व सावळदबारा परिसरात २ ऑक्टोबर या महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून स्वच्छता ही सेवा २०२३ हा उपक्रम (एक तारीख-एक तास) १ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता राबविण्यात येणार आहे. हा उपक्रम एक तास संपूर्ण देशामध्ये राबविण्यात येणार आहे. राज्यासह जिल्ह्यातील या उपक्रमांतर्गत शहरी आणि ग्रामीण भागात प्रत्येक वॉर्ड व ग्रामपंचायतीमध्ये १ तास श्रमदानाद्वारे स्वच्छता करण्यात येणार आहे. सर्व देशवासीयांनी सहभागी व्हावे असे आव्हान यावेळी सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केले आहे.स्वच्छता ही सेवा या उपक्रमांतर्गत सोयगाव तालुक्यात विविध ठिकाणी स्वच्छता उपक्रम दरवर्षीप्रमाणे याही वर्षी राबविले जाणार आहे. तरी देश वाशियांनी हा उपक्रम राबविण्याकरीता जिल्हा आणि पंचायत पातळीवर वॉर्ड व ग्रामपंचायती अंतर्गत जास्त कचरा असलेले क्षेत्र, बसस्थानके, राष्ट्रीय व राज्य जलस्रोत, नदीघाट, झोपडपट्ट्या, पुलाखालच्या जागा, गल्ल्या, धार्मिक स्थळे, सार्वजनिक व खाजगी कार्यालयांचे परिसर, पर्यटन स्थळे, रहिवाशी क्षेत्र, आरोग्य संस्थाच्या आसपासचा परिसर, अंगणवाडी परिसर, शाळा व महाविद्यालय परिसर अशा ठिकाणाची हा उपक्रम राबविण्यासाठी निवड करण्याचे आवाहन.माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केले आहे. स्वच्छता उपक्रमांतर्गत गोळा केलेल्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याकरीता लावावी. या उपक्रमांतर्गत संपूर्ण शासकीय यंत्रणा, कलाकार,लेखक, साहित्यकार यांनी मोठ्या संख्ये या उपक्रमामध्ये सहभागी व्हावे. असे सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केले आहे.

# रिधोरा देवी येथे प्रेषित जन्मोत्सव ईद-ए-मिलाद जल्लोषात साजरा..

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** रिधोरा देवी इस्लाम धर्माचे प्रेषित हजरत मुहम्मद पैगंबर यांचा जन्मोत्सव (ईद-ए-मिलाद) शनिवारी रिधोरा देवी येथे जुलूस (मिरवणूक) काढून जल्लोषात सण साजरा करण्यात आला. मुस्लीमबहुल भागात समाजबांधवांकडून आपआपल्या परिसरासह घरे, दुकानांवर सजावट करण्यात आली होती. यामुळे मोहल्ल्यांचे रूप पालटल्याचे चित्र होते. एस. टी. स्टँड रोड वरुन ते जामा मस्जिद पर्यंत असा जुलूस काढत कशिदा गायन करत ईद ए मिलाद सण उत्साहात साजरा करण्यात आला. दरवर्षी प्रमाणे यंदाही हस्ते पुष्पगुच्छ शाल देऊन स्वागत करण्यात आले. गावातील मुस्लिम ग्रामस्थ झेंडे लावून मोहोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी सर्वपक्षीय गावातील नेते, व हिंदू बांधवांनी मुस्लिम बांधवांना शुभेच्छा देऊन सण उत्साहात साजरा केला,अशा भावना ज्येष्ठ समाजसेवक शबीर पठाण यांनी व्यक्त केल्या. एकमेकांना आलिंगन देत ईद मुबारक म्हणत शुभेच्छा दिल्या. ग्रामीण भागात मुस्लिम बहुल विविध ठिकाणी ईद उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थित हजरत महंमद नियाज अहमद मौलाना, दानिश मौलाना तळेगाव, उपसरपंच इरफान पठाण मसतानपठाण , ,गफारपठाण,गणीनजीर पठाण, महंमद पठाण,नवाज पठाण, शफिक पठाण, सरदार पठाण,मजीत पठाण, सोहेल पठाण, आदी मुस्लिम बांधव उपस्थित होते.



# गौतमी पाटीलच्या कार्यक्रमात पोलिसांचा लाठीमार

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** नृत्यांगना गौतमी पाटीलचा कार्यक्रम आणि हुल्लडबाजी हे समीकरण झालं आहे. नागपुरातही गौतमी पाटीलच्या कार्यक्रमात अनेक डझन खुर्च्या तुटल्या. शिवाय हुल्लडबाज तरुणांना नियंत्रित करण्यासाठी पोलिसांनी सौम्य लाठीमार देखील केला. नागपुरात नृत्यांगना गौतमी पाटीलच्या लावणी कार्यक्रमात जोरदार हुल्लडबाजी झाली. गणेश विसर्जनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी आमदार प्रकाश गजभिये यांच्या उत्तर अंबाझरी येथील हिलटॉप एकता गणेशोत्सव मंडळाच्या वतीने शुक्रवारी (29 सप्टेंबर) गौतमी पाटीलचा लावणीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. गौतमीला बघण्यासाठी शहरातील तरुणांसह नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. मात्र, गौतमी पाटील सुमारे दोन तास उशिरा पोहोचली. त्यामुळे काही तरुण संतापले. त्यानंतर तिचे नृत्य सुरु होताच तरुणांनी जोरदार गोंधळ सुरु केला.

# दौलताबाद पोलीस ठाण्याच्या परिसरातील गणेश मंडळांनी शुक्रवारी केले श्रीगणेशाचे विसर्जन

आधुनिक केसरी न्यूज


**दौलताबाद :** येथील गणेश विसर्जन शांततेत व शिस्तीचे पालन करत शुक्रवारी(दि.२९) मोठ्या उत्साहत करण्यात आले. खुलताबाद येथील उरूस व अनंत चतुर्थी हे एकच दिवशी आल्याने अनुचित घटना घडू नये यासाठी ग्रामस्थ व पोलीस प्रशासन यांच्या पुढाकारातून गणेश विसर्जन मिरवणूक एक दिवस उशिरा ठेवण्यात आली होती. "दौलताबाद ही संतांची भूमी असून येथे हिंदू मुस्लिम ऐकाचे नेहमीच दर्शन झाले आहे.

त्यातच यंदा गणेश विसर्जन व खुलताबाद उरूस व ईद ए मिलाद हे सण एकत्र आले आहेत गणेश विसर्जन निमित्त हिंदू बांधवाची मिरवणूक व ईद



निमित्त खुलताबाद येथे दर्शनासाठी जाणारे भाविक यांची गर्दी लक्षात घेता काही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सर्वांनी काळजी घ्यावी दोन्ही समाजातील प्रतिष्ठित नागरिकांनी यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन पोलीस आयुक्त मनोज लोहिया यांनी केले होते.

या आवाहनाला प्रतिसाद देत दोन्ही समाजांनी मिळून गणेश विसर्जन एक दिवस उशिराने करावे असे ठरवण्यात आले त्या अनुसार शुक्रवारी गावातील स्वामी गणेश मंडळ, एकता युवा गणेश मंडळ,देवगिरीचा राजा गणेश मंडळ, संत गोरोबाकाकामित्र मंडळ यांच्यासह परिसरातील गणेश मंडळानी शुक्रवारी विसर्जन केले. यावेळी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.




# तब्बल २० दिवसानंतर ओबीसी आंदोलन स्थगित

## चंद्रपूर येथे येऊन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोडविले उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** ओबीसींचे चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर गेल्या २० दिवसापासून मराठा समाजाचा ओबीसीमध्ये समावेश करण्यात येऊ नये, राज्यामध्ये बिहारच्या धर्तीवर जातनिहाय सर्वे करण्यात यावा, तसेच प्रत्येक जिल्ह्यात ओबीसी मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृह सुरू करण्यात यावे, स्वाधार योजना सुरू करण्यात यावी, या व इतर २२ मागण्यांसाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे नेतृत्वात सुरू असलेल्या आंदोलनाची आज अखेर ३० सप्टेंबर रोजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सांगता झाली. मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहावर काल (दि.२९) ला राज्यातील ओबीसी नेत्यांच्या शिष्टमंडळासोबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीमध्ये ओबीसींच्या सर्व मागण्या तत्वतः मान्य करण्याचे आश्वासन राज्य शासनाने दिले. तसेच या मागण्यांवर लवकरात लवकर अंमलबजावणी करण्याचे आश्वासन सुद्धा राज्य सरकारने दिले. पुढील तीन दिवसात या सर्व मंजूर मागण्यांचे इतिवृत्त प्रकाशित होणार आहे. त्यामुळे सदर आंदोलन स्थगित करण्यात आले आहे. यावेळी ओबीसी समाज व मराठा समाज यांच्यातील सौहार्द जपण्याचे काम राज्य सरकार करेल, ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लावू दिल्या जाणार नाही, मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण दिल्या जाणार नाही, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. आंदोलनाची सांगता करताना यावेळी आंदोलन स्थळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,



पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, आमदार किशोर जोरगेवार, आमदार बंटी भांगडिया, आमदार परीणय फुके, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष बबनराव तायवाडे, महासचिव सचिन राजूरकर तसेच राष्ट्रीय समन्वयक डॉ. अशोक जीवतोडे, दिनेश चोखारे, एड. पुरुषोत्तम सातपुते, डॉ. संजय घाटे, सूर्यकांत खनके, डॉ. कांबळे, राखी कंचरलावार, पप्पू देशमुख, संध्या गुरूनुले, देवराव भोंगळे, रमेश राजूरकर, डॉ. गुलावाडे, श्याम लोडे, नंदू नागरकर, राहूल पावडे, गोमती पाचभाई, मनीषा बोबडे, अनिल शिंदे, डॉ. योगेश दूधपचारे, अनिल डहाके, रविकांत वरारकर, डॉ. आशीष महातळे, देवा पाचभाई, बबलू कटरे, राजेश बेले, महेश खांगार, अक्षय येरगुडे, तुळशीराम बुरसे, रवि जोगी, इत्यादी ओबीसी नेते उपस्थित होते. शनिवार (दि.३०) ला सकाळी १० वाजता राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील आंदोलन मंडपाला भेट देऊन उपोषणकर्ते रवींद्र टोंगे, विजय बल्की व प्रेमानंद जोगी यांचे उपोषण निंबुपाणी पाजून संपविले. त्यानंतर अधिकृतपणे आंदोलन स्थगित केल्याचे राष्ट्रीय ओबीसी महासंघातर्फे जाहीर करण्यात आले.

राज्य शासनाने सकारात्मकरीत्या ओबीसीच्या मागण्यांसंदर्भात दिलेल्या भूमिकेचे राष्ट्रीय ओबीसी महासंघातर्फे स्वागत करण्यात आले आहे. शासनाने मागण्या मंजूर केल्या असून त्याची तातडीने अंमलबजावणी होईल, अशी अपेक्षा राष्ट्रीय ओबीसी महासंघातर्फे व्यक्त करण्यात आली आहे.

तर ओबीसी समाजाच्या सर्व मागण्या मान्य करून आंदोलनाची राज्य सरकारतर्फे सन्मानजनक सांगता झाली, असे राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय समन्वयक डॉ. अशोक जीवतोडे यावेळी म्हणाले.

# सर्वसामान्यांच्या व्यथा जाणणारे नेतृत्व : आ. गोपीचंद पडळकर

आधुनिक केसरी

माननीय आमदार गोपीचंद पडळकर साहेब यांचे धनगर समाज आरक्षणाच्या लढाईत खूप मोठे योगदान आहे. त्यांनी धनगर आरक्षणासाठी राज्यभर आंदोलनाच्या माध्यमातून प्रयत्न केले आहेत. धनगर आरक्षण मिळण्यासाठी त्यांची आजही धडपड सुरू



असते.त्यांनी अशिक्षित समाज जागृत करण्याचे काम मोठ्या प्रमाणात केले आहे. तसेच आमदार गोपीचंद पडळकर साहेब हे सर्वसामान्य कुटुंबातून आलेले व्यक्तिमत्व असल्यामुळे त्यांना सर्वसामान्य माणसांच्या व समाजाच्या व्यथा माहित आहेत.एक सर्वसमावेशक नेता म्हणून माननीय आमदार गोपीचंद पडळकर साहेब यांच्या व्यक्तीमत्वाकडे पाहिले जाते.ते नेहमी स्वतःची परखडपणे मते मांडत असतात.ते बोलत असलेल्या, त्यांच्या प्रत्येक वक्तव्याची दखल अख्खा महाराष्ट्र घेत असतो.कुणाच्याही दबावाला बळी न पडता, निर्भीडपणे लढत राहणारा योद्धा म्हणून आ.गोपीचंद पडळकर यांची भूमिका प्रभावी आणि दखल पात्र असते.त्यांनी सर्वसामान्यांच्या हिताच्या दृष्टीने काम करताना कार्यकर्त्यांची खूप मोठी फळी निर्माण केलेली आहे.ते नेहमी सर्वसामान्य माणसाला उपलब्ध होत असतात.त्यांच्या व्यथा,समस्या जाणून घेत असतात. मार्गी लावण्यासाठी कृतीशील प्रयत्न करत असतात. कार्यकर्त्यांना फोन करून चौकशी करत असतात. भेटायला येणाऱ्या प्रत्येल कार्यकर्त्यांला तातडीने वेळ देत असतात.छोट्यातल्या छोट्या कार्यकर्त्याला ते भेटत असतात. त्यांची विचारपूस करत असतात.हेच त्यांचे आपूलकीचे वागणे आजही कार्यकर्त्यांना आपले पणाचे वाटते. खंडाळा तालुक्यातील लोणंदला त्यांचं येणं जाणं सुरू असते. खंडाळा तालुक्यातील समाज बांधवांवर त्यांचं विशेष लक्ष असून ते वारंवार भेटी देत असतात. लोणंदला त्यांच्या अनेक वेळा सभा झालेल्या असून त्यांनी प्रत्येक वेळी समाज बांधवांना व कार्यकर्त्यांना ऊर्जा देण्याचे काम केले आहे. विधानपरिषदेचे आमदार व पक्षाचे प्रवक्ते म्हणून ते महाराष्ट्रात सर्वत्र ठिकाणी जात असतात. विकास कामांच्या दृष्टीने निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न ते सतत करत असतात.काही महिन्यांपूर्वीच माननीय गोपीचंद पडळकर साहेब यांनी खंडाळा तालुक्यातील लोणंद येथील अहिल्यादेवी स्मारकाच्या सुशोभीकरणासाठी २५ लाख रुपये निधी उपलब्ध करून दिलेला आहे.त्यांच्या या अनमोल सहकार्याबद्दल आ.गोपीचंद पडळकर यांचे खूप खूप धन्यवाद व त्यांच्या हातून समाज हिताची कामे व जन सामान्यांच्या व्यथा आणि समस्यांना न्याय मिळत राहो.१ ऑक्टोबर रोजी त्यांचा वाढदिवस असून त्यांना लोणंदकर नागरिक,समस्त समज बांधव व पक्षाच्या वतीने वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.

**श्री. संदीप भालचंद्र शेळके-पाटील, भाजपा युवा नेते-लोणंद,ता.खंडाळा जि.सातारा**

# पैठण बाजार समितीची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** पाचोड येथील मौसंबीचे बाजारपेठ मराठवाड्यात नावारूपाला आले असून दहा ते बारा एकरमध्ये पसरले आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीला मौसंबी, कापुस, कांदा व इतर भाडे असे एकून एक कोटी 46 लाखाचा नफा मिळाला आहे. तर बाजार समितीला दोन कोटीचा निधी पाचोडसाठी दिड कोटीचा निधी दिला असुन त्यामध्ये रस्ता व शेतकऱ्यांच्या सोयी सुविधा साठी हा निधी वापरला जाणार असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री संदिपान भुमरे यांनी बाजार समितीची सन २०२२-२३ ची २९ वी वार्षीक सर्वसाधारण सभेत केले. पैठण शहरातील माहेश्वरी भक्त निवास येथे दि.30 सप्टेंबर 2023 रोजी पैठण कृषी उत्पन्न बाजार समितीची 29 वी वार्षिक सर्वसाधारण सभा फलोत्पादन मंत्री तथा पालकमंत्री संदिपान भुमरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार



पडली. यावेळी पालकमंत्री म्हणाले की संत ज्ञानेश्वर उद्यानासाठी 150 कोटींचा निधी शासनाने उपलब्ध करून दिला असून शेतकऱ्यांचा भाजीपाल्याला योग्य भाव मिळावा म्हणून विनाशुल्क(मोफत) जागा व्यापाऱ्यांना उपलब्ध करून दिली असल्याचे मंत्री संदिपान भुमरे यांनी सांगितले. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा सभेचे अध्यक्ष राजु नाना भुमरे, स्वागतोत्सुक उपसभापती राम पा. एरंडे हे होते. या दरम्यान सभेचा इतिवृत्तांत संचालक मंडळ व सभासदांसमोर वाचुन दाखविला. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मंडळाचे बद्रीनाथ बोंबले, विठ्ठल दोरखे सुभाष मुळे, राजेंद्र तांबे, शिवाजी जाधव साईनाथ व्होरकटे, संभाजी तवार, शरद नरके, सचिन मोगल, भगवान कारके, मनिषा खराद, शशिकलाबाई हजारे, नितीन विखे, गंगासागर घनवट, महावीर काला, महेश मुंदडा, राजु टेकाळे अदिंची उपस्थिती होती.



# राजकीय इच्छाशक्ती, लोकलढयाअभावी मराठवाडा विकासात मागे : प्रा.डॉ. अशोक सिद्धेवाड

आधुनिक केसरी न्यूज

**उदगीर :** स्वामी रामानंद तीर्थ यांनी हैदराबाद मुक्ती लढ्याचे यशस्वी नेतृत्व करून मराठवाड्याला संयुक्त महाराष्ट्राचा अविभाज्य भाग बनविले. पुढे त्याच्या विकासासाठी गोविंदभाई श्रॉफ, सुधाकरराव डोईफोडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी सतत संघर्ष केला त्यामुळेच मराठवाड्याला कृषी विद्यापीठ , ब्रॉडगेज आणि वैधानिक विकास मंडळ मिळाले पण अलीकडे राज्यकर्त्यांचा मराठवाड्या प्रती उदासीन दृष्टिकोन आणि विभागीय विकासासाठी लोकांमध्ये लढाउपणाचा अभाव यामुळे मराठवाड्याच्या विकासाची गती मंदावली आहे असे प्रतिपादन नांदेड येथील पीपल्स कॉलेजचे उपप्राचार्य प्रा. डॉ.अशोक सिद्धेवाड यांनी केले ते उदगीर येथील दि. लिं. होळीकर प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित व्याख्यानमालेत बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस माननीय बसवराज नागराळकर हे होते. मंचावर उदगीरभूषण रमेश अबरखाने, प्रसिद्ध व्यापारी प्रदीप बेद्रे, कॉ.के.के. जांबकर, प्रतिष्ठानचे अध्यक्ष राम जाधव व सत्कारमूर्ती किशन उगले हे होते. 'मराठवाड्याचा विकासः वारसा आणि वास्तव एक दृष्टिक्षेप ' या विषयावर बोलताना डॉ. सिद्धेवाड पुढे म्हणाले की, प्रादेशिक असमतोलाचा अभ्यास करणाऱ्या डॉ. वि.म.दांडेकर समितीसह अनेक समित्यांनी प्रगत महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्याचा अनुशेष प्रचंड असल्याचे सांगितले तो अद्यापही पूर्ण झाला नाही उलट तो वाढला हे वास्तव आहे. संयुक्त महाराष्ट्रासी समरस झालेल्या मराठवाड्याला नागपूर कराराप्रमाणे लोकसंख्येच्या प्रमाणात निधी, शासकीय नोकऱ्या आणि प्रशासकीय सोयीसुविधा मिळाल्याशिवाय मराठवाड्याचा विकास होणार नाही ही बाब त्यांनी उपस्थितांच्या नजरेस आणून दिली. अलीकडेच औरंगाबाद येथील मंत्रिमंडळ बैठकीत माननीय मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी मराठवाड्याचे मागासलेपण पुसून मराठवाड्याला एक प्रगत भाग बनविण्याचा जो संकल्प सोडला आहे त्याचे स्वागत करून संकल्प आणि सिद्धी यातील मोठ्या अंतराचा अनुभव यापूर्वी मराठवाड्याने घेतला असूनही आम्ही आशावादी असल्याचेही ते म्हणाले. अध्यक्षीय समारोप पर भाषणात मा. बसवराज पाटील नागराळकर म्हणाले की , हैदराबाद मुक्ती लढ्याच्या इतिहासात आमच्या पूर्वजांचा नाम उल्लेख नाही त्यामुळे नव्या पिढीला तो दुरुस्त स्वरूपात सांगावा लागेल .आपली लढाई ही हिंदू विरुद्ध मुस्लिम अशी कधीच नव्हती तर तीआपल्या विकासासाठी होती .मराठवाड्यातील जनतेने आपापसात लढणे सोडल्या शिवाय आणि तरुणांनी मराठवाड्याच्या विकासासाठी पेटून उठल्या




शिवाय मराठवाड्याचा विकास होऊ शकत नाही असे ते म्हणाले. यावेळी प्रतिष्ठानच्या वतीने श्री किशन उगले यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते त्यांचा शाल श्रीफळ स्मृती चिन्ह आणि सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर श्री किशन उगले यांनीही सत्काराला उत्तर म्हणून आपल्या भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाच्या आरंभी दि .लिं .होळीकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले. त्यानंतर उषाताई तोंडचीरकर यांनी स्वागत गीत गायिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक यशवंत बिरादार यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख व त्यांचा परिचय प्रा. डॉ. दत्ताहरी होनराव यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वीरभद्र स्वामी व डॉ .माधव कांबळे यांनी केले तर उपस्थितांचे आभार मुरलीधर जाधव यांनी मानले. या कार्यक्रमास तुकाराम बिरादार, प्रकाश साखरे, अनंत कदम, बाबुराव सोमवंशी, सुनील येणकीकर गोविंद सावरगाव, सत्यजित येणकीकर, बाबुराव माशाळकर, डॉ.सुरेश शिंदे, डॉ.बालाजी सुर्यवंशी,श्री बेलेकर, प्रा.डॉ.दयानंद गुडेवार, प्रा.डॉ. गायकवाड, प्राचार्य जाधव, यांच्यासह अनेक नागरिक, प्राध्यापक, शिक्षक महिला, ग्रामस्थ इत्यादी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.



# क्रिकेट स्पर्धेत ज्ञानकुंज महाविद्यालय प्रथम

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** बाजार सावंगी येथील ज्ञानकुंज कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या 19 वर्षाखालील शालेय विद्यार्थी क्रिकेट संघाने खुलताबाद तालुका शालेय क्रीडा स्पर्धेत विजय मिळवल्याने त्या संघाची जिल्हास्तरावर निवड झाली. क्रीडा शिक्षक श्री राठोड श्री सुरडकर श्री राणे यांनी मार्गदर्शन केले होते. विजय संपादन केल्याने संस्था अध्यक्ष विजय द्वार कुंडे सचिव भाऊसाहेब काळे प्राचार्य योगेश झिंजुर्के प्राध्यापक व शिक्षक या सर्वांनी त्यांच्या अभिनंदन केले.

# वैयक्तिक शेततळे योजनेसाठी अर्ज करण्याचे सोयगाव कृषी विभागाचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेंतर्गत वैयक्तिक शेततळे ही योजना सोयगाव कृषी विभागातर्फे राबविण्यात येत आहे. या योजनेसाठी शेतकऱ्यांनी अर्ज करावा, असे आवाहन कृषि विभागातर्फे तालुका कृषी अधिकारी मदन शिसोदिया यांच्या कडून करण्यात आले आहे. सध्याच्या पावसाच्या खंड काळात शेततळ्यामध्ये जमा झालेल्या पाण्याचा खरीप पिके, फळबागांच्या संरक्षित सिंचनासाठी उपयोग होत आहे. या योजनेत सहभागी होण्याकरिता शेतकऱ्यांकडे किमान ०.४० हेक्टर क्षेत्र असणे आवश्यक आहे. क्षेत्र धारणेस कमाल मर्यादा नाही. तसेच अर्जदार शेतकऱ्यांनी पूर्वी मागेल त्याला शेततळे, सामूहिक शेततळे यासह इतर कुठल्याही शासकीय योजनेतून शेततळे घटकाकरिता शासनाच्या अनुदानाचा लाभ घेतलेला नसणे आवश्यक आहे. सध्याची पाणीटंचाईची परिस्थिती पाहता भविष्यात फळबाग वाचवण्यासाठी सध्या उपलब्ध असलेली विहीर बोअरवेलचे, परतीच्या पावसाद्वारे उपलब्ध होणारे पाणी अस्तरीकरणासह शेततळे योजनेचा लाभ घेऊन साठवणे गरजेचे आहे.
या योजनेतून अस्तरीकरणाशिवाय शेततळ्यासाठी ७५ हजार रुपयांपर्यंत आणि अस्तरीकरणासह शेततळ्यासाठी १. लाख ५० हजार रुपयांपर्यंत अनुदान मिळते. शेततळे योजनेतून संरक्षित सिंचन शेतीला मिळावे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे. यापूर्वी शेततळ्याचा लाभ घेतलेला नसलेल्या तालुकातील फळबाग धारक शेतकऱ्यांनी राज्य शासनाच्या महाडीबीटी पोर्टलवर सीएससी तसेच केंद्रामार्फत किंवा वैयक्तिकरित्या ऑनलाईन नोंद करून मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेंतर्गत वैयक्तिक शेततळे योजनेचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी सोयगाव कृषी सहाय्यक, तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी मदन शिसोदिया यांनी केले आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका कार्याध्यक्षपदी बाळासाहेब शिंदे

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष पदी बाळासाहेब शिंदे यांची नियुक्ती पक्षाचे जिल्हाध्यक्ष मा आ कैलास पाटील यांनी केली व त्यांचे हस्ते त्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. जिल्हा उपाध्यक्ष नितीन देशमुख यांच्या शिफारशी वरुन सदरील नियुक्ती करण्यात आली. यावेळी नितीन देशमुख, बाजार समिती मा उपसभापती राहुल डकले, मा संचालक विजय मोरे, तालुकाध्यक्ष बाबासाहेब तांदळे, संभाजीनगर तालुकाध्यक्ष अमरजित पवार, सचिन अवसरमल, योगेश जोगदंड आदि उपस्थित होते .बाळासाहेब शिंदे हे पक्ष स्थापने पासून सक्रीय कार्यकर्त म्हणुन काम करत आहेत. राष्ट्रवादी पक्षाचे युवक, ओबीसी सेल असे विविध पदावर त्यांनी काम केले आहेत. सामाजिक कार्यत पण ते सतत अग्रेसर पणे कामे करत असतात. किनंगाव चे ग्रामपंचायत सदस्य म्हणुन हि त्यांनी काम बघितले आहेत. सर्व स्तरातुन त्यांच्या वर अभिनंदनाचा वर्षाव होत आहेत.



# बोधेगाव बु. शिवारातून २५ लाखांची गांजाची झाडे जप्त

## राज्य उत्पादन शुल्क विभागाची मोठी कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

सुधाकर जेठे

**फुलंब्री :** तालुक्यातील बोधेगाव बु. येथे शुक्रवारी (दि.29) रोजी दुपारी राज्य उत्पादन शुल्क विभागाने दोन शेतात छापा मारून आरोपीसह 25 लाख रुपये किमतीचे जिवंत परिपक्व गांजाची झाडे जप्त केली आहे. छत्रपती संभाजीनगर येथील राज्य उत्पादन शुल्क विभागाने बोधेगाव बु. (ता. फुलंब्री) शिवारातील गट क्र. २८१ मधील योगेश गौतम वाघ व गट क्र. ४९८ मधील आसाराम मोती बहुरे यांच्या कपाशी व तुरीच्या शेतात छापा टाकून सुमारे २५ लाख रुपये किमतीचे एकूण ११६ परिपक्व गांजाची झाडे जप्त केली. आसाराम मोती बहुरे यांचा मुलगा शुभम उर्फ बबलू आसाराम बहुरे याने शेतात गांजाच्या झाडाची लागवड केलेली होती. तसेच योगेश गौतम वाघ याने त्याच्या कुटुंबातील सामाईक क्षेत्रातील ताबेकब्जात असलेल्या कपाशी व तुरीच्या शेतात गांजा झाडांची लागवड केली होती. या प्रकरणी एनडीपीएस कायदा १९८५ अन्वये दोन गुन्हे नोंद केले असून योगेश गौतम वाघ यास अटक केली, तर शुभम उर्फ बबलू आसाराम बहुरे हा फरार आहे. ही कारवाई अधीक्षक संतोष झगडे, प्र. उप अधीक्षक शरद फटांगडे, निरीक्षक भरारी पथक राहुल गुरव, आनंद चौधरी यांच्यासह दुय्यम निरीक्षक गणेश पवार, गणेश इंगळे, शरद रोटे, अरुण तातळे, बालाजी वाघमोडे, गणेश उंडे, पी. बी. साबळे, ए. टी. निमगीरे, ए. ओ. गायकवाड. पी. आर. माळी, व्ही. जी. साळुंके, एस. एस. कोकाटे, ए. बी. म्हस्के, सहायक दुय्यम निरीक्षक गणेश नागवे, प्रवीण पुरी, रामजीवन भारती, सुभाष गुंजाळे, हर्षल बारी, कृष्णा पाटील, चेतन वानखेडे, रवींद्र मुरडकर, सुनिल दामधर, भैयासाहेब किरवले, श्रावण खरात, विजय पवार, अमित नवगीरे, बेबी नलावडे, अश्विनी बोंदर, शिवशंकर मुपडे, किशोर सुंदर्डे, सचिन पवार, विनायक चव्हाण, संजय गायकवाड आदींनी केली. तपास भरारी पथकाचे दुय्यम निरीक्षक शरद रोटे व अरुण तातळे करत आहेत.






# सोयगाव येथे बावनकुळे यांचा निषेध

## चहाचा अभिषेक प्रतिमेस जोडे मारून निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** अहमदनगर येथे एका कार्यक्रमात भारतीय जनता पार्टीचे प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी कार्यकर्त्यांना उद्देशून पत्रकारांना चहा पाजा, त्यांना धाब्यावर जेवणाला घेऊन जा असा संदेश दिला. या प्रकारामुळे पत्रकारांची बदनामी होऊन चारित्र्यहनन केले आहे. हा देशाच्या चौथ्या आधारस्तंभावर घाला आहे. या प्रवृत्तीचा सोयगाव येथे पत्रकार संघातर्फे शनिवारी तीव्र निषेध करण्यात आला.सोयगाव येथील छत्रपती शिवाजी चौकात भाजपा प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रतिकात्मक तैलचित्रास काळे फासून चहाचा अभिषेक करीत जोडे मारण्यात आले. तसेच छत्रपती शिवाजी चौक ते एस टी बसस्थानक मार्गे तहसील कार्यालयापर्यंत प्रतिकात्मक तैलचित्राची अंत्ययात्रा काढून घोषणा बाजी करीत तहसीलदार मोहनलाल हरणे यांना निवेदन देण्यात आले. तहसीलदार मोहनलाल हरणे यांनी पत्रकारांच्या भावना वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत शासनाला पोहचविण्याचे आश्वासन दिले. यावेळी सावळदबारा व सोयगाव पत्रकार संघाचे अध्यक्ष,भरत पगारे, उपाध्यक्ष दिनेश चोपडे, दिलीप शिंदे, सुनील काळे, संदीप इंगळे तसेच सदस्य विजय काळे, राजू दुतोंडे, ईश्वर इंगळे, शेख गुलाब, पूनम परदशी, यासिन बेग, एकनाथ गोंड पाटील, यासिन बेग, राजरत्न पगारे, दत्तू काटोले, शेख समीर, शेख सुलेमान, रवींद्र काटोले, जेष्ठ पत्रकार गोकुळसिंग राजपूत, रहीमखान दाऊदखान, सुनील चोरमारे, जब्बार डी. तडवी, सुनील चव्हाण, बहादुर चव्हाण, जब्बार एस तडवी, गणेश खैरे, आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# लोहा शहरात डेंग्यू तापासह साथीच्या आजाराचे थैमान, नागरिकांचे आरोग्य आले धोक्यात

## संबंधितांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा

आधुनिक केसरी न्यूज





**लोहा :** अनेक दिवसापासून लोहा शहरात डेंग्यू सह साथीच्या रोगाने थैमान घातले आहे लोहा शहरात कोरोना महामरी पेक्षा ही भया वया परिस्थिती झाली असतानाही संबधीत आरोग्य विभाग व न.पा. प्रशासनाच्या वतीने कोणत्या ही उपाय-योजना होत नसल्याने साथीचे आजाराचा विळखा दिवसेन दिवस वाढत आहे. अनेकांनी स्वच्छते विषयी बंदिस्त वराह पालना विषयी तक्रारी देवून ही कसल्या ही प्रकारे नागरिकांच्या आरोग्या ठोस उपाय योजना केल्या जात नाहित उलट संबंधीत विभाग नागरिकांच्या जिवाशी खेळ खेळत सुरु असल्याने नागरिकांतून संताप व्यक्त केला जात आहे. मागील न.पा. निवडणुकीत जाहिरनामा प्रकाशित करत शहराच्या विकासाचा मोठा गाजावाजा करत शहराचा काया पालट करण्याचे स्वप्न दाखवले खरे परंतु मागिल साडेच चार वर्षांत शहराचा विकासच काय शहराला उलट अधोगतीकडे नेऊन ठेवले शहराचा उकिरडा करत पार सत्यानाश केल्याचे चित्र पहावयास मिळत असुन, शहरात कुठेच स्वच्छता नाही तर रस्त्याच्या बाजूने खड्डे ,जागो जागी नाल्या तुबल्या असुन त्यात भर मोकाट जनावरे व वराह यांच्या मुक्त संचारामुळे जनावरांच्या विष्टेमुळे घाणीचे साम्राज वाढून नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत आहे संबंधीत आरोग्य विभाग व नगर पालिकेच्या नाकर्तेपणा मुळे शहरात डेंग्यू , मलेरिया, गॅस्ट्रो, काविळ, साथीच्या तापाच्या आजाराने थैमान घातले आहे, खाजगी रुग्णालये हाऊस फुल झोले आहेत "सद्या कोरोना महामारी" पेक्षा ही भया वया परिस्थिती झाली असुन कमीत कमी लोकनियुक्तानी तरी लोकांच्या समस्या जाणुन घ्याव्या असे जनतेतुन बोलले जात आहे. सद्या गल्ली बोळात नविन नालीचे बांधकाम तर झाले नाहीच तर पंचविस वर्षांखालील असलेल्या नाल्याचा उपसा ही अनेक दिवसा पासुन झाला नाही जागो जागी पाणी तुंबले जात आहे. त्यामुळे दुर्गंधी पसरत आहे डासांची डासांचा प्रादुर्भाव दिवसेन दिवस वाढत आहे सद्या शहरात महामारी चे स्वरुप आले असुन, आरोग्य विभागाच्या कामचुकार वृत्तीमुळे व न.पा.कडुन आपले उखळ पांढरे करण्या साठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कृतव्याचा विसर पडत शहराच्या प्रमुख गरजांकडे दुर्लक्ष केले जात असल्याने नागरिकांतुन संताप व्यक्त केला जात आहे. तरी वरिष्टानी लोहा शहरात मागिल चार वर्षात डेंग्यू, मलेरिया, गॅस्ट्रोसह साथीच्या आजाराने दगावलेल्या ची संख्या शासकिय व खाजगी रुग्णालयातुन घेवून संबंधीत आरोग्या विभाग, न.पा प्रशासण व लोकनियुक्तावर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा नोंद करण्याच्या मागणी मागणी जनतेतून होत आहे.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर